**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६४

१ श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी, अपिलकर्ता
प्लॉट क्रमांक २४०, सद्‌गुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड,
तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद कार्यालय, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०६-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. अपिलकाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २७-११-२००६ रोजी अर्ज करुन सर्व्हे नंबर ५ मधील प्लॉट क्रमांक २४० या मालमत्ताधारकाची एकूण ९ मुद्दयांवर माहिती मागविली होती. माहितीपोटी एकूण रुपये ४६ इतकी रक्कम आकारुन अपिलकारास दिनांक २६-१२-२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन दिली. जन माहिती अधिका-याने अपूर्ण माहिती दिल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २३ जानेवारी २००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर सुनावणी घेऊन प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक १४-०५-२००७ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर

दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी करिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. जन माहिती अधिका-याने सादर केलेल्या अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची पाहणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता अपिलार्थीस फी भरलेली पावतीसंबंधीची माहिती, प्लॉट क्रमांक २४० संबंधी आकारणी केलेल्या मालमत्ता कर रुपये ९०७२ जमा रकमेची पावती व फेर मुल्यांकन कराची ११९ अन्वये दिलेली नोटीसीची प्रत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस विहित वेळेत दिलेली नाही असे दिसते. जन माहिती अधिका-यांनी सुनावणीचेवेळी लेखी निवेदन सादर करुन असे प्रतिपादन केले की, प्लॉट क्रमांक २४० चे फेरफारसंबंधी प्रर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतीच्या न. नं. ८ च्या उता-याची प्रत अपिलार्थीस दिली. नामांतरासाठी नगरपरिषदेत कोणतीही फी आकारली जात नाही. मालमत्ता कर रक्कम रुपये ९०७२ भरणा पावती क्रमांक ५०/४९५४, दिनांक ०८-०१-२००४ दिनांक २५-१०-२००७ रोजी तसेच फेरमुल्यांकन बाबतची नोटीसीची प्रत दिनांक ०५-०६-२००७ रोजी अपिलार्थीस दिली. यावरुन सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाली असल्याचे दिसून येते. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने उशिराने माहिती दिली असल्याचे दिसते. भविष्यात जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६५

निर्णय दिनांक १३-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रा. प्रदीप वासुदेव पुरंदरे,<br>सहायक प्राध्यापक,<br>जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी,<br>जल व भूमी व्यवस्थापन संस्था<br>(वाल्मी),औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राध्यापक (पदोन्नती)<br>जल व भूमी व्यवस्थापन संस्था<br>(वाल्मी),औरंगाबाद | | |

**विवेचन**

अपिलकार अपिलार्थी श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे रा.औरंगाबाद यांनी दि. ०४.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकारी जन व भूमि व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद यांच्याकडे प्रा. जाडिया यांचेशी संबंधित एकूण ७ मुद्यांसंदर्भात माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांनी या संदर्भात त्यांच्याकडील दि. ३०.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार करण्यास कालावधी लागणार असल्यामुळे ती दि. ३१.७.२००७ पर्यंत देण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले. त्यानंतर दि. १०.७.२००७ रोजी अपिलार्थीस सातही मुद्यांबाबत माहिती उपलब्ध करुन दिली.

तथापि अपिलार्थीने त्यांच्या दि. ४.५.२००७ रोजीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने दि. ११.६.२००७ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी

घेतली नाही, तथापि  दि. २७.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती अधिकारी यांनी दि. १०.७.२००७ रोजी माहिती पुरविली असल्यामुळे अपील निकाली काढले.

प्रथम जन अपिलीय अधिकारी यांनी उशिराने माहिती दिली तसेच त्यातील मुद्दा क्र.७ ची माहिती प्रमाणित केली नाही व मुद्दा क्र.४ ची माहिती बेकायदेशीरपणे नाकारल्याचे कारणावरुन अपिलार्थी यांनी दि. ३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले व या अपिलामध्ये माहिती अधिकाऱ्याविरुध्द उचित कारवाई करावी व पूर्ण माहिती प्रमाणित स्वरुपात मिळावी, अशी विनंती केली. सदर अपिलाची आज दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता श्री. मनोज रघुनाथ अवलगावकर,जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद, डॉ. दत्तात्रय हरिश्चंद्र पवार,प्राध्यापक (पदोन्नती) जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद तसेच अपिलकार श्री. प्रदीप पुरंदरे हे हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे आढळून आले की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१०.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व  माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (डी) व (जे) नुसार प्रथम नाकारले.  आज सुनावणीचे वेळी मूळ अर्जातील ही माहिती ही प्रशिक्षण व्यवस्थापन (T.M.C.) कक्षाशी संबंधित असून ती माहिती T.M.C.कडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादामध्ये आयोगास सादर केले.

या प्रकरणी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्रशिक्षण व्यवस्थापन (T.M.C.) कक्षाकडून उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस विलंबाने पुरविली आहे.  सबब विलंबाबद्दल जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याबाबत दक्षता घ्यावी, अशी त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. प्रा. प्रदीप वासुदेव पुरंदरे,सहायक प्राध्यापक, जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी),औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक (पदोन्नती),जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६६

निर्णय दिनांक १३-१०-२००८

१ प्रा. प्रदीप वासुदेव पुरंदरे, **-----अपीलकर्ता**
सहायक प्राध्यापक,
जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
जल व भूमी व्यवस्थापन संस्था
(वाल्मी),औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राध्यापक (पदोन्नती)
जल व भूमी व्यवस्थापन संस्था
(वाल्मी),औरंगाबाद **------उत्तरवादी**

## विवेचन

अपिलकार अपिलार्थी श्री. प्रदीप वासुदेव पुरंदरे रा.औरंगाबाद यांनी अपिलार्थीने दि. ४.५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकारी, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी),औरंगाबाद यांच्याकडे सहायक अभियंता श्री.गारुडकर यांच्याशी संबंधित एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत व मागणीप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याचे कारणावरुन अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर लगेच माहिती अधिकारी यांनी दि. १२.६.२००७ च्या पत्रान्वये सर्व मुद्यांवर माहिती पुरविली.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही, परंतु जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.६.२००६ रोजी (प्रथम अपील दाखल केल्यानंतर) अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे कारण दर्शवून दि. २७.७.२००७ च्या पत्रान्वये अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले.

अपिलार्थीने सदर आदेशाविरुध्द तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही,अर्धवट व खोटी माहिती दिली, अशी कारणे नमूद करुन माहिती अधिकारी यांच्यावर उचित कारवाई करावी व पूर्णतः खरी माहिती प्रमाणित प्रतीसह मिळावी, या विनंतीसह दि. ३.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम माहिती उपलब्ध करुन देताना किती रकमेचा व कालावधीचा बॉण्ड घेतला आहे, याबाबत "फक्त बॉण्ड घेण्यात आले." असे विधान केले होते. त्यामुळे बॉण्डच्या रकमेचा व कालावधीचा उल्लेख नसल्यामुळे ती माहिती मिळण्यासाठी प्रथम अपील केले. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी मूळ दिलेली माहिती बदलून दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अनावधानाने "बॉण्ड घेण्यात आले", असे पूर्वी नमुद केले होते, त्याऐवजी "बॉण्ड घेण्यात येत आहे." असे वाचावे, असे विधान केले.

आज रोजी सदर अपिलावर दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीकरिता श्री. मनोज रघुनाथ अवलगावकर,जन माहिती अधिकारी प्रशासकीय अधिकारी जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद, डॉ. दत्तात्रय हरिश्चंद्र पवार,प्राध्यापक (पदोन्नती) जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद तसेच अपिलकार श्री. प्रदीप पुरंदरे हे हजर आहेत.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित प्राध्यापकांकडून बॉण्ड घेतले आहे काय यासंबंधीची माहिती देताना अगोदर "बॉण्ड घेतले असल्याचे" कळविले होते, त्यापत्रामध्ये दुरुस्ती करुन "बॉण्ड घेण्यात येत आहे " कळविल्याचे आढळून आले आहे. या संबंधी निश्चित वस्तुस्थिती काय आहे, याबाबतची माहिती, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देणे आवश्यक आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, माहिती अधिकारी यांनी संबंधित प्राध्यापक श्री. गारुडकर यांच्याकडून घेतलेल्या बॉण्डसंबंधी निश्चित वस्तुस्थितीची माहिती अपिलार्थीस व आयोगास हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश-**

**सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद** **( रामानंद तिवारी )**
**दिनांक : १३-१०-२००८** **राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. प्रा. प्रदीप वासुदेव पुरंदरे,सहायक प्राध्यापक, जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी),औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक (पदोन्नती),जल व भूमि व्यवस्थापन (वाल्मी) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६७

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अशोक सर्जेराव देशमुख,<br>१५, स्वानंदनगर, न्यू श्रेयनगर,<br>औरंगाबाद | अपिलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद | उत्तरवादी |

**<u>विवेचन</u>**

अपिलार्थी श्री. अशोक सर्जेराव देशमुख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २०-१२-२००६ रोजी अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती.

अ) मोजणी नकाशा गट नंबर ७, नक्षत्रवाडी, फाईल क्रमांक एमआर/एबीडी/२३८८/८२ मोजणी दिनांक ०६-०६-१९८२ ची सत्यप्रत,

ब) मोजणी नकाशा गट नंबर ७, नक्षत्रवाडी, मोजणी दिनांक ०८-०९-२००४ ची सत्यप्रत.

जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १२-०२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी प्रकरण क्रमांक १६१३/०४ ची सत्यप्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली. परंतू मोजणी नकाशा फाईल क्रमांक एमआर/एबीडी/२३८८/८२ ची सत्यप्रत अपिलार्थीस दिली नाही. मौजे नक्षत्रवाडी येथील २३८८/८२ हे प्रकरण कालबाह्य झालेले आहे असे जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ०२ जानेवारी २००७ च्या पत्राने लेखी व चुकीची माहिती दिली. त्यानंतर

जन माहिती अधिका-याने संबंधीत फाईलचा शोध चालू ठेवला होता. अभिलेख कक्षातील एक एक प्रकरणाची पडताळणी केली असता फाईल क्रमांक २३८८/८२ उपलब्ध झाली. अपिलकारास क्रमांक २३८८/८२ ची सत्यप्रत दिनांक ०५-०३-२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली.

जन माहिती अधिका-याने फाईल क्रमांक २३८८/८२ बाबत, प्रकरण कालबाह्य झाले असल्याबाबत प्रथम चुकीची माहिती दिली. त्यानंतर उशिराने याबाबत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. याबाबत जन माहिती अधिका-याविरुध्द दंडणीय कार्यवाही करावी म्हणून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३ जुलै २००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने प्रकरणाचा जाणीवपूर्वक शोध घेण्यापूर्वीच अपिलार्थीस क्रमांक २३८८/८२ चे प्रकरण कालबाह्य झाले असल्याचे कळविले. सदर जन माहिती अधिका-याची कृती निश्‍चितच योग्य नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने सुरुवातीस खोटी माहिती दिली. त्यानंतर विलंबाने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. याबाबत जन माहिती अधिका-या विरुध्द उक्त अधिनियम कलम २० (१) अन्वये रुपये २५००० दंड का आकारण्यात येऊ नये याबाबत हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत प्रत्यक्ष भेटून जन माहिती अधिका-याने आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६८

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलकर्ता
माणिकनगर, माणिक चौक,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, भूम,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांचेकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी अर्ज करुन कृषिच्या रोहयो व धान्य वाटपाविषयक अनुषंगीक माहिती मागितली. अपिलार्थीने मागितलेली माहिती अतिशय विस्तृत स्वरुपात असल्याने, कागदपत्रांची मोठ्या प्रमाणात उलाढाल होणार असल्याने ती पुरविता येणार नाही तथापि नेमक्या कोणत्या गावातील, कोणत्या कामाची व कोणत्या वर्षातील माहिती पाहिजे हे कळविल्यास आवश्यक ती माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक १०-१०-२००६ च्या पत्राने कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भूम यांच्याकडे दिनांक २६-१०-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाही यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात

आली.  सुनावणीची नोटीस यु. पी. सी. ने दिनांक २९-०९-२००८ रोजी पाठवूनही जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते अपिलकार हजर होते.

अपिलातील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उक्त अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दाखल केलेल्या अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करणे आवश्यक होते.  परंतू सदर कार्यवाही त्यांनी केलेली नाही.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-याने या प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आवश्यक ते आदेश पारित करावेत.  त्यानंतर अपिलार्थीचे समाधान न  झाल्यास त्यांचा राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहिल.  सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद                                                            ( रामानंद तिवारी )

दिनांक     १३-१०-२००८                                            राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६९

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, अपिलकर्ता

माणिकनगर, माणिक चौक,

उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर

जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी उत्तरवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर

जिल्हा उस्मानाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांचेकडे दिनांक ०३-१०-२००६ रोजी अर्ज करुन रोहयोविषयक माहिती व रोहयो कामातील गैरव्यवहार आणि अनियमितता संदर्भातील अनुषंगीक माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती मंडळ कृषि अधिकारी, तुळजापूर, काटो, सलगरा (दि), नळदुर्ग, अंदुर इत्यादी कार्यालयाशी संबंधित असल्याने जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी तुळजापूर यांनी सर्व सर्व मंडळ कृषि अधिकारी यांना दिनांक ०१-१०-२००६ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीस ३० दिवसाचे आत माहिती देण्याबाबत कळविले. तसेच अपिलार्थीस याबाबत अवगत करण्यात आले. माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर यांच्याकडे दिनांक ०१-११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीची नोटीस यु. पी. सी. ने दिनांक २९-०९-२००८ रोजी पाठवूनही जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते अपिलकार हजर होते.

अपिलातील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, उक्त अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दाखल केलेल्या अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने विहित कालावधीत सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करणे आवश्यक होते. परंतू सदर कार्यवाही त्यांनी केलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-याने या प्रकरणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आवश्यक ते आदेश पारित करावेत. त्यानंतर अपिलार्थीचे समाधान न झाल्यास त्यांचा राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा हक्क अबाधित राहिल. सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( रामानंद तिवारी )

दिनांक १३-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७०

निर्णय दिनांक १३-१०-२००८

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, : -----अपीलकर्ता
रा.परळी वैजनाथ,
जि.बीड

**विरुध्द**

१ माहिती अधिकारी,
कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय,
परळी वैजिनाथ,जि.बीड

२ अपिलीय अधिकारी,
कै.लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय,
परळी वैजिनाथ जि.बीड ------उत्तरवादी

**<u>विवेचन</u>**

अपिलकार सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर रा. परळी वैजनाथ जि.बीड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) अन्वये दि. २९.५.२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी, कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ जि.बीड यांच्याकडे सन १९९७ मध्ये शिक्षकेत्तर पदाची जाहीरात प्रभारी प्राचार्य पदाच्या जाहीरातीच्या अगोदरच देण्यात आली, याबाबतच्या एकूण ३० मुद्यांची अनुषंगीक माहिती मागितली होती. या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी दि. २८.६.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहितीपोटी रु.६८२/- भरणेबाबत कळविले. त्यानंतर मुद्दा क्र. १४ ते २० याकरिता अपिलार्थीस रु. ७७२/-असे एकूण रु. १४५४/- शुल्क भरण्याचे दि. १.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. त्यानुसार अपिलार्थीने दि. ३.८.२००६ रोजी शुल्क भरले. तरीही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या,कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ यांच्याकडे दि. २९.७.२००६ अन्वये प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी आयोजित केली नाही,

माहिती दिली नाही, यामुळे व्यथित होऊन अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड, डॉ.व्ही.व्ही.देशपांडे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड डॉ. रेखा जनार्दनराव परळीकर तसेच अपिलकार सौ. संध्या आसेगावकर हे हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीपोटी शुल्क न भरता प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे दि.२९.७.२००६ रोजी प्रथम अपिल दाखल केले. अपिलार्थी यांनी विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी व मिळालेल्या माहितीबाबत काही आक्षेप असल्यास अपिलार्थी यांना पुन्हा प्रथम अपिल दाखल करण्याचा हक्क अबाधित राहील, असे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.१.८.२००६ रोजी आदेश पारीत केले. अपिलार्थीने दि. ३.८.२००६ रोजी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली असल्याचे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, रा.परळी वैजिनाथ जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, परळी वैजिनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, परळी वैजिनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७१

निर्णय दिनांक १३-१०-२००८

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, : **-----अपीलकर्ता**
रा.परळी वैजनाथ,
जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,उच्च शिक्षण संचालनालय,
पुणे-१

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक उच्च शिक्षण संचालनालय,
पुणे-१ **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर रा. परळी वैजनाथ जि.बीड दि. २३.५.२००६ रोजीच्या अर्जान्वये माहिती अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडे कै. लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड येथील मुख्य लिपीक श्री. प्रमोदराव पत्की यांचे वय क्षमापनाबाबत एकूण १० मुद्यांबाबत माहिती मागितली होती.

अपिलार्थीने, मागितलेली माहिती ही माहितीच्या व्याख्येप्रमाणे नाही असे नमूद करुन जन माहिती अधिकाऱ्याने माहिती नाकारली. त्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उच्च शिक्षण संचालनालय,पुणे यांच्याकडे दि. २६.६.२००६ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.७.२००६ रोजी सुनावणी घेतली. वय क्षमापित करण्यात आलेल्या श्री. पत्की यांची यापूर्वीची सेवा त्याच संस्थेतील /महाविद्यालयातील आहे किंवा कसे, याबाबत संस्थेतून माहिती मागविलेली आहे. सदर माहिती प्राप्त होताच सौ. संध्या आसेगावकर यांना कळविण्यात येईल, असे नमूद करुन आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने दि. १९.९.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. सुनावणीकरिता,श्री. लक्ष्मण दत्तात्रय कोकाटे, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय,पुणे-१, डॉ. रामभाऊ विश्वनाथ किर्दक ,जन अपिलीय अधिकारी तथा संचालक उच्च शिक्षण संचालनालय,पुणे-१ तसेच अपिलकार सौ. संध्या आसेगावकर हे हजर होते.

सुनावणीचे  वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, श्री. प्रमोदराव पत्की,मुख्य लिपीक,कै.लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ जि.बीड यांचे वय क्षमापित करण्यास दि.११.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली होती. सदर वय क्षमापित करण्यास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात येत असल्याबाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) औरंगाबाद विभाग यांना दि. ८.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. सदर पत्राची प्रत अपिलार्थीस दि. ११.९.२००६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. श्री. पत्की यांच्या वय क्षमापनासंबंधी अपिलार्थीने माहिती मागितली होती. श्री. पत्की यांचे वय क्षमापनाबाबतचे आदेशच रद्द करण्यात आले. या परिस्थितीत या प्रकरणी अधिक कार्यवाही अपेक्षित नसल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक :	१३-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१.	सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर, रा.परळी वैजिनाथ जि.बीड

२.	जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७२

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, अपिलकर्ता
गौरीकुंज श्री. बालाजी ट्रेडर्स, आडत दुकान मार्केट,
परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. वसंत संपतराव मुंडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई जिल्हा बीड यांचेकडे दिनांक २३-११-२००५ रोजी अर्ज करुन केज विधानसभा मतदार-संघातील अंबाजोगाई, धारुर, केज येथील रोजगार हमी योजनामधील कामाची यादी, अंदाजपत्रके, पूर्ण झालेली कामे, अपूर्ण कामे, मंजूर असलेली कामे, अंदाजपत्रकासहीत माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने माहितीपोटी दिनांक १७ मार्च २००६ च्या पत्रान्वये रुपये १३,८४० इतके शुल्क तसेच २२ मार्च २००६ च्या पत्राने रुपये ८०,००० इतके शुल्क भरण्याबाबत विलंबाने अपिलार्थीस कळविले. यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक १३-०३-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेऊन दिनांक ०२ मे २००६ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याने जवळपास ९० दिवस उशिराने अर्जदारास फी भरण्याचे सुचविले. वस्तुतः याबाबत उक्त अधिनियमातील कलम ७ पोटकलम ६ प्रमाणे सदर

प्रकरणी कार्यवाही झालेली नाही ही बाब नमूद करुन अर्जदारास तात्काळ माहिती देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-याने आदेशित करुन अपील निकाली काढले. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार माहिती दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मोठ्या प्रमाणात माहिती मागितलेली दिसते. सदर माहितीपोटी एकूण ९३,८४० रुपये इतके शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस विलंबाने कळविले. प्रथम अपिलीय अधिका-याने सदर बाब लक्षात घेऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक ०२ मे २००६ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार सर्व आवश्यक ती माहिती (एकूण १८,००० पाने) तयार करुन सुनावणीच्या वेळी सादर केली. अपिलार्थीने सदर माहिती सुनावणीच्या वेळी घेण्यास नकार दिला. सदर माहिती जन माहिती अधिका-याच्या कार्यालयातून घेण्यात येईल असे अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी सांगितले. जन माहिती अधिका-याने माहिती तयार ठेवली असून अपिलार्थी सदर माहिती कार्यालयातून घेणार आहे. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( रामानंद तिवारी )

दिनांक १३-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७३ व १६७४

१ ॲड. विजय सितारामपंत खारकर, : **-----अपीलकर्ता**
१८, पितृकृपा,आदर्शनगर,सेलू,
जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगरपरिषद,सोनपेठ,
जि.परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.)
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार ॲड. विजय सितारामपंत खारकर,यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.५.२००७ व २६.७.२००७ रोजी प्रत्येकी एक याप्रमाणे दोन द्वितीय अपीले दाखल केली. अपिलार्थी यांनी दि. ३.२.२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, सोनपेठ यांच्याकडे केंद्र शासन, राज्य शासनाच्या विविध योजना कर्ज/अनुदान तसेच आमदार/खासदार फंडाच्या विविध अनुदानातून पूर्ण करण्यात आलेल्या सर्व विकास कामांची एकूण १० मुद्यांबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ३.३.२००७ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपीले केली. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २१.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २६.४.२००७ रोजी पारित केले. या आदेशानुसार अपिलार्थी यांनी मागणी केलेली सर्व माहिती छायांकित प्रतींच्या स्वरुपात विनामूल्य खास दूतामार्फत पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले.

तथापि माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती उपलब्ध करुन दिली नाही, या कारणावरुन आयोगाकडे दोन द्वितीय अपिले दाखल केली आहेत.

सदर अपिलावर आज दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी गैरहजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना देणेबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊनही अपिलार्थीस त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच सुनावणीची नोटीस प्राप्त होऊन तसेच दूरध्वनीद्वारे कळवूनही जन माहिती अधिकारी सुनावणीस उपस्थित नव्हते. या परिस्थितीत मी अपिलार्थीचे अपील मान्य करुन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. सुनावणीसाठीची सूचना मिळूनही ते गैरहजर राहिले. याबाबत त्यांचेविरुध्द केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत आयोगाकडे खुलासा सादर करावा.

**-आदेश-**

**सबब दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. ॲड. विजय सितारामपंत खारकर,१८, पितृकृपा,आदर्शनगर,सेलू,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,सोनपेठ,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५३

१ श्री. सुभाष साहेबराव पाटील, : **-----अपीलकर्ता**
रा.मु.पो.तांदुळवाडी, ता.भडगाव जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सदस्य सचिव,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त/अध्यक्ष,
जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,
नाशिक. **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. सुभाष साहेबराव पाटील रा.तांदुळवाडी ता.भडगाव जि.जळगाव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये विहित नमुन्यात द्वितीय अपील दाखल करण्याऐवजी कलम १९(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ९.१.२००७ रोजी अपील दाखल केले. अपिलकाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५.५.२००६ रोजी अर्ज करुन, नाशिक विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने २५ पेक्षा जास्त जाती प्रमाणपत्र अवैध ठरवून प्रमाणपत्रधारण करणाऱ्या व्यक्ती तसेच या संदर्भात पाचोरा- श्री. यशवंत सोनवणे (प्रांत),श्री.दिलीप महाजन व इतर ७ अधिकारी वर्गावर गुन्हे दाखल केले. मालेगाव,पाचोरा,भुसावळ,जळगाव या उपविभागात 'राजपूत भामटा' या जातीची प्रमाणपत्रे दिली आहेत, त्यांची नावांसह यादी व संबंधित अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईच्या आदेशाच्या नकला मिळणेबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिकाऱ्याने मागितलेली आवश्यक माहिती विहित कालावधीत दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे दि. २१.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल

केले. सदर अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत, म्हणून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलाची आज दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, मालेगाव, पाचोरा,भुसावळ,जळगाव या उपविभागात राजपूत भामटा या जातीची प्रमाणपत्र, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,नाशिक यांनी अवैध ठरविली आहेत. याबाबतची कागदपत्रे अपिलार्थीने मागितली आहेत. समितीने अवैध ठरविलेल्या जाती प्रमाणपत्रासंबंधीची माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावीत. 'राजपूत भामटा' जातीची प्रमाणपत्र धारण करणारे तसेच सदर जाती प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित एकूण सात अधिकाऱ्यांवर दाखल केलेल्या गुन्हयासंबंधीची सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद** **( रामानंद तिवारी )**
**दिनांक : १३-१०-२००८** **राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष साहेबराव पाटील,रा.मु.पो.तांदुळवाडी, ता.भडगाव जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त/अध्यक्ष,जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१,नाशिक.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५४

१ श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल, अपिलकर्ता
रा. बोदवड मेनरोड,
जिल्हा जळगांव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक आयुक्त (विकास),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा उप आयुक्त (विकास),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

**विवेचन**

अपिलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडे दिनांक ३१-०७-२००६ रोजी अर्ज करुन त्यांनी दिनांक २०-०६-२००६ रोजी रजिस्ट्र पोस्टाने पाठविलेल्या तक्रार अर्जाबाबत काय झाले याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याकडून सदर अर्जावर कार्यवाही न झाल्यामुळे व दखल न घेतली गेल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांच्याकडे दिनांक ३० सप्टेबर २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

उप आयुक्त (विकास), नाशिक यांनी दिनांक २८-०७-२००६ च्या पत्रानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना अपिलार्थीच्या अर्जानुसार सखोल चौकशी करुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही सत्वर करण्याचे कळविले व त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात आली. तथापि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने

राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, गट क्रमांक १७४ च्या लगत असलेला रस्ता गाववहिवाटीचा असून ग्रामपंचायत बोधवड यांच्या आखत्यारित आहे. हरिजन वस्ती जोडरस्ता योजने अंतर्गत सदर रस्त्यावर सन २००० मध्ये खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले होते. सदर डांबरीकरण ३ मीटर रुंदीत व ११७० मीटर लांबीत करण्यात आले होते. सदर कामाकरिता रुपये ४,६८,२३८ इतका खर्च आला. गट क्रमांक १७४ च्या पश्चिमेस असलेल्या व बांधकाम विभागाने डांबरीकरण केलेल्या गट क्रमांक ३१/१ मधील शासकीय रस्ता व ग्रामपंचायतने दिनांक २७-१२-१९८० च्या ठरावाने श्री. कान्हे यांना दिलेली जागा यामध्ये सुमारे २० फूट अंतर आहे याची ग्रामकिास अधिकारी बोधवड यांनी पाहणी केली. सार्वजनिक बांधकाम विभागाने डांबरीकरण केलेल्या रस्त्यावर श्री. कान्हे यांची जागा नाही. ग्रामपंचायतीने दिनांक २७-१२-८० ठराव क्रमांक १२/७ नुसार ग्रामपंचायतीने फी भाडे वसूली केलेली आहे अशी माहिती ग्रामविकास अधिकारी बोधवड यांनी दिनांक २२-०९-२००६ च्या पत्राने अपिलकारास दिली असल्याचे अपिलातील कागदपत्रांवरुन दिसून येते. अपिलार्थी सुनावणीकरिता हजर नव्हते या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## <u>आदेश</u>

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५५

निर्णय दिनांक १३-१०-२००८

१ श्री. एकबाल अहमद अब्दुल अजीज, : **-----अपीलकर्ता**
२७९, मोतीपुरा, मालेगाव जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, तहजीव प्रा.शाळा,
बजरंगवाडी, मालेगाव जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगाव जि.नाशिक **------उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपिलकार श्री. एकबाल अहमद अब्दुल अजीज रा. मालेगाव जि.नाशिक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात दि. १३.२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक तहजीब प्राथमिक शाळा,मालेगाव जि.नाशिक यांच्याकडे अर्ज करुन तहजीब प्रायमरी शाळेमध्ये विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणारे शुल्क व त्यासंबंधीची एकूण ५ मुद्यांची अनुषगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ७.४.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, मालेगाव महानगर पालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर कोणताही आदेश/निर्णय पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलाची आज दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याने विहित कालावधीत उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची ही कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांचे आत प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. यासंबंधी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर, त्यांचा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अधिकार अबाधित राहील.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. एकबाल अहमद अब्दुल अजीज,२७९, मोतीपुरा, मालेगाव जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तहजीब प्रा.शाळा, बजरंगवाडी, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, मालेगाव महानगरपालिका, शिक्षण मंडळ,मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५६

निर्णय दिनांक १३-१०-२००८

१ श्री. खलील महंमद मो.बशीर, : **-----अपीलकर्ता**
४२५, किल्ला रविवार वॉर्ड,
मालेगाव, जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, तहजीव प्रा.शाळा,
बजरंगवाडी, मालेगाव जि.नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ, **------उत्तरवादी**
मालेगाव जि.नाशिक

**विवेचन**

अपिलकार श्री. खलील महंमद मो.बशीर, रा.मालेगाव जि. नाशिक यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.५.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. ०६.०२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तहजीब प्राथमिक शाळा,मालेगाव जि.नाशिक यांचे शाळेमध्ये अध्यापन तासिका घेण्याबाबतची एकूण ४ मुद्यांबाबतअनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ७.४.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,मालेगाव महानगरपालिका शिक्षण मंडळ, मालेगाव जि.नाशिक यांच्याकडे प्रथम अपील केले.प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहित कालावधीमध्ये सुनावणी आयोजित केली नाही, माहिती दिली नाही, यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर आज दिनांक १३.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी अहवालाची तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने तहजीब प्राथमिक शाळा, मालेगाव यांचेकडे अध्यापन तासिका घेण्यासंबंधीची अनुषंगीक माहिती मागितली होती. सदर शाळा खाजगी असल्याने शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असतात. सदर शाळेच्या संस्थेचे सचिव हे प्रथम अपिलीय अधिकारी असतात. त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी, महानगरपालिका,शिक्षण मंडळ,मालेगाव यांनी दि. ६.१०.२००८ च्या पत्रान्वये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविले. अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये यासंबंधीची माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत शिक्षण संचालकांनी सर्व संबंधितांना परिपत्रक निर्गमित करुन सूचना दिल्या आहेत. तहजीब प्राथमिक शाळा ही महानगर पालिका शिक्षण मंडळ, मालेगाव यांचे कार्यक्षेत्रातील आहे. शालेय शिक्षण विभागाच्या शाळा संहितेनुसार शिक्षण संस्थांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी अपिलार्थीने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १३-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. खलील महंमद मो. बशीर, ४२५, किल्ला, रविवार वॉर्ड मालेगाव जि.नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तहजीब प्रा.शाळा, बजरंगवाडी, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी, मालेगाव महानगरपालिका, शिक्षण मंडळ,मालेगाव जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६२

१ श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर, अपिलकर्ता
मु. पो. डुबेरे, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, डुबेरे, तालुका सिन्नर,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

**विवेचन**

अपिलार्थी श्री. दत्तात्रेय सोमनाथ रत्नाकर, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, डुबेरे, तालुका सिन्नर, जिल्हा नाशिक यांचेकडे दिनांक ०६-०६-२००६ रोजी अर्ज करुन दिनांक २६-५-२००३ च्या मासिक मिटींगच्या ठरावानूसार ज्या ग्रामपंचायत मिळकतीत घर बांधले आहे त्या मिळकतीचा ग्रामपंचायत रेकॉर्ड नं. ८ चा उतारा मिळावा, दिनांक७-७-२००५ च्या मासिक मिटींगच्या ठरावानुसार जादा जागेत घर बांधले ती जागा कोणाची यासह सदर मिटींगच्या ठरावाच्या सदर मिटींग अजिंड्याच्या प्रती सभासदांना दिल्याच्या व उपस्थित सदस्याच्या सह्यासह प्रोसिडिंग ठरावाची व अजिड्यांची दिलेल्या नक्कल मिळावी अशी माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिनांक ०६-०६-२००६ च्या पत्राने चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, नाशिक यांच्याकडे दिनांक ०५ जुलै २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १३-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, गाव नमुना ८ अनुसार डुबेरे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जागा अपिलार्थीच्या मालकीची आहे. सदर जागेवर बांधकाम करण्यात आलेले आहे. ग्रामपंचायतीच्या कागदपत्रानुसार २० चौरस मीटर ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण करुन अनधिकृतरित्या बांधकाम करण्यात आलेले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती, डुबेरे तालुका सिन्नर येथील सीटी सर्व्हे नंबर ३६२ चे हद्द कायम मोजणी नक्कल, गाव नमुना क्रमांक ८ ची नक्कल, मासिक सभा दिनांक २६ मे २००३ च्या अहवालाची नक्कल इत्यादी कागदपत्र सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस आयोगासमोर दिली. यावरुन सदर प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिका-याने उपलब्ध करुन दिली आहे. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १३-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७५

१ श्री. सरदार हरजित सिंग तिरथ सिंग सहानी, — अपिलकर्ता
५-१-५५/१, उस्मानपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तलाठी, सातारा परिसर,
औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी — उत्तरवादी
तथा तहसीलदार, औरंगाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. सरदार हरजित सिंग तिरथ सिंग सहानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सातारा परिसर, औरंगाबाद यांचेकडे दिनांक ११-०७-२००६ रोजी अर्ज करुन गट क्रमांक १३९ सातारा परिसर औरंगाबाद, ७/१२ वर फेरफार क्रमांक ६१४ जमीन विकणारे लोक, जमिनीचे पूर्वीचे कब्जेदार म्हणून ७/१२ वर त्यांचे नांव नोंद घेतल्याचा पुराव्याची कागदपत्रे, त्यात कमी केलेल्या फेरफाराची प्रत, ७/१२ वर फेरफार क्रमांक ६१४ कमी करुन जे फेरफार नोंद करण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दिनांक ११-०८-२००६ च्या पत्राने माहिती दिली.

जन माहिती अधिका-याने मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती दिली नाही यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २२-०८- २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेतले तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तथा तलाठी सातारा परिसर औरंगाबाद यांनी अपिलार्थीस अपुरी माहिती दिली, प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार औरंगाबाद यांनी प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन हे आदेश प्राप्त झालेपासून ४५ दिवसाचे आत आवश्यक ते आदेश पारित करावेत. यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर त्यांचा राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा अधिकार अबाधित राहिल. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७६

१ श्री. सरदार हरजित सिंग तिरथ सिंग सहानी, अपिलकर्ता
५-१-५५/१, उस्मानपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप आयुक्त (म), महानगरपालिका,
औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा आयुक्त, महानगरपालिका,
औरंगाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. सरदार हरजित सिंग तिरथ सिंग सहानी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (म), महानगरपालिका, औरंगाबाद यांचेकडे अर्ज करुन घर क्रमांक ५-१-५५ उस्मानपूरा औरंगाबाद या मिळकतीवर बिना परवाना बांधकाम चालू असल्यासंदर्भात दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीचा माहितीच्या अधिकारातील दिनांक २४-०५-२००६ चा अर्ज, कार्यालयातील अभिलेखाची तपासणी केली असता प्राप्त झाला नसल्याचे माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक १९-०६-२००६ च्या पत्राने कळविले.

जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दिनांक १८-०७-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही, आदेश पारित केले नाहीत यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल

केले. सदर अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हे हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, घर नंबर ५-१-५५ उस्मानपूरा, औरंगाबाद ही मालमत्ता सरदार हरनामसिंग जगतसिंग बिद्रा व हकीम मोहमद उस्मानखान यांच्या नावावर आहे. या लोकांनी १९८१ पासून मालमत्ता कर भरलेला नाही. सध्या सदरील मिळकत व्यवसायाकरिता वापरली जात असून त्याप्रमाणे सुधारीत कर भरला जात नाही. सदर मालमत्तेची पाहणी करुन सुधारीत कर आकारण्यात यावा. महानगरपालिकेचे होणारे नुकसान टाळावे. सदर मिळकतीवर विनापरवाना बांधकाम चालू असल्याची बाब अपिलार्थीने महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, उक्त मालमत्ता धारक कोण आहेत त्यांना सुधारीत मालमत्ता कर भरण्याबाबत महानगरपालिकेच्या अधिनियमानुसार नोटीस द्यावी. या प्रकरणी अपिलार्थीने मागितलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७७

१ श्री. श्रीरंग मारुती वारे, : **-----अपीलकर्ता**
मेहराज होटेल जयसिंगपुरा,औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय,
औरंगाबाद.

२ प्रथम अपिलीय अधिकारी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय,
औरंगाबाद. **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. श्रीरंग मारुती वारे, रा.औरंगाबाद यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २२.५.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी, डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालय,औरंगाबाद यांच्याकडे, महाविद्यालयीन शिक्षकांच्या सुट्टयांच्यासंदर्भात अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. २२.०६.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयातील यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही.आदेश पारित केले नाहीत, यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन

माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते.अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांचे म्हणणे ऐकून तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी औरंगाबाद येथील डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयातील प्राचार्य श्री. बेग हे शैक्षणिक वर्ष २००५-०६ या वर्षात परीक्षेच्या काळात हजर नव्हते, त्याविषयीचे प्रमाणासह कारणे द्यावीत, गैरहजर कालावधी नमूद करावा, प्रा. बेहरा व भारती यांनी घेतलेल्या सुट्टयांचे विवरण (परीक्षेच्या कालावधीसह) शैक्षणिक वर्ष २००५-०६ या संबंधीची माहिती मागितली होती.जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत अपिलार्थीस माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणी हे आदेश प्राप्त झ ााल्यापासून ४५ दिवसांच्या आत प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयावर अपिलार्थीचे समाधान न झ ााल्यास अपिलार्थीचा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याचा अधिकार अबाधित राहील.

जन माहिती अधिकाऱ्याने सदर प्रकरणी विहित कालावधीत अपिलार्थीस माहिती दिली नाही, ही कृती निश्चितच योग्य नाही. जन माहिती अधिकाऱ्यांच्या या कृतीबाबत त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० (१) अनुसार दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत ३० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर करावा,

अन्यथा त्यांच्याविरुध्द कायद्यातील तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीरंग मारुती वारे,मेहराज होटेल जयसिंगपुरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७८

१ श्री. फारुक बाबू तगले, : **-----अपीलकर्ता**
रा.बाबा रमजान गल्ली किनवट,
जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
अन्न व नागरी पुरवठा अधिकारी,
तहसील कार्यालय,किनवट,
जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, किनवट
जि.नांदेड **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. फारुक बाबू तगले, रा. किनवट जि.नांदेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.७.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. १५.७.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा अन्न व नागरी पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय,किनवट जि.नांदेड यांच्याकडे परिशिष्ट- अ, रास्त भाव दुकान तपासणी नमुन्याची प्रत, एप्रिल, २००४ पासून जुलै, २००६ पर्यंत झालेल्या तपासणीची माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ५.९.२००७ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तहसीलदार, किनवट यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर आदेश पारित केले नाहीत, यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर आज दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती व अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी किनवट शहरातील सर्व स्वस्त धान्य दुकानाचे एप्रिल, २००४ ते जुलै, २००६ या कालावधीत केलेल्या तपासणीचा परिशिष्ट अ मधील नमुन्याची प्रत मागितली होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित कालावधीत दिली नाही. त्यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. याबाबत त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २०(१) अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबत तीस दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. फारुक बाबू तगले,रा.बाबा रमजान गल्ली किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अन्न व नागरी पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय,किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६७९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. नारायण रामभाऊ आहिरे,<br>संस्था संस्थापक, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था,<br>उंडणगाव, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | अपिलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा चिटणीस, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था,<br>उंडणगाव, तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी<br>तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>औरंगाबाद | उत्तरवादी |

**विवेचन**

अपिलार्थी श्री. नारायण रामभाऊ आहिरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, उंडणगाव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांचेकडे अर्ज करुन संस्थेच्या संदर्भात १९९५ पासून बांधकामाचा हिशोब विटा, रेती, सिमेंट व पत्रे किती, मजूरी व इतर खर्च किती इत्यादी माहिती मागितली होती.

माहितीचा अर्ज विहित नमुन्यात नाही, माहिती हस्तपोच हवी की पोस्टाने याबाबत अर्जात उल्लेख नाही, माहितीकरिता विहित नमुन्यातील अर्ज भरुन कार्यालयास द्यावा त्यानंतर आवश्यक ती माहिती त्वरित पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस दिनांक १७-०६-२००६ च्या पत्राने कळविले. संस्थेच्या लेखा परिक्षणाची तसेच संस्थेच्या निधीचा हिशोब, बांधकामावर झालेला खर्च इत्यादी माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सदर अपील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांचे कक्षेत येत नाही. कारण अपिलार्थीने मागितलेली माहिती संस्था स्तरावरील आहे असे प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणीच्या वेळी प्रतिपादन केले.

अपिलार्थीने मागितलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून या प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा सचिव सावित्रीबाई फुले संस्था उंडणगाव तालुका सिल्लोड यांनी आवश्यक ती कागदपत्रे अपिलार्थीस तपासणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. त्यानंतर अपिलार्थीच्या मागणीप्रमाणे आवश्यक त्या उपलब्ध कागदपत्राच्या फोटोप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत द्याव्या.

**<u>आदेश</u>**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. हामेद खाजामैनोद्दीन खुरेशी,<br>आजादनगर, जळकोट रोड, उदगीर,<br>जिल्हा लातूर | अपिलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (मा.),<br>जिल्हा परिषद, लातूर | |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षण उपसंचालक,<br>लातूर | उत्तरवादी |

**विवेचन**

अपिलार्थी श्री. हामेद खाजामैनोद्दीन खुरेशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर यांचेकडे दिनांक ०८-०३-२००७ रोजी अर्ज करुन बी. एड साठी सेवाअंतर्गत ज्या उमेदवाराची शिफारस केली होती त्याबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे ०५-०४-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक ०५-०५-२००७ रोजी सुनावणी आयोजित केली, सेवाअंतर्गत बी. एड साठी शाळेने दाखल केलेल्या प्रस्तावावर शिक्षणाधिकारी प्रतिस्वाक्षरी करुन देतात. अशा याद्या ठेवण्याची पध्दत नसल्यामुळे संबंधितास माहिती देता येत नाही असे उपशिक्षणाधिकारी श्री. चंदनशिवे यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी प्रतिपादन केले. यापुढे सेवाअंतर्गत बी. एड साठी शिफारशीसाठी आलेल्या प्रस्तावाची एक प्रत कार्यालयामध्ये ठेऊन घ्यावी व नोंदवही तयार करुन त्यामध्ये अशा प्रकारच्या नोंदी घ्याव्यात अशी प्रथम अपिलीय अधिका-याने जन माहिती अधिका-यांना निर्देश दिले. याबाबत अपिलार्थीस दिनांक ०७ मे २००७ च्या पत्राने अवगत

करण्यात आले. उप संचालक शिक्षण विभाग लातूर यांनी दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी अपिलार्थीस दिनांक ०७ मे २००७ च्या पत्रान्वये समर्पक माहिती दिली असल्याने यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. सुनावणीकरिता अपिलार्थी हजर नव्हते. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८१

१ श्री. धनंजय रामदास गुळवणे, : **-----अपीलकर्ता**
द्वारा ए.एम.साळुंके, यशोदा, जायकवाडी रोड
वडीगोद्री ता.अंबड जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग, अंबड जि.जालना
२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित **------उत्तरवादी**
जालना-२.

**विवेचन**

अपिलकार श्री. धनंजय रामदास गुळवणे रा.वडीगोद्री, ता.अंबड जि.जालना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. ३१.३.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,उपविभाग, अंबड जि.जालना यांच्याकडे श्री. रामदास बाबूराव गुळवणे यांच्या कृषिपंपाच्या देयकाबाबत ९ मुद्यांवर माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ०८.०६.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,जालना-२ यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतल्याची कागदपत्रे अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडलेली नाहीत, तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची दि. २७.६.२००६ रोजी सुनावणी आयोजित करुन अपिलीय अधिकारी कार्यालयात गैरहजर राहिले. त्यानंतर दि. १२.७.२००६ रोजी सुनावणी घेतली

परंतु त्यावर कोणताही निर्णय दिला नाही, या कारणासाठी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर आज दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती, प्रथम अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे तिघेही हजर नव्हते.

सुनावणीच्या अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. ८.६.२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली किंवा कसे व घेतली असल्यास आदेश निर्गमित केले नाहीत, ही वस्तुस्थिती पाहता, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थी यांनी दिनांक ८.६.२००६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपले आदेश त्याचवेळी पारित करावेत.अपिलार्थी यांना सदर आदेश मान्य नसल्यास ते आयोगाकडे पुन्हा द्वितीय अपील दाखल करु शकतील.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धनंजय रामदास गुळवणे,द्वारा ए.एम.साळुंके, यशोदा, जायकवाडी रोडवडीगोद्री ता.अंबड जि.जालना

२. जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, अंबड जि.जालना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित जालना-२.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८२

१ श्री. गुरुदत्त पुंडलिक कांबळे, : **-----अपीलकर्ता**
रा.सुभेदार रामजीनगर, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,
लातूर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
लातूर **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. गुरुदत्त पुंडलिक कांबळे रा. लातूर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.८.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २१.२.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, लातूर यांच्याकडे त्यांचे वडील श्री. पुंडलिक गोविंदराव कांबळे हे शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर चतुर्थ श्रेणीतील पदावर सेवेत घेणेकरिता दिलेल्या अर्जासंबंधी तसेच त्यांना सेवेत समाविष्ट करुन न घेतल्यामुळे त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यातील शासनातर्फे सादर केलेल्या शपथपत्र तसेच मागासवर्गीयाच्या अनुशेषासंबंधीची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना या प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणामध्ये याचिका प्रलंबित असल्यामुळे न्यायप्रविष्ट प्रकरणाची माहिती संबंधितांस देता येत नाही. तसेच उच्चस्तरीय समितीने शिफारस केल्यानुसार वर्ग-४ च्या पदाचा सध्या अनुशेष शिल्लक नाही, असे कळवून अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. १७.७.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही, तथापि माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १७.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती कळविली असल्यामुळे त्या पत्राची प्रत दि. ३.८.२००६ रोजीच्या पत्रासोबत जोडून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. अपिलार्थी यांनी माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी बनावट पत्रव्यवहार करुन दि. १७.३.२००६ रोजीचे पत्र त्यांना पाठविले, या कारणासाठी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती, प्रथम अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे तिघेही हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपील अर्जासोबतच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना न्यायप्रविष्ट प्रकरणाची माहिती देता येत नसल्याचे व अनुशेष शिल्लक नसल्याचे कळविले आहे व न्यायप्रविष्ट प्रकरणामुळे माहिती नाकारली. ही वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील खारीज करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गुरुदत्त पुंडलिक कांबळे,रा.सुभेदार रामजीनगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५७

१ श्री. रविंद्र नामदेव इंगळे, : **-----अपीलकर्ता**
७६, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी,
देवपूर,धुळे.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,
पंचायत समिती,शहादा,
जि.नंदूरबार

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता,
जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग, **------उत्तरवादी**
पंचायत समिती,शहादा,
जि.नंदूरबार

**<u>विवेचन</u>**

अपिलकार श्री. रविंद्र नामदेव इंगळे, रा.देवपूर जि.धुळे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.११..२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. ८.५..२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,पंचायत समिती,शहादा, जि.नंदूरबार यांच्याकडे विविध योजनेखाली करण्यात आलेले पाझर तलाव, गावतलाव के.टी.वेअर्स आदी कामांची त्यांनी दिलेल्या नमुन्यात माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. १.७.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,पंचायत समिती,शहादा जि.नंदूरबार यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही, तसेच आदेश पारित केले नाहीत म्हणून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते व अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांना दि. ७.१२.२००६ रोजी आवश्यक माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यासंबंधी अपील अर्जासोबतच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. त्यावरुन असे आढळून आले की, जन माहिती अधिकारी यांनी दि. ४.१२.२००६ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थीस माहिती पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस दि. ७.१२.२००६ रोजी प्राप्त झाल्यासंबंधीची पोच पावती वरुन दिसून येते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रविंद्र नामदेव इंगळे,७६, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी,देवपूर,धुळे.

२. जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,पंचायत समिती,शहादा,जि.नंदूरबार या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी उपअभियंता,जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभाग,पंचायत समिती,शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६०

१ श्री. लिलाधर दगडू भंगाळे, : **-----अपीलकर्ता**
रा.मु.पो.आसोदा ता.जि.जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय,
जळगाव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
जळगाव **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. लिलाधर दगडू भंगाळे,रा.मु.पो.आसोदा ता.जि.जळगाव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. ९.८.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय,जळगाव यांच्याकडे जळगाव शहर हद्दीतील प्लॉट नं. २६९ क्षेत्र ३६७.०० चौ.मि.बिनशेती दि. ५.४.१९९९ च्या आदेशाच्या प्रमाणित नकलांची मागणी केली होती.या अर्जासंबंधी तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. १२.१०.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ३०.१०.२००६ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केले. सदर आदेशामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच अपिलार्थीच्या माहितीच्या अधिकारान्वये दाखल अर्जाबाबत केलेल्या दिरंगाईबाबत दखल घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीची कागदपत्रे प्रमाणित करुन आठ दिवसांचे आत अपिलार्थीस पुरविण्यासंबंधी आदेश दिले होते .तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपिलावर दिनांक १४.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता सहा.जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी सहा. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे सन १९९९ च्या दरम्यानची आहेत. कागदपत्रे जतन करण्याच्या आदेशानुसार ही कागदपत्रे ब-श्रेणीमध्ये मोडतात. अशी कागदपत्रे ३० वर्षापर्यंत जतन करण्यात येतात. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता ही एक गंभीर स्वरुपाची बाब आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या जाणीवपूर्वक कसून शोध घ्यावा व हे आदेश प्राप्त झाल्यापासून अपिलकारास तीस दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.अन्यथा जन माहिती अधिकाऱ्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लिलाधर दगडू भंगाळे,रा.मु.पो.आसोदा ता.जि.जळगाव

२. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६६१

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. समशेर खॉ तुकडू खॉ,<br>मु. पो. सोनगीर, तालुका धुळे,<br>जिल्हा धुळे | अपिलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सरपंच ग्रामपंचायत, सोनगीर, तालुका धुळे,<br>जिल्हा धुळे | |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, धुळे | उत्तरवादी |

**विवेचन**

अपिलार्थी श्री. समशेर खॉ तुकडू खॉ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०८-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सरपंच ग्रामपंचायत, सोनगीर, तालुका धुळे, जिल्हा धुळे यांचेकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी अर्ज करुन श्री. हिमतखा पठाण यांनी सिटी सर्व्हे क्रमांक १६४७ चे मिळकतीवर बांधकाम करणेकामी परवानगी मागितलेली नाही किंवा ग्रामपंचायत सोनगीर कार्यालयाने परवानगी दिलेली नाही. तेव्हा विना परवानगीने झालेले बांधकाम काढून टाकणे अथवा कायम करणे यासंबंधी काही नियम असतील त्यासंबंधीची अपिलार्थीने माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे २५-०४-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. विना परवानगीचे बांधकाम काढून टाकणे अथवा कायम ठेवणे याबाबतचे नियम मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ मध्ये पहावा असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०५-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिली. गट विकास अधिकारी, पंचायत समिती हे बेदरकार अधिकारी असल्याने त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्याबाबत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर

अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता सिटी सर्व्हे नंबर १६४७ बद्दल दावा अगर काही हरकत होती त्यासंदर्भातील सर्व वाद आपाआपसात मिटविले असून गैरसमज दूर झालेला आहे. उक्त मिळकतीबाबत आता कोणताही वाद राहिलेला नाही. उक्त मिळकतीबाबतची कागदपत्र मिळाली असून काही तक्रार राहिलेली नाही असे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास लेखी अर्ज सादर केला आहे. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५८

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, अपिलकर्ता

दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला,

राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, नवापूर,

जिल्हा नंदुरबार

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार

**विवेचन**

अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, नवापूर, जिल्हा नंदुरबार यांचेकडे दिनांक २६-०४-२००६ रोजी अर्ज करुन रस्ते विकास कामाची, कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामाची सद्यस्थिती, संबंधित कामावर देखरेख करणा-या अधिका-याचे नांव इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने पूर्ण माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दिनांक ३०-०६- २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित करुन दिनांक २५-०७-२००६ रोजी आदेश पारित केले. त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिका-याकडे मूळ अर्जास मागणी केलेल्या माहितीची, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती सुसंगत असल्याचे सदर माहितीचे अवलोकन केल्यानंतर दिसून आले. जन माहिती अधिका-याने विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिका-याने प्रथम अपील निकाली काढले. अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित

मुदतीत मिळाली नसल्याने जन माहिती अधिका-यास जास्तीत जास्त दंड करावा म्हणून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी रुपये ५० इतके भरण्याबाबत अपिलार्थीस दिनांक १७-०५-२००६ च्या पत्राने कळविले. अपिलार्थीने दिनांक ०७-०६-२००६ रोजी रुपये ५० इतक्या शुल्काचा भरणा केला. त्यानंतर जन माहिती अधिका-याने दिनांक १४-०६-२००६ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीस आवश्यक ती सर्व माहिती दिली. माहिती मिळाली नसल्याचा अपिलार्थीने जन माहिती अधिका-यास दिनांक ०३-०७-२००६ रोजी कार्यालयात दूरध्वनी केला म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा दिनांक ०५-०७-२००६ च्या पत्रानुसार माहितीच्या छायाप्रती दिल्या. मुदतीत माहिती दिली नाही म्हणून अपिलार्थीने प्रथम अपील दाखल केले. यावर प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक २५-०७-२००६ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन माहिती अधिका-याने सुनावणीच्या वेळी केलेला युक्तिवाद व सादर केलेल्या कागदपत्रानुसार अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे. अर्जावर जन माहिती अधिका-याने माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६५९

१ श्री. नरेंद्र बारकू चौधरी, अपिलकर्ता

दैनिक राजरंग टाईम्स, बाफना मार्केट, तळमजला,

राणाप्रताप चौक, मनपासमोर, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, तळोदा,

जिल्हा नंदुरबार

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार

**विवेचन**

अपिलार्थी श्री. नरेंद्र बारकू चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २, तळोदा, जिल्हा नंदुरबार यांचेकडे दिनांक ३०-०४-२००६ रोजी अर्ज करुन रस्ते विकास कामाची, कामाचे नांव, योजनेचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, मंजूर रक्कम, प्रत्यक्ष झालेला खर्च, कामाची सद्यस्थिती, संबंधित कामावर देखरेख करणा-या अधिका-याचे नांव इत्यादी माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने पूर्ण माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दिनांक १५-०६- २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित करुन दिनांक २५-०७-२००६ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती स्वखर्चाने त्वरित देण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल कार्यालयास सादर करावा असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १४-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०५-२००६ च्या पत्रान्वये माहितीपोटी रुपये ८ भरणा करण्यासाठी अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीने दिनांक १५-०५-२००६ रोजी सदर रक्कमेचा भरणा केला. जन माहिती अधिका-याने दिनांक १५-०५-२००६ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती दिली परंतू सदर माहिती देतांना सर्वसाधारण वर्णनाच्या प्रती दिल्या नाहीत. सर्वसाधारण वर्णनाच्या प्रती अपिलार्थीस देणेबाबत प्रथम अपिलीय अधिका-याने आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्वखर्चाने दिनांक ३१-०७-२००६ च्या पत्राने ०१ एप्रिल २००५ ते १५ एप्रिल २००६ या कालावधीतील कामाच्या सर्वसाधारण वर्णनाच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस दिल्या. सदर बाब लक्षात घेता असे दिसून येते की, माहिती देणेसाठी विलंब झाला परंतु त्यात जन माहिती अधिका-याचा माहिती देण्यासाठी टाळाटाळ करणे किंवा माहिती नाकारण्याचा हेतू नव्हता. अपिलार्थीस अंतिमतः पूर्ण माहिती मिळाली. अपिलार्थी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी तसेच व्दितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हजर नव्हते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अर्जावर जन माहिती अधिका-याने केलेली कार्यवाही व त्यावर प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १४-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८४

१ श्री. भारत छोटूलाल चव्हाण, अपिलकर्ता
व्दारा : कापड विक्री केंद्र, पोलिस लाईन,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
(बांधकाम) जिल्हा परिषद,
उस्मानाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. भारत छोटूलाल चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक २१-०२-२००७ रोजी अर्ज करुन "मंजूर शेततळे प्रकल्प उस्मानाबाद गट क्रमांक ६१४ " सदरील प्रकल्प, लाभार्थीच्या शेताऐवजी अपिलार्थीच्या शेतात झाल्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती उपविभाग उस्मानाबादकडे नसल्याचे तसेच मुद्दा क्रमांक २ ची माहिती गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबादकडे समायोजनासाठी पाठविण्यात आली असल्याने तसेच हजेरीपटासंदर्भात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांच्याकडे संपर्क साधण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८ मार्च २००७ च्या पत्राने कळविले. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दिनांक २० मार्च २००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६ एप्रिल २००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपिलार्थी यांना त्यांच्या

अर्जानुसार आवश्यक ती माहिती संबंधित यंत्रणांकडे समन्वय साधून जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक २० एप्रिल २००७ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार अपिलार्थीस विहित कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेतले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मंजूर शेततळे प्रकल्प उस्मानाबाद गट नंबर ६१४ बाबत जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक २०-०४-२००७ रोजी आदेश देऊनही जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिका-याच्या या बेजबाबदार वर्तणुकीबाबत त्यांच्याविरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडणीय कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत जन माहिती अधिका-याने आयोगाकडे ३० दिवसाच्या आत लेखी खुलासा सादर करावा.

## <u>आदेश</u>

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १५-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

१ श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, : -----अपीलकर्ता
समतानगर,किनवट,
जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,किनवट,
जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,किनवट,
जि.नांदेड -----उत्तरवादी

## विवेचन

अपिलकार श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे,रा.किनवट,जि.नांदेडय यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २३.१.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय,किनवट जि.नांदेड यांच्याकडे उपविभागीय अधिकारी किनवट यांनी निलंबित केलेल्या अकरा स्वस्त धान्य दुकानांचा केरोसिनच्या शिल्लक कोटयासंबंधी माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिल्याचे कारणावरुन अपिलार्थीने दि. १४.३.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट जि.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. १६.५.२००६ दिलेल्या निकालाविरुध्द अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी गैरहजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तसेच माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविल्यासंबंधीची कागदपत्रे दाखविली त्यावरुन अपिलार्थी यांना माहिती पुरविली असल्याचे आढळून आले.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, मु.पो.समतानगर,किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, किनवट जि.नांदेड या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८६

१ श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, : **-----अपीलकर्ता**
समतानगर,किनवट,
जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,माहूर,
जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,माहूर,
जि.नांदेड **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे,रा.किनवट,जि.नांदेड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २०.२.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय,माहूर जि.नांदेड यांच्याकडे मौजे भरड येथील स्वस्त धान्य दुकानदाराने सन २००५-०६ मध्ये 'संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व कामासाठी धान्य' योजने अंतर्गत उचल केलेल्या धान्यासंबंधीची माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांनी सदर माहिती दि. २७.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविली तथापि सदर माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे कारणावरुन अपिलार्थीने दि. १८.४.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,माहूर जि.नांदेड यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २५.५.२००६ दिलेल्या निकालाविरुध्द अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी गैरहजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तसेच माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविल्यासंबंधीची कागदपत्रे दाखविली त्यावरुन अपिलार्थी यांना माहिती पुरविली असल्याचे आढळून आले.या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुरेश विठ्ठलराव शेंडे, मु.पो.समतानगर,किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय,माहूर जि.नांदेड या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,माहूर जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८७

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन,<br>ह. मु. जवाहर कॉलनी, महाडाजवळ,<br>हिवरखेडा रोड, कन्नड,<br>जिल्हा औरंगाबाद | अपिलकर्ता |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | उत्तरवादी |

**<u>विवेचन</u>**

अपिलार्थी श्री. सुरेश विठ्ठलसिंग महाजन यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०७-०४-२००७ रोजी अर्ज करुन औरंगाबाद जिल्हा महसूल आस्थापनेवरील मागासवर्गीय लिपीक व तलाठी संवर्गातील कर्मचा-यांना देण्यात आलेल्या / येणा-या पदोन्नतीबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या मागणीप्रमाणे अभिलेखावर माहिती उपलब्ध असल्याने माहितीपोटी रुपये १००० एवढे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याबाबत अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने दिनांक २१ एप्रिल २००७ रोजीच्या पत्राने कळविले. असंयुक्तीक अवाजवी अशी शुल्काची रक्कम भरण्यास जन माहिती अधिकारी भाग पाडीत आहे म्हणून अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीस संबंधित संचिका दाखवून त्यामधून त्यांना पाहिजे तेवढ्या कागदपत्राच्या प्रती, प्रती पेज रुपये १० प्रमाणे शुल्क आकारुन माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-याने दिनांक ०८-०६-२००७ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित

होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने माहितीपोटी रुपये १००० एवढे शुल्क भरण्याबाबत अपिलार्थीस कळविले होते. जन माहिती अधिका-याने अवाजवी शुल्क आकारणी केल्यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केले होते. माहितीकरिता अपिलार्थीने संबंधित फाईलची प्रथम तपासणी करावी त्यानंतर आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती उपलब्ध करुन द्याव्या. प्रत्येक प्रतीकरिता रुपये १० एवढे शुल्क आकारण्यात यावे व अपिलार्थीस माहिती द्यावी असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार तसेच उक्त अधिनियमातील कलम (१) (ए) मधील तरतुद लक्षात घेता अपिलार्थीने संबंधित फाईलची तपासणी करुन मागणी केल्यानुसार आवश्यक ते शुल्क भरुन जन माहिती अधिका-याकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

## आदेश

सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १५-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८८

१ श्री. अनंत दगडू गारदे, अपिलकर्ता
व्दारा : ॲड अरुण कानडे,
फ्लॅट नं. ८, पुष्कर बिल्डींग, आदीनाथनगर,
जवाहरनगर पोलीस स्टेशन समोर, गारखेडा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

**विवेचन**

अपिलार्थी श्री. अनंत दगडू गारदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडे दिनांक १३-०१-२००६ रोजी अर्ज करुन त्यांच्या आखात्यारितील सर्व उपविभागात रस्त्याचे खड्डे भरणेकामी खरेदी केलेल्या डांबराचे गेटपास, वजनकाट्याच्या पावत्या (डांबर खाली करतानाच्या) वाहतुकीचे कार्यारंभ आदेशाच्या प्रती, त्याच्या देयकाच्या प्रती, सदर डांबर ज्या कामावर वापरले आहे त्या कामाच्या ब-१ निविदेतील शेड्यूल - अ व ब च्या प्रती इत्यादी माहिती मागितली होती. शासकीय साधनसामुग्रीचा फार मोठ्या प्रमाणाबाहेर वापर करावा लागणार असल्याने उक्त अधिनियमातील कलम ७ (क) परिच्छेद ९ अनुसार जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. यामुळे अपिलार्थीने प्रथम अपिलीय

अधिका-याकडे दिनांक २९-०४- २००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलार्थी हे हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने शासकीय माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्या आखत्यारितील सर्व उपविभागात खरेदी केलेल्या डांबराचे व त्याचे वाहतुकीची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने उक्त अधिनियमातील कलम ७ (क) परिच्छेद ९ नुसार माहिती नाकारली. प्रथम अपिलीय अधिका-याने प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही ही बाब निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून प्रथम अपिलीय अधिका-याने प्रथम अपिलावर ४५ दिवसाच्या आत सुनावणी आयोजित करुन आवश्यक ते आदेश पारित करावेत. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीचे समाधान न झाल्यास राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याचा त्यांचा हक्क अबाधित राहिल.

## आदेश

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १५-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६८९

१ श्री. भिसे नारायण शामराव, अपिलकर्ता
मु. पो. चिंचगव्हाण, तालुका हदगाव,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश,
औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी उत्तरवादी
तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विवेचन**

अपिलार्थी श्री. भिसे नारायण शामराव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०९-०२-२००५ रोजी अर्ज करुन १९८८ पासून ते आजपावेतो भूमी अभिलेख औरंगाबाद विभागात भूमापक / कनिष्ठ लिपिक पदाची अनुसूचित जमातीचा / उपजातीसह किती जागा भरल्या आहेत याबाबतची अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. अपील अर्जाचे अनुषंगाने कार्यवाही करणेकामी उपसंचालक भूमी औरंगाबाद यांचेकडे अपील अर्ज पाठविण्यात आला असून सदर कार्यालयाशी संपर्क साधण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-याच्या कार्यालय अधीक्षकाने दिनांक २१ एप्रिल २००६ च्या पत्राने अपिलार्थीस कळविले. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दिनांक १५-१०-२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपिलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत अपिलार्थीस माहिती दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी आयोजित केली नाही. उलट अपिलार्थीचे प्रथम अपील जन माहिती अधिका-याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवून तसे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जन माहिती अधिका-याविरुध्द केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये त्यांच्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

सबब अपील मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक १५-१०-२००८

( रामानंद तिवारी )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६९०

१ श्री. अशोक संतराम साळवे, : **-----अपीलकर्ता**
रा. रॉकेल कॉलनी,
पंचायत समिती गंगाखेडसमोर,
ता.गंगाखेड जि.परभणी.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,नगरपरिषद, परभणी
जि.परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, **------उत्तरवादी**
औरंगाबाद.

**<u>विवेचन</u>**

अपिलकार श्री. अशोक संतराम साळवे, रा. गंगाखेड जि.परभणी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. १३.२.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांच्याकडे रॉकेल कॉलनीतील श्री. त्रिंबक सोनबा भालेराव यांनी नगर परिषदेच्या जागेवर केलेल्या अतिक्रमणाबाबत व त्या जागेवर अवैध दारुविक्री व्यवसाय करीत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे लोकशाही दिनात केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीसंबंधी तीन मुद्यांवर माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ०९.०३.२००६ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. २९.४.२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १५.५.२००६ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस सात दिवसांचे आत संपूर्ण माहिती पुरवावी, असे आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या कारणावरुन अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर होते .

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.५.२००६ रोजीच्या आदेशाद्वारे सात दिवसांचे आत संपूर्ण माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश मिळाल्यापासून सात दिवसांचे आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये आवश्यक कारवाई का करु नये, यासंबंधी आपला लेखी खुलासा आयोगास हे आदेश प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत सादर करावा.

**-आदेश-**

**सबब अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक संतराम साळवे,रा. रॉकेल कॉलनी,पंचायत समिती गंगाखेडसमोर,ता.गंगाखेड जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, परभणी जि.परभणी या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६९१

१ श्री. डी. एस.साळवे, : **-----अपीलकर्ता**
रा. वैभव निवास,राहूलनगर, परभणी,
जि.परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
(कडा)औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
(कडा)औरंगाबाद **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. डी. एस.साळवे,रा.परभणी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.६.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २७.१.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, ला.क्षे.वि. (कडा) औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या जन्मतारखेच्या दुरुस्तीसंबंधी एकूण पाच मुद्यांवर माहिती मागितली होती. माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर माहितीसाठी एकूण रु.८६/-शुल्क भरण्यासाठी दि. ४.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. अपिलार्थी यांनी सदर रक्कम दि. १६.३.२००६ रोजी जमा केले तथापि माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने दि. ३१.३.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, ला.क्षे.वि. (कडा) औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर दि. ९.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १२.१०.२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाद्वारे अपिलार्थी यांनी आवश्यक शुल्क भरले असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली

माहिती पुरवावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आवश्यक माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापि अपिलार्थी यांनी त्यांचे जन्मतारीख दुरुस्तीसंबंधीचे प्रकरण पुनर्विलोकन कार्यवाही करावी,अशी शासनाकडे विनंती करण्यासाठी व प्राधिकरणाविरुध्द शास्ती लावण्याची कारवाई करावी यासाठी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते .

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली आहे. या परिस्थितीत अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**-आदेश-**

**सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. डी.एस.साळवे, रा. वैभव निवास, राहूलनगर, परभणी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,(कडा)औरंगाबाद या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, (कडा)औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

१ श्री. अशोक नामदेव मोटे, : **-----अपीलकर्ता**
नुतन वसाहत, संतोष निवास अंबड,
जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपप्राचार्य,
जामखेड महाविद्यालय, जामखेड
जि.अहमदनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
जामखेड महाविद्यालय, जामखेड **------उत्तरवादी**
जि.अहमदनगर

**विवेचन**

अपिलकार श्री. अशोक नामदेव मोटे रा.अंबड जि.जालना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.२.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. २७.११.२००६ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांच्याकडे ते सन १९९२ ते १९९७ या कालावधीत महाविद्यालयामध्ये प्राणीशास्त्र विभागाची अधिव्याख्याता म्हणून काम करीत असतानाच्या कालावधीचे सेवापुस्तकाची प्रत व अनुभव प्रमाणपत्राची मागणी केली होती. माहिती अधिकारी यांनी त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे सेवापुस्तक देता येत नसल्याचे दि. २७.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे कळविले व त्यासोबत अनुभव प्रमाणपत्र पाठविले. सेवापुस्तक देण्यास नकार दिल्यामुळे अपिलार्थीने दि. १३.०१.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी गैरहजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. आयोगातर्फे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात आले की, कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारणावरुन त्याचे सेवापुस्तकाची प्रत देण्यास नकार देता येणार नाही. त्यावेळी अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीस सेवापुस्तकाची मूळ प्रत आवश्यक असून महाविद्यालय त्यांना मूळ प्रतीची झेरॉक्स प्रत तसेच दुय्यम प्रत देण्यास तयार आहेत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या अद्ययावत सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत व तसेच सेवापुस्तकाच्या मूळ प्रतीची दुय्यम (मूळ दुसरी प्रत) हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावेत.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक नामदेव मोटे,नुतन वसाहत, संतोष निवास अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६९३

१ श्री. अशोक नामदेव मोटे, : **-----अपीलकर्ता**
नुतन वसाहत, संतोष निवास अंबड,
जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपप्राचार्य,
जामखेड महाविद्यालय, जामखेड
जि.अहमदनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
जामखेड महाविद्यालय, जामखेड
जि.अहमदनगर **------उत्तरवादी**

**विवेचन**

अपिलकार श्री. अशोक नामदेव मोटे रा.अंबड जि.जालना यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी दि. ११.०१.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज करुन जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांच्याकडे ते सन १९९१-९२ ते १९९६-९७ या कालावधीत महाविद्यालयामध्ये प्राणीशास्त्र विभागाची अधिव्याख्याता म्हणून काम करीत असतानाच्या कालावधीचे हजेरीपटाची (Muster Roll) मागणी केली होती. माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे माहितीसाठी रु.२५०/- शुल्क डी.डी.द्वारे जमा करण्याबाबत कळविले. दि. १५.२.२००७ रोजी शुल्क भरुनही माहिती अधिकारी यांनी हजेरीपटाची प्रत न दिल्यामुळे अपिलार्थीने दि. १८.३.२००७ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या

अपिलावर कोणताही निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

सदर अपिलावर दिनांक १५.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते. अपिलार्थी गैरहजर होते.

सुनावणीच्या वेळी अपिलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. अपिलार्थी यांनी रु.२५०/- माहितीसाठी भरुनही अद्याप अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली नाही, तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत माहिती अधिकारी यांनी पुरवावी.

**-आदेश-**

**सबब अपील मान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद**
**दिनांक : १५-१०-२००८**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अशोक नामदेव मोटे,नुतन वसाहत, संतोष निवास अंबड,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य,जामखेड महाविद्यालय, जामखेड जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१६९८, १६९९, १७००, १७०१, १७०२, १७०३, १७०४, १७०५, १७०६, १७०७, १७०८ व १७०९

निर्णय दिनांक २०-१०-२००८

१ श्री. पंडीत बाबुराव कोळी, अपिलार्थी
मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १६९८/०७)

२ श्री. देवराम शिवला भिल,
मु. पो. साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १६९९/०७)

३ श्री. श्रीराम हिरामन चौधरी,
मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७००/०७)

४ श्री. तुकाराम झिपरु थोरात,
मु. पो. सडगाव, तालुका जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०१/०७)

५ श्री. साहेबराव भटा नगराळे,
मु. सतारे, पो. देवी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०२/०७)

६ श्री. बालू विष्णू पवार,
मु. पो. बळसाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०३/०७)

७ श्री. हिम्मतराव भटा मोरे,
मु. पो. साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०४/०७)

८ श्री. धनजी गुलाब भिल,
मु. पो. बुरझड, तालुका जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०५/०७)

९ श्री. राजेंद्र जयवंत देसले,
मु. पो. आर्वी, तालुका जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०६/०७)

१० श्री. लक्ष्मण निंबा देसले, मु. फॉरेस्ट कॉलनी, लेनिन

चौक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे व उप
वनसंरक्षक पश्चिम धुळे वन विभाग धुळे यांचे
कार्यालयीन आवारात धुळे, तालुका जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०७/०७)

११ श्रीमती सिंधुबाई संतोष न्हावी,
मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०८/०७)

१२ श्री. पाटील शांताराम भिमराव,
मु. पो. वाघाडी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे
(अपील क्रमांक १७०९/०७)

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप वन संरक्षक, पश्चिम धुळे कार्यालय, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी
तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे कार्यालय,
वनविभाग, धुळे यांचे कार्यालय, धुळे

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे वन विभाग, धुळे
जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे

**निर्णय**

वरील अकरा प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २०-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. विलास गंगाधर कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), श्री. विजय सर्जेराव शेळके, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर सर्व बारा अपिलार्थी (क्रमांक १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० ११ व १२) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी क्रमांक १, २, ३, ५, ११ व १२ यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०७-२००६ रोजी, अपिलार्थी क्रमांक ६ व १० यांनी दिनांक ०४-०७-२००६ रोजी व अपिलार्थी क्रमांक ४, ७, ८ व ९ यांनी त्यांच्याकडील अनुक्रमे दिनांक १५-०७-२००६, १०-०७-

२००६, १०-१०-२००६ व १०-०८-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या कालावधीकरिताच्या हजेरीपत्रकांच्या तसेच ३२ नंबर फॉर्मवर दिलेल्या मजुरीच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली होती.

सर्व अपिलार्थी यांनी सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. यापैकी अपिलार्थी क्रमांक १, २, ५, ६, ७, ९, ११ व १२ यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषे-खालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे.

अपिलार्थी क्रमांक १, २, ३, ५, ७, ११ व १२ यांच्या अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी क्रमांक ६ व १० यांच्या अर्जांवर दिनांक ०६-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये व अपिलार्थी क्रमांक ४, ८ व ९ यांच्या अर्जांवर अनुक्रमे दिनांक १७-०७-२००६, ११-१०-२००६ व २२-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. यामध्ये अपिलार्थी क्रमांक ९ यांना दिनांक २२-११-२००६ रोजीच्या पत्रासोबत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविल्याचे तर उर्वरित सर्व अपिलार्थींना वनक्षेत्रपाल धुळे यांच्या कार्यालयात जाऊन मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करण्याचे सूचित केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थी क्रमांक १, २, ५, ७ व १२ यांनी दिनांक ०८-०९-२००६ रोजी, अपिलार्थी क्रमांक ३, ६, १० व ११ यांनी दिनांक ०२-०९-२००६ रोजी आणि अपिलार्थी क्रमांक ४, ८ व ९ यांनी अनुक्रमे दिनांक १५-०९-२००६, १८-१२-२००६ व १०-१०-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. अपिलार्थी क्रमांक १, २, ५, ७ व १२ यांच्या प्रथम अपिलांवर दिनांक १६-१०-२००६ रोजी, अपिलार्थी क्रमांक ३, ६, १० व ११ यांच्या प्रथम अपिलांवर दिनांक ०७-१०-२००६ रोजी व अपिलार्थी क्रमांक ४, ८ व ९ यांच्या प्रथम अपिलांवर अनुक्रमे १७-१०-२००६, २५-०१-२००७ व १७-११-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतंत्र निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. अपिलार्थी क्रमांक ९ यांच्या प्रथम अपिलावर

जन माहिती अधिकारी यांनी वनक्षेत्रपाल (प्रादेशिक), धुळे यांच्याकडून माहिती प्राप्त होताच ती अपिलकर्ते यांना तात्काळ देण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केले तर उर्वरित सर्व अपिलांमध्ये वनक्षेत्रपाल धुळे यांनी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थींना हजेरीपत्रके अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी क्रमांक १, २ व ३ यांनी दिनांक ०६-०१-२००७ रोजी, अपिलार्थी क्रमांक ४, १०, ११ व १२ यांनी दिनांक १२-०१-२००७ रोजी, अपिलार्थी क्रमांक ५ व ६ यांनी दिनांक १६-०१-२००७, रोजी अपिलार्थी क्रमांक ७ व ९ यांनी दिनांक २०-०१-२००७ रोजी व अपिलार्थी क्रमांक ८ यांनी दिनांक १८-०४-२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे स्वतंत्र व्दितीय अपीले दाखल केली आहेत.

या व्दितीय अपील अर्जामध्ये सर्वसाधारणपणे सर्व अपिलार्थींनी त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य पुरविण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत, अपिलार्थींना माहिती न पुरविल्याबद्दल जन माहिती अधिका-यास शास्ती लावावी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास पाठीशी घातल्यामुळे त्यांच्याविरुध्द शासनाकडे अहवाल सादर करुन या प्रकरणी त्यांना पडलेल्या नाहक खर्चाची नुकसानभरपाई करण्याचे आदेश आयोगाने द्यावेत अशी विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी कोणीही अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थी क्रमांक ९, श्री. राजेंद्र जयवंत देसले यांना दिनांक २२-११-२००६ रोजी आवश्यक ती माहिती, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १७-११-२००६ च्या निर्णयानंतर दिलेली आहे. अपिलार्थी क्रमांक १०, श्री. लक्ष्मण निंबा देसले यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेतले आहे. उर्वरित सर्व अपिलार्थींना त्यांनी वनक्षेत्रपाल धुळे यांच्या कार्यालयात जाऊन माहिती पाहण्याचे आदेशित केले होते, तथापि अपिलार्थींपैकी कोणीही वनक्षेत्रपाल धुळे यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेली माहिती पाहण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाही. अपिलार्थींनी मस्टर्सच्या सत्यप्रती मागितल्या असतांना ती माहिती दाखविण्याची कारणे जन माहिती अधिकारी

यांना विचारली असता त्यांनी असे सांगितले की, सर्व अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती ही बरीच जुनी असून सदर मस्टर्स जीर्ण झाली आहेत व सदर मस्टर्स झेराक्स काढण्याच्या अवस्थेत नाहीत ही वस्तुस्थिती त्यांनी मा. उप लोकआयुक्त यांचेसमोर दाखविली होती व मस्टर्सच्या सध्याच्या अवस्थेचा मा. उप लोकआयुक्त यांनी त्यांच्या आदेशात उल्लेख केला आहे. या संबंधातील कागदपत्रे त्यांनी यापुर्वीच्या प्रकरणात आयोगास दाखविली आहेत. उपरोक्त मस्टर्स झेरॉक्स प्रती काढण्याइतपतच्या अवस्थतेत नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे सर्व अपिलार्थींनी वनक्षेत्रपाल धुळे यांच्या कार्यालयात जाऊन सदर मस्टर्सची पाहणी करणे उचित ठरेल, असे आयोगाचे मत आहे.

सबब अपिलार्थींना असे सुचविण्यात येते की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे वनक्षेत्रपाल धुळे यांच्या कार्यालयात हजर राहून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची पाहणी करावी.

उपरोक्त १२ अपील प्रकरणांपैकी अपील क्रमांक १७०६/२००७ ची संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उशिरा पुरविल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती उशिरा देण्याचे कारण म्हणजे ही माहिती त्यांना वेगवेगळ्या स्त्रोत्रांकडून शोधून घ्यावी लागली असे त्यांनी दिले आहे. त्यांनी आयोगास दिलेले कारण आयोग मान्य करत नाही. सबब त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द वनसंरक्षक, धुळे यांच्याकडे प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपील क्रमांक १७०७/०७ हे अपिलार्थीने विनंती केल्यानुसार खारीज करण्यात येत आहे. अपील क्रमांक १७०६/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहे व उर्वरित सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी सर्व अपिलार्थींनी या प्रकरणी त्यांना झालेल्या खर्चाच्या नुकसानभरपाईची मागणी आयोगाकडे केली आहे तथापि आज सुनावणीस कोणीही अपिलार्थी उपस्थित नसल्यामुळे

अथवा त्यांना झालेल्या खर्चाचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला नसल्यामुळे त्यांची ही विनंती फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १७०७/०७ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १७०६/०७ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक १६९८/०७, १६९९/०७, १७००/०७, १७०१/०७, १७०२/०७, १७०३/०७, १७०४/०७, १७०५/०७, १७०८/०७ व १७०९/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

४. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक १७०६/०७ मध्ये दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्याविरुध्द वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे यांच्याकडे प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंडीत बाबुराव कोळी, मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

२ श्री. देवराम शिवला भिल, मु. पो. साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

३ श्री. श्रीराम हिरामन चौधरी, मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

४ श्री. तुकाराम झिपरु थोरात, मु. पो. सडगाव, तालुका जिल्हा धुळे.

५ श्री. साहेबराव भटा नगराळे, मु. सतारे, पो. देवी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

६ श्री. बालू विष्णू पवार, मु. पो. बळसाणे, तालुका साक्री, जिल्हा धुळे.

७ श्री. हिम्मतराव भटा मोरे, मु. पो. साळवे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

८ श्री. धनजी गुलाब भिल, मु. पो. बुरझड, तालुका जिल्हा धुळे.

९ श्री. राजेंद्र जयवंत देसले, मु. पो. आर्वी, तालुका जिल्हा धुळे.

१०	श्री. लक्ष्मण निंबा देसले, मु. फॉरेस्ट कॉलनी, लेनिन चौक, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे व उप वनसंरक्षक पश्चिम धुळे वन विभाग धुळे यांचे कार्यालयीन आवारात धुळे, तालुका जिल्हा धुळे.

११	श्रीमती सिंधुबाई संतोष न्हावी, मु. वरझडी, पो. मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

१२	श्री. पाटील शांताराम भिमराव, मु. पो. वाघाडी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

१३	जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४	जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५	वनसंरक्षक, धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१४६३

निर्णय दिनांक २१-१०-२००८

१ श्री. परमेश्वर रंगनाथ गित्ते, परळी वैजनाथ न्यायालय, जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड. : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा, पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

आज दि. २१.१०.२००८ रोजी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.५.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सुनावणीस लेखी सूचना देऊन व दूरध्वनीद्वारे कळवूनही जन माहिती व अपिलीय अधिकारी आज सुनावणीस उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थी हेही आज रोजी सुनावणीस गैरहजर आहेत, त्यामुळे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ९.१०.२००६ रोजी शीघ्र टपालाद्वारे, – बीड जिल्हयामध्ये विविध प्रकारचे नागरिकांना शस्त्र परवाने दिलेले आहेत. याची माहिती व या संबंधीचा तपशील उदा. नाव ,पत्ता, शस्त्र प्रकार, दिनांक, त्या व्यक्तीवर कोणत्या प्रकारचा

गुन्हा नोंद आहे, तसेच बीड जिल्हयातील ज्या नागरिकांचे शस्त्र परवाना मिळण्याकरिता केलेला अर्ज नाकारला आहे अशा नागरिकांची दि. १ जानेवारी २००० ते ९.१०.२००६ पर्यंत पत्त्यासह यादीची माहिती. - जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दि. २४.११.२००६ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत संपल्यानंतर दिला. सदर पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस या मागितलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती पुरविली नसून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात संबंधित लिपीकाला पत्र लिहिल्याचे नमूद करुन संबंधित लिपीकाकडून माहिती प्राप्त होताच माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती त्यानंतर प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दि. ३.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी सुनावणीस हजर न झाल्याने त्यांनी दि. ९.२.२००७ पर्यंत अपिलार्थीची वाट पाहिली व त्यानंतर अपिलार्थी यांचे माहिती घेण्यामध्ये काही स्वारस्य नाही, असे गृहीत धरुन अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडील दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णील्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.५.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, मूळात अपिलार्थी यांच्या दि. ९.१०.२००६ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद दि. ८.११.२००६ पर्यंत दिला नाही. त्यानंतर देखील अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करेपर्यंत म्हणजेच दि. १६.५.२००७ पर्यंत अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असून, सदर माहिती अपिलार्थीस दिल्याने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ व ९ चा कोणत्याही प्रकारे भंग होऊ शकत नाही. त्यामुळे ही माहिती अपिलार्थी यांनी अर्ज केल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविणे अनिवार्य होते. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास दि. २४.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती संबंधित लिपीकाकडून प्राप्त होताच दिली जाईल, अशाप्रकारचे हास्यास्पद पत्र पाठविले, वास्तविकतः ही माहिती ज्या लिपीकाच्या ताब्यात आहे, त्या लिपीकावर जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांचेही प्रशासकीय नियंत्रण आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप अत्यंत सरळ व सोपे आहे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध कागदपत्रांवरुन ही माहिती अपिलार्थीस देणे ही फारशी दुरापास्त बाब होती, असे आयोगास वाटत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. यावरुन उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती विहित मुदतीत न देता, क्षुल्लक कारणे पुढे करुन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. तर जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलार्थी सुनावणीस उपस्थित झाले नाहीत, म्हणून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. या अपिलाची सुनावणी त्यांनी दि. ८.२.२००७ रोजी त्यांचे कार्यालयात ठेवली होती. या अपिलावर निर्णय देताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती कशी देता येईल, या मुद्याचा कोणत्याही प्रकारे विचार केल्याचे दिसून येत नाही. केवळ अपिलार्थी गैरहजर आहेत, या तांत्रिक मुद्याचा आधार घेऊन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळल्याचे दिसून येत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची वरील कृती सर्वथा गैर असून माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ तत्त्वाशी विसंगत आहे, हे वरील विवेचनावरुन दिसून येईल.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे सिध्द होत असल्याने, जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीची विहित मुदत आता टळून गेल्याने कलम ७(६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य माहिती पुरविणे भाग आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३) जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अधिनियमातील विहित कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५०/- या प्रमाणे एकूण रु. २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा, विहित मुदतीत खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**

**दिनांकः २१.१०.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. परमेश्वर रंगनाथ गिते,परळी वैजनाथ न्यायालय,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. पोलीस अधीक्षक, बीड यांना देऊन कळविण्यात येते की, सदर आदेश संबंधित जन माहिती अधिकारी यांना तात्काळ हस्तांतरित करावेत.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१४६४

निर्णय दिनांक  २१-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार,<br>किनवट, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगरपरिषद,<br>किनवट, जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | | |

त्रयस्थ पक्षः  सौ.रमना अनिल तिरमनवार

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज २१.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रतन बाबूलाल ढंगेरे, वरिष्ठ लिपीक, Vह्मxह्म द्धह्मह्मह्यट्ट iह्म्र +ह्यvह्मEह्मज़्र iह्मlह्मह्म मुख्याधिकारी, नगरपरिषद, किनवट, जि.नांदेड यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.मो. उस्मान, नायब तहसीलदार, जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १६.८.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय

अपील आज रोजी विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि. ०९.०२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट नगरपरिषद क्षेत्रातील/कार्यालयातील सन १९९०-९१ ते २००५-०६ या कालावधीशी संबंधित बांधकाम परवाने, मंजूर नकाशे इ.तपशीलाची एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ११.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केल्यानंतर माहिती अधिकारी यांनी दि. २५.४.२००७ रोजी अपिलार्थीस काही माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ३.७.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्याचे व अपिलार्थी यांच्याकडून माहितीसाठी स्वीकारलेले शुल्क परत करण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशाचे पालन न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित पूर्ण माहिती व मुद्दा क्र. ३ शी संबंधित अंशतः माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही प्राप्त व्हावयाची आहे. उर्वरित माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पंधरा दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये मुद्दा क्र. १ शी

संबंधित चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत सोबत देण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २५.४.२००७ रोजीच्या पत्रात नमूद केले होते. तथापि त्या पत्रासोबत चौकशी अहवालाची प्रत न पाठविता या प्रकरणी केलेल्या पंचनाम्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे. अपिलार्थी यांच्या मते पंचनामा व चौकशी अहवाल यामध्ये फरक आहे. अपिलार्थी यांचा हा मुद्दा आयोग मान्य करीत आहे. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ मध्ये मागणी केलेल्या अंतर्गत फेरबदल दर्शविणाऱ्या नकाशाची प्रमाणित प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापही दिली नसल्याचे अपिलार्थीने सांगितले. यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे केवळ त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच अपिलार्थीस पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस स्पष्ट करण्यात आले. अपिलार्थी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही पूर्ण माहिती मिळालेली नाही तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून माहितीपोटी घेतलेले शुल्क त्यांना परत केले नाही. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांना अपिलार्थीस उर्वरित शुल्क रु.३०८/- , त्यांनी अपिलार्थीस तीस दिवसांचे आत योग्य तो प्रतिसाद न दिल्याने, चोवीस तासांच्या आत परत करावे लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात दिलेल्या सर्व मुद्यांचा ऊहापोह जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये केलेला आहे. त्यामुळे या मुद्यांवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता वाटत नाही.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती दिली नाही, चुकीची माहिती देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन माहिती देण्यास नकार दिला, स्वार्थासाठी पदाचा दुरुपयोग केला व जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सरपणे खोटी कागदपत्रे तयार केली, अशी कारणे हे द्वितीय अपील आयोगाकडे सादर करण्याची कारणे दिली आहेत. या प्रकरणामध्ये माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये माहिती दिली नाही, चुकीची माहिती दिली, हे

सप्रमाण सिध्द होत असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत, तसेच अपिलार्थीकडून माहितीपोटीचे घेतलेले जादाचे शुल्क रु.३०८/-(रु.तीनशे आठ.),जे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे भाग होते, ते देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतरही त्यांना परत दिले नसल्याचे दिसून येत आहे.

सबब दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) या प्रकरणाशी संबंधित माहिती देण्यापोटी अपिलार्थी यांचेकडून घेण्यात आलेले उर्वरित शुल्क रु.३०८/- अपिलार्थी यांना हे आदेश निर्गमित होताच चोवीस तासांच्या आत परत करावे.

४) संचालक, नगरपरिषद संचालनालय यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानीवार, वेलमापुरा वार्ड क्र.३ किनवट-४३१८०४

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, किनवट जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३०
यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१३२९

निर्णय दिनांक : २१.१०.२००८

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख, : अपिलार्थी
रा. ता.परळी वैजनाथ जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वैजनाथ, जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी
तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला
महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: अधिव्याख्याता (शारीरिक शिक्षण),
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला
महाविद्यालय, परळी वैजनाथ,
जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. प्रविण प्रकाशराव दिग्रसकर, जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता,शारीरिक शिक्षण, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), डॉ. रेखा जे.परळीकर, जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ जि.बीड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.रविंद्र शामराव देशमुख, सचिव, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड हे हजर आहेत, तर

अपिलार्थी  श्री. हनुमंत वसंतराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.५.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. १२.३.२००७ रोजीच्या पत्रानुसार दिलेली माहिती अपूर्ण, त्रोटक,चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती देताना अधिकचे शुल्क रु. ७१/- इतके लावल्याचे देखील त्यांनी या द्वितीय अपील अर्जामध्ये म्हटले आहे. यामध्ये त्यांनी आपली प्रथम अर्जानुसार मागणी केलेली माहिती कायम ठेवल्याचे दिसून येते.

उपलब्ध कागदपत्रांनुसार असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्वप्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील  दि. ०९.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या सेवेशी व तद्नुषंगीक विषयाशी संबंधित एकूण १२ मुद्यांवर काही माहिती मागितली होती. सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. १३.२.२००७ रोजी प्राप्त झाला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१९६/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.३.२००७ रोजी भरल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ३.४.२००७ रोजी माहिती पुरविली. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ०४.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.५.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. २.६.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती पुरविली आहे व कोणतीही चुकीची माहिती दिली नाही किंवा दडवून

ठेवली नसल्याचे त्यांचे अभिप्राय नोंदवून फेटाळले आहे. या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास स्पष्ट केली. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांच्या संस्थेने कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ जि.बीड येथे दि. १५.७.२००० रोजी तासिका तत्त्वावर अधिव्याख्याता (समाजशास्त्र) या पदावर तात्पुरती नेमणूक दिली होती. तथापि तदनंतर महाविद्यालयाच्या असे निदर्शनास आले की, विद्यापीठाच्या निर्देशानुसार अपिलार्थीने धारण केलेली शैक्षणिक पात्रता एम.एस.डब्ल्यू.+ सेट ही अधिव्याख्याता (समाजशास्त्र) या पदासाठी जी किमान आवश्यक शैक्षणिक पात्रता आहे, त्याच्याशी समकक्ष नाही, त्यामुळे त्यांनी प्रथमतः विद्यापीठाकडे या प्रकरणी या भिन्न शैक्षणिक पात्रतेच्या समकक्षतेसाठी प्रस्ताव सादर केला होता. तथापि सदर प्रस्ताव विद्यापीठाकडून अमान्य झाल्याने अपिलार्थी यांच्या सेवा संपुष्टात आल्या. अपिलार्थीने धारण केलेल्या पात्रतेस या पदाच्या आवश्यक पात्रतेशी समकक्ष म्हणून समजावे, याच मुद्यावर अपिलार्थी यांनी विद्यापीठाकडे दोन वेळा विनंती अर्ज केला होता, तथापि त्यांची सदर विनंती विद्यापीठाने फेटाळून लावली आहे. त्यानंतर अपिलार्थी हे विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे गेले असता, अपिलार्थीचे अपील तेथेही फेटाळण्यात आले असून याच विषयावरील अपिलार्थी यांचे मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाकडे केलेले अपील देखील फेटाळले गेले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थी हे आता माहिती अधिकार कायद्याचा आधार घेऊन त्यांच्या कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,परळी वैजनाथ जि.बीड या महाविद्यालयामध्ये समाजशास्त्र या विषयाकरिता नेमणूकीसाठी अशातऱ्हेने वेगवेगळया प्रकारे प्रयत्न करीत आहेत, तथापि त्यांनी धारण केलेली शैक्षणिक पात्रता विद्यापीठाच्या अधिनियमानुसार

आवश्यक शैक्षणिक अर्हतेशी समकक्ष नसल्याने संबंधित महाविद्यालाचे व्यवस्थापन ही नेमणूक देऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. या बाबीवर त्यांचे अपील फेटाळण्यात यावे, अशी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादाच्या अखेरीस विनंती केली.

वरील वस्तुस्थिती पाहता, तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीसंदर्भात केलेल्या विधानांचे स्वरुप पाहता अपिलार्थीने आज रोजी सुनावणीस हजर राहणे अगत्याचे होते. राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांनी प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, यावर भर दिल्याचे दिसून येते. मात्र ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी ते आज सुनावणीस उपस्थित नाहीत. या प्रकरणाची यापूर्वी आयोगाकडे दि. १५.७.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या विनंतीवरुन सुनावणीची तारीख दि. १३.१०.२००८ ठेवण्यात आली होती, तथापि काही अपरिहार्य कारणामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलून ती आज दि. २१.१०.२००८ रोजी घेण्यात येत आहे. दि. १५.७.२००८ रोजीच्या सुनावणीच्या वेळी या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत निर्णय घेण्यात येईल व सदर निर्णय संबंधितांना बंधनकारक राहिल, असे आयोगाने सूचित केले होते. आज रोजी ज्या मुद्यांवर आयोगासमोर त्यांची उपस्थिती युक्तिवादासाठी अपेक्षिली होती, अपिलार्थीने द्वितीय अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत किंवा त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती कशाप्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी आहे, याचे कोणत्याही प्रकारे तोंडी तसेच लेखी निवेदन आयोगासमोर केले नाही. हे पाहता, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती पुरविली आहे, त्या माहितीची झेरॉक्स प्रत अपिलार्थीने आयोगास पुरविली आहे,

या प्रती जन माहिती अधिकारी यांनी साक्षांकित केल्या नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तसेच अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः कोणती माहिती पुरविली, हे देखील आज जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. आज रोजी अपिलार्थीने सादर केलेली जन माहिती अधिकारी यांच्या पत्राची झेरॉक्स प्रत वाचनीय नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरविणे योग्य राहिल, असे आयोगाचे मत आहे. तसेच अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क रु. ७१/- जादा घेतल्याचे नमूद केले आहे. तथापि सदर शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचा धनादेश क्र.०००९८५दि. ५.६.२००७ अन्वये परत केल्याचे दिसून येते. त्यामुळे या मुद्यावर वेगळा आदेश देण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत साक्षांकित करुन विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हनुमंत वसंतराव देशमुख द्वारा कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता (शारीरिक शिक्षण) कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्या, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१२८८

निर्णय दिनांक २१-१०-२००८

१ श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),
पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी
तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची दुसरी सुनावणी आज २१.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. प्रकाश मगनलाल अग्रवाल, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एस.एम.वाघमारे, जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत,तर अपिलार्थी श्री. सतीशकुमार रतनलाल वर्मा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणाची पहिली सुनावणी दि. ०३.०७.२००८ रोजी घेण्यात आली होती. त्यामध्ये पुढील सुनावणीसाठी आवश्यक तो पुरावा सादर करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना लेखी सूचना देऊनही त्यांनी अद्यापपावेतो आयोगासमोर कोणताही पुरावा सादर केला

नाही. तसेच अपिलार्थी यांनी आज सुनावणीसंदर्भात एक लेखी पत्र दिले असून त्यामध्ये या विषयावरील सुनावणी पुढील तारखेस घेण्याची आयोगास विनंती केली आहे. उपरोक्त परिस्थितीत या अपिलाची पुढील (तिसरी) सुनावणी दि. २०.११.२००८ रोजी सकाळी १०.३० वा. घेण्यात येईल.

सदर सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

**औरंगाबाद**
**दिनांक: २१.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सतिशकुमार रतनलाल वर्मा, विश्वासनगर, लेबर कॉलनी, प्लॉट नं. एस.आर.टी.-१९, हनुमान मंदीराजवळ, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१५८२

निर्णय दिनांक २१-१०-२००८

१ श्रीमती प्रतिभा नंदकिशोर फोलाने, : अपिलार्थी
मु.पो. हळदा ता.सिल्लोड जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१

२ जन अपिलीय अधिकारी
तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज २१.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्रीमती प्रतिभा नंदकिशोर फोलाने (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. राम इथापे, जन अपिलीय अधिकारी तथा +ह्मद्यह्माH, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत,तर जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.६.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील विचाराधीन आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते

की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दि. १४.०२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोव्हेंबर, २००४ प्रथम वर्ष व नोव्हेंबर, २००५ मध्ये झालेल्या द्वितीय वर्ष डी.एड. परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती मिळण्याबाबतची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारताना त्यांनी केंद्रीय माहिती आयोगाच्या निर्णयाचा दाखला दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १०.०४.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवला. हा निर्णय देताना त्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने नोव्हेंबर, २००५ मध्ये झालेल्या डी.एड. परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची परीक्षार्थींनी मागणी केल्यास पाठवू नयेत, असा निर्णय सक्षम समितीने घेतला, त्यामुळे छायाप्रती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे. या अपिलावर आज दि. २१.१०.२००८ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे दोघेही उपस्थित होते. अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये असा युक्तिवाद केला की, त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाद्वारे मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींची आवश्यकता आहे. त्यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने नोव्हेंबर, २००५ मध्ये झालेली परीक्षा दिली असता, प्रथमतः त्यांना १२०० पैकी एकूण ५६५ गुण प्राप्त झाले होते, तथापि, त्यांनी व त्यांच्यासारख्या इतर काही विद्यार्थ्यांनी या संदर्भात शिक्षण मंत्र्यांकडे निवेदन दिल्यानंतर या संदर्भात मंत्र्यांनी दिलेल्या आदेशानंतर ज्या विद्यार्थ्यांचे गुणपडताळणीसाठीचे अर्ज परीक्षा परिषदेकडे प्राप्त झाले त्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे

पुनर्मुल्यांकन करण्यात आले. त्यामध्ये अपिलार्थी यांना १२०० पैकी ५९३ गुण प्राप्त झाले. त्यातील अध्यापन पदविका द्वितीय वर्ष परीक्षेमध्ये विज्ञान, तृतीय भाषा व शारीरिक शिक्षण या विषयामध्ये त्यांच्या गुणात वाढ झाली. यामुळे त्यांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी तज्ज्ञांकडून केली किंवा कसे या विषयी त्यांच्या मनात संदेह उत्पन्न झाल्यामुळे या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी ज्या विद्यार्थ्यांचे गुणपुनर्मुल्यांकनासाठीचे अर्ज प्राप्त झाले, त्यापैकी काही विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये वाढ झाली असून ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. कारण त्यावेळी त्यांच्याकडे अध्यापन पदविका (डी.एड.) परीक्षेकरिता अंदाजे ४०,००० इतके विद्यार्थी बसले होते. सदर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी संबंधित विषयांच्या तज्ज्ञांकडून करुन घेतली होती, एवढया मोठया प्रमाणात परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीमध्ये मानवी गुणधर्मानुसार चुका होऊ शकतात. याप्रमाणे अपिलार्थीच्या गुणांमध्ये वाढ झाली असून त्यांना सुधारित गुण कळविले आहेत. त्यांनी आयोगास पुढे असेही विदीत केले की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दरवर्षी वेगवेगळया परीक्षांचे आयोजन केले जाते, या परीक्षेसाठी अंदाजे ३५ लाख इतके विद्यार्थी बसतात. त्यांच्याकडे इतक्या मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ठेवण्यासाठी जागाही उपलब्ध नाही, तसेच परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची परीक्षेच्या निकालानंतर ६० दिवसांनंतर विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीच्या उत्तरपत्रिका उपलब्ध असण्याची शक्यताही नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ व सुधारित गुणपत्रिकांची झेरॉक्स प्रत आयोगाकडे अवलोकनास्तव सादर केली आहे.

राज्य माहिती आयोगाने वेळोवेळी उत्तरपत्रिकांच्या प्रती अपिलार्थीस न देण्याचे निर्णय दिलेले आहेत. उत्तरपत्रिकांच्या प्रती अपिलार्थीस देऊन व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. अशाच एका प्रकरणी केंद्रीय माहिती आयोगाने त्रेसा आयरिश विरुध्द

केरळ पोस्टल सर्कल यांच्या (Apeal No.ICPB/A-2/CIC/2006, Decided on 6.2.2006-CIC) प्रकरणात खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"We, as a Commission, are not satisfied that the larger public interest justifies the disclosure of the information sought for by the appellant to direct that the CPIO to comply with the request of the appellant and as a matter of fact we are of the opinion that furnishing copies of the evaluated answer papers would be against public interest as has been rightly opined by the appellate authority that supply of a copy of the evaluated answer paper would compromise the fairness and impartiality of the selection process."

वरील युक्तिवाद या प्रकरणी लागू होत असल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा अपिलार्थीस उत्तरपत्रिका न देण्याच्या निर्णयामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे, असे आयोगास वाटत नाही. सबब अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती प्रतिभा नंदकिशोर फोलाने, मु.पो.हळदा, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७,डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१५८३

निर्णय दिनांक २१-१०-२००८

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपिलार्थी
मु.बाबरगाव पो.पेंडापूर ता.गंगापूर
जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः शिक्षणाधिकारी (प्रा)
जिल्हा परिषद,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज २१.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी श्री. तेजराव भागाजी गाडेकर, जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री.एस.एस.बिऱ्हाडे, विस्तार अधिकारी (सांख्यिकी), जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.औरंगाबाद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत,तर अपिलार्थी श्री. अरुण रंगनाथराव धोकटे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.७.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज रोजी विचाराधीन आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी तात्काळ मोफत माहिती पुरविण्याचे आदेशित करुन सुध्दा माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास १५ दिवस विलंब लावला व दिलेली माहिती ही अर्धवट व दिशाभूल करणारी अशी असल्याचे नमूद केले आहे. सदर माहिती त्यांना अर्धवट वाटण्याचे कारण त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना दिलेल्या रिक्त पदांच्या अहवालाची माहिती ही कोणत्या महिन्याची व कोणत्या वर्षाची आहे, याचा कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही व माहिती अधिकारी यांनी विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदाची मार्च २००७ पर्यंतची प्रतिक्षायादी देखील पुरविली नाही. सदर माहिती पुरविण्याचे आदेश माहिती अधिकारी यांना त्वरित देऊन त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २१.०३.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००६-०७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदाची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदाची प्रतिक्षा यादी २००७ पर्यंत
२) विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदाची तालुकानिहाय जि.प. सह
रिक्तपदे तपशील "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.४.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२/- त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे सदर शुल्क अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता,

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ३०.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.६.२००७ रोजी सुनावणी घेऊन, यासंदर्भातील आपले आदेश दि. २६.६.२००७ रोजी पारित केले. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी मागितलेली पूर्ण माहिती त्यांना तात्काळ विनामूल्य देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २१.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली उर्वरित माहिती विनामूल्य दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१९.४.२००७ रोजी व उर्वरित माहिती दि. २१.६.२००७ रोजी दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.७.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे. सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असून रिक्त पदांचा अहवाल कोणत्या महिन्याचा व कोणत्या वर्षाचा आहे याचा बोध या माहितीवरुन होत नाही. तथापि उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये माहितीची मागणी करताना फक्त – रिक्त पदांचा तालुकानिहाय अहवाल – इतकीच माहिती त्यांनी मागितली होती. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. या प्रकरणी पुढे असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांना पुरविण्यात येणाऱ्या माहितीपोटीचे लागणारे शुल्क रु.२/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि त्या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी हे माहिती अधिकाराचा दुरुपयोग करुन त्यांच्याकडे वेगवेगळया विषयावर

माहिती मागवित असतात. माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम त्यांना कळविल्यानंतर ते शुल्काचा भरणा कधीही करीत नाहीत, त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने शुल्क भरण्याबाबत कळवूनही पत्र न मिळाल्याचे बहाणे करीत असतात व अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज दाखल करीत असतात व विनामूल्य माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असतात. प्रथम अपिलामध्ये शुल्क भरुन माहिती घेऊन जा, असा निर्णय देऊनही अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कधीही भरत नाहीत. सदर प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानुसार त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे, माहितीसाठी आवश्यक ते शुल्क न भरता विनामूल्य माहिती अपेक्षित करण्याची अपिलार्थी यांची प्रवृत्ती असून अपिलार्थीचे अपील फेटाळण्याची त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः विनंती केली.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे पूर्वसूचना देऊनही उपस्थित नाहीत. त्यांनी व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले. माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत कोणतीही माहिती व्यक्तीशः अपेक्षिल्यास अर्जदाराने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणताही प्रतिनिधी वगैरे न पाठविता स्वतः उपस्थित राहणे आवश्यक आहे, याचे भान त्यांना या ठिकाणी नसल्याचे दिसते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे सिध्द होत असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत

आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २१.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, मु.बाबरगाव पो. पेंडापूर, व्हाया वाळूज ता.गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२५

निर्णय दिनांक २२-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. हमीद हुसेन मोहंमद उमर,<br>रा. स. नं. २०६ / अ, प्लॉ. नं. ५८, अमनपुरा, जमहूर रोड, निहाल डॉक्टरच्या दवाखान्यासमोर, मालेगाव, जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा इमारत पर्यवेक्षक, महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. हमीद हुसेन मोहंमद उमर, जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, महानगरपालिका, मालेगाव व जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, मालेगाव हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०५-२००६ रोजी दिलेल्या प्रथम अपिलावरील निर्णय मान्य नसल्याने केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी असे

म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असून सदर माहिती त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी कशी वाटते याचे विस्तृत विवेचन त्यांनी आपल्या अपील अर्जामध्ये केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावरही त्यांनी या अपील अर्जामध्ये भाष्य केले असून, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयातील विसंगती त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. या अपील अर्जामध्ये अंतीमतः त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश होण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत याची आयोगाने सखेद नोंद घेतली असून आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना असे सूचित करण्यात येते की, आयोगाने पूर्वसूचना देऊनही जे अधिकारी आजच्या सुनावणीस गैरहजर राहिले आहेत त्यांच्याविरुध्द प्रचलीत नियमानुसार प्रशासकीय कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये दिनांक १७-१२-२००१ ते अर्ज करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीतील मालेगाव महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर्सच्या कर वसुलीची माहिती मागितली होती. सदर अर्ज अपिलार्थीने प्रथमतः कर वसुली अधीक्षक, मालेगाव, महानगरपालिका, मालेगाव यांच्याकडे केला होता, तथापि सदर विषय हाताळणारे कर वसुली अधीक्षक हे जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज या प्रकरणाशी संबंधीत प्रत्यक्ष जे जन माहिती अधिकारी आहेत त्यांच्याकडे म्हणजेच इमारत पर्यवेक्षक यांच्याकडे पाठविला. सदर अर्ज त्यांना कर वसुली अधीक्षकाकडून कधी प्राप्त झाला, दिनांक दर्शविणारी कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत, मात्र जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत ७ मुद्दयांवर त्यांच्याकडील दिनांक २६-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये काही

माहिती दिली. सदर माहिती समाधानकारक न वाटल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०५-२००६ रोजी ठेवली होती व त्याचप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक १५-०५-२००६ च्या पत्रान्वये कळविले होते. प्रत्यक्ष सुनावणी केव्हा झाली हे दर्शविणारी कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी या अपिलासंदर्भात दिनांक २०-०५-२००६ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये देखिल सुनावणी प्रत्यक्षात कोणत्या दिनांकास झाली याचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, "जन माहिती अधिकारी यांचे वतीने दिलेली माहिती संयुक्तीक आहे, प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी अपिलकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. सबब अपील निकाली काढण्यात येत आहे" असा निर्णय दिला आहे. सदर निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी कोणीही उपस्थित नाही. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे त्यांच्या दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या अर्जामध्ये त्यांच्याशी संबंधीत नसलेली माहिती मागितली होती, मात्र अपिलार्थीस ही माहिती या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २६-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलामध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीचे अवलोकन केले असता सदर माहिती अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे अपुरी दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे टॉवर धारक कंपनीचे नांव, परवाना घेणा-या अर्जदाराचे नाव व पत्ता देण्यात यावा असे म्हटले आहे तसेच अपिलार्थीस देण्यात आलेल्या माहितीमध्ये पहिल्या मुद्दयासंदर्भात एकूण ५ मोबाईल टॉवर्सना नाहरकत दाखले दिल्याचे

म्हटले असून याच पत्रामध्ये मुद्दा क्रमांक ६ मध्ये उर्वरित टॉवर्सची संख्या ११ असल्याचे नमूद केले आहे, मात्र माहिती देतांना फक्त ५ टॉवर्सची माहिती अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीने याच मुद्दयावर त्यांचा आक्षेप आयोगाकडे नोंदविला असून सदर आक्षेप आयोग मान्य करत असून या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपुरी असल्याचा निष्कर्ष काढत आहे, तद्वतच अपिलार्थीस त्यांच्या मुद्दा क्रमांक ४ च्या संबंधाने दिलेली माहिती ही सरळ नसून दिशाभूल करणारी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक ४ मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये टॉवर धारकांकडून कर वसुली करण्याची तरतुद आहे का, असल्यास त्याचे कलम नंबर व कलम मधील मजकूर द्यावा अशा प्रकारच्या माहितीची मागणी केली होती. तथापि या माहितीचे उत्तर देतांना जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद शासन पत्र क्र. टीपीएस ३००३/१७२३/सीआर-३९४/०३/युडी-३०, दिनांक ०४ जुलै २००५ नुसार कार्यवाही सुरु करण्यात येत आहे असे उत्तर दिले आहे जे अपिलार्थीने विचारलेल्या प्रश्नाशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे जन माहिती अधिकारी यांना टॉवर्सधारकांकडून कोणत्याही प्रकारची कर वसुली केली जात नसल्यास त्याची कारणे व त्यासंबंधी जन माहिती यांचा खुलासा अपेक्षित केला. **माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट करण्यात आलेली आहे. अधिनियमाव्दारे कोणत्याही अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील उपलब्ध माहिती मागितलेल्या स्वरुपात अर्जदारास देणे एवढीच प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अर्जदारास त्यांच्याकडे कारणे अथवा खुलासे मागणे व ते जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही.** त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ ची माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ६ व्दारे विचारलेल्या माहिती संदर्भात देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विसंगत माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मालेगाव महानगरपालिकेत ज्या ज्या ठिकाणी मोबाईल टॉवर्स आहेत त्याच्या पत्त्यांची व सदर मोबाईल टॉवर्स खाजगी जागेवर आहेत किंवा कसे याची माहिती मागविली

होती. जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर सदर माहिती उपलब्ध नसल्याबाबत त्यांनी अपिलार्थीस कळवावयास हवे होते तथापि त्यांनी अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे खाजगी मिळकतीवरील मोबाईल टॉवर्स शासनपत्रानुसार रक्कम भरुन नाहरकत दाखला प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधितांना कळविले आहे अशी अपिलार्थीस माहिती दिली आहे. ज्या अर्थी या खाजगी मिळकत धारकांना मालेगाव महानगरपालिकेतर्फे असे पत्र पाठविण्यात आले आहे, त्याअर्थी या खाजगी मिळकत धारकांचे पत्ते महानगरपालिकेकडे उपलब्ध असणार हे उघड आहे. तथापि सदर पत्ते अपिलार्थीने मागितले असून देखील ते अपिलार्थीस न देता त्याला असंबध्द उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी संकीर्ण कर वसूली अधीक्षकाकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता, तथापि तो इमारत पर्यवेक्षक यांना केव्हा प्राप्त झाला याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्या आदेशामध्ये नाही असा अभिप्राय दिला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्यामुळे या मुद्दयावर भाष्य करणे निरर्थक आहे असे आयोगास वाटते. अपिलार्थी यांच्या अपील अर्जामध्ये जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नाही तर अपील कोणाकडे करावे याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २६-०४-२००६ च्या पत्रामध्ये केला नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीने घेतलेला हा आक्षेप बरोबर असल्याचे आढळून आले आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक २०-०५-२००६ रोजीच्या निर्णयातील त्रुटी देखिल आयोगाच्या निदर्शनास आणल्या असून या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी श्री. एस. टी. चौरे हे दिनांक १७-०५-२००६ रोजी किरकोळ रजेवर गेले असल्याचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये केला आहे, मात्र सुनावणीस उपस्थित असलेल्या उपस्थितांची नांवे यामध्ये श्री. एस. टी. चौरे यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. सदर विसंगती अपिलार्थीने दाखवून दिलेली आहे. सदर विसंगती मान्य करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीवर असा आक्षेप घेतला आहे की, जन माहिती

अधिकारी हे सुनावणीच्या दिवशी हजर नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी पुढील तारखेपर्यंत सुनावणी तहकूब करायला पाहिजे होती. अपिलार्थीचे हे म्हणणे आयोग मान्य करत नाही. कोणाही पक्षकाराच्या अनुपस्थितीमध्ये सुनावणी घेणे अथवा न घेणे हा सर्वस्वी अपिलीय अधिकारी यांचा प्रश्न आहे. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये त्यांचा निर्णय मान्य नसल्यास दुसरे अपील कोठे करावे याचा उल्लेख "राज्य माहिती आयोग, मुंबई" एवढाच केला असल्याबद्दल आक्षेप घेतला आहे. सदर आक्षेप आयोगास मान्य आहे. माहिती अधिकार अधिनियमातील प्राप्त होणा-या अपिलांवर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी यापुढे वरील मुद्दे विचारात घेऊन यापुढे दक्ष राहण्याची आवश्यकता आहे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुद्दा क्रमांक ५ व मुद्दा क्रमांक ६ अंशतः वगळता अधिनियमातील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे चुकीची व दिशाभूल माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे सप्रमाण सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत.

अपिलार्थीने अपील अर्जात उपस्थित केलेल्या उर्वरित मुद्दयांवर आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक    २२-१०-२००८                      राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हमीद हुसेन मोहंमद उमर, रा. स. नं. २०६ / अ, प्लॉ. नं. ५८, अमनपुरा, जमहूर रोड, निहाल डॉक्टरच्या दवाखान्यासमोर, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२६

निर्णय दिनांक २२-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोक भावराव देवरे,<br>शाळा जि. प. पूर्ण प्राथ. विद्यामंदिर, को-हाटे,<br>तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नाशिक | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक |
| | जन अपिलीय अधिकारी | : | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अशोक भावराव देवरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. किशोर अभिमन पाटील, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मालेगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०८-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०५-२००६ रोजी त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाने व्यथित होऊन केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती द्यावयाचे सोडून प्रथमतः दिनांक २७-१२-२००५ रोजी माहिती देण्याचे नाकारले. परत दिनांक १२-०१-२००६ रोजी माहिती देण्यासाठी नाकारले, मात्र दिनांक ०४-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार आहे ९० रुपये इतके शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले असल्याचे नमूद केले आहे. या सर्व प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी ५८ दिवसांचा कालापव्यय केला असून अनुज्ञेय ३० दिवसांचा कालावधी वगळता उर्वरित २८ दिवसाच्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीशी आकसाने वागत असून त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-१२-२००५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००६ रोजी अपील केले असता दिनांक १२-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन १२० दिवसाचा विलंब केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ०६-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून २००४ ते मार्च २००५ या कालावधीशी संबंधीत, शैक्षणिक गट संमेलनांतर्गत प्राथमिक शिक्षकांचे स्टेशनरी व उपहार भत्ता वाटप केल्याच्यासंदर्भात एकूण २ मुद्दयांवर माहिती मागितली होती. यामध्ये त्यांनी पहिल्या मुद्दयाव्दारे या गट संमेलनासाठी किती

रक्कम खर्च करण्यात आली त्याची तपशीलवार व्हावचरसह माहिती मागितली होती व दुस-या मुद्दयाव्दारे सदर माहिती गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मालेगाव यांच्या सहीशिक्क्यानिशी मागितली आहे. थोडक्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे साक्षांकीत स्वरुपात माहिती हवी असल्याची मागणी केल्याचे दिसून येते. सदर माहिती त्यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक २७-१२-२००५ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारतांना त्यांनी शासनाच्या साप्रविच्या दिनांक १६-१०-२००४ च्या परिपत्रकाचा संदर्भ दिला आहे. अशाच अर्थाचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००६ रोजी देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००६ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १२-०५-२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस सशुल्क माहिती तात्काळ देण्याचे आदेशित करुन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. या निर्णयावर व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६-१०-२००४ च्या परिपत्रकाचा आधार घेतला आहे. सदर परिपत्रकामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अंतर्गत उद्‌भवणा-या शंकाचे निरसन / स्पष्टीकरण करणारे असे आहे. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या दिवशी अर्ज केला त्या दिवशी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ निरसीत झाला होता त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या सदर परिपत्रकातील तरतुदी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल झालेल्या अर्जावर

निर्णय देतांना लावण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती बरोबर नाही. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील कलम ८ (क) च्या तरतुदीनुसार ही माहिती नाकारली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या संबधित दिनांक १६-१०-२००४ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने दिलेले स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी नकार दिल्याचे कारण या प्रकरणी गैरलागू ठरत आहे. अपिलार्थीने दिनांक १०-०१-२००६ रोजी या निर्णयावर प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००६ रोजी सुनावणी घेतली मात्र यासंदर्भातील आदेश दिनांक १२-०५-२००६ रोजी म्हणजेच, अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज केल्यानंतर सुमारे ४ महिने इतक्या विलंबाने पारित केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नसावी व ती अडचण असण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून येत नाही. केवळ अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी असणा-या जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच कारण या ठिकाणी असावे, असे आयोगास वाटते. **माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ च्या तरतुदीनुसार प्रत्येक नागरिकास सर्व सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागण्याचा हक्क आहे. यामध्ये ते जरी शासकीय कर्मचारी असले तरी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहिती मागता येते व त्या अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ते कितीही कनिष्ठ दर्जाचे असले तरी ते भारताचे नागरिक असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार त्यांना आवश्यक असलेली माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य ठरते.** जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहारामध्ये जन माहिती अधिकारी यांनी वारंवार "ते प्रशासनाचा घटक असल्याने त्यांनी माहिती मागण्याकामी" अशा अर्थाचे विधान केले आहे, त्याचे स्पष्टीकरण वरील आयोग याप्रमाणे करत आहे. इत:पर अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या व्याख्येशी सुसंगत असून ती अपिलार्थीस देय ठरते. तथापि माहिती देण्याचा अधिनियमातील कलम ७ (१) मधील कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती माहिती आता अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य द्यावी लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे एक नसून दोन व्यक्ती असून सह अर्जदार श्री. पोपट कृष्णा अहिरे यांनी त्यांचा पत्ता मूळ अर्जामध्ये चुकीचा दिला असून, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करत असतात, यावर अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, पत्रव्यवहाराच्या सोईसाठी दोन्ही अर्जदारांचा एकच पत्ता दिला आहे. यावा असे स्पष्ट करण्यात येते की, एकाहून जास्त अर्जदारांनी माहिती मागितल्यास, सदर माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय असते ती देण्यास हरकत नाही.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न पुरवून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० च्या तरतुदीस स्वतःला पात्र ठरविले आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने संदर्भित केलेल्या शैक्षणिक संमेलनाकरिता २००४-२००५ या आर्थिक वर्षात त्यांना एकूण ३,४५,४५० रुपये इतका निधी प्राप्त झाला व ३,७७,०२५ रुपये इतका निधी खर्च झाला असून खर्च झालेल्या निधीचे सर्व व्हावचर्स त्यांच्याकडे उपलब्ध असून त्या व्हावचर्सच्या झेरॉक्स प्रती साक्षांकीत करुन ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

उपरोक्त प्रकरणी असेही आढळले की, जन अपिलीय अधिकारी यांनी जरी अपिलाची सुनावणी अधिनियमातील कलम १९ (६) प्रमाणे विहित मुदतीत घेतली असली तरी आदेश मात्र १२० दिवस इतक्या विलंबाने पारित केल्याचे दिसून येते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येते. इतःपर त्यांनी अशा चूका टाळाव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जावर चुकीचा व विसंगत निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन ती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोक भावराव देवरे, शाळा जि. प. पूर्ण प्राथ. विद्यामंदिर, को-हाटे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, तालुका

मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२७

निर्णय दिनांक  २२-१०-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अतिक अहमद कमाल अहमद,<br>७५३, नवापुरा, गली नं. ११, मालेगाव,<br>जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, मालेगाव गर्ल्स हायस्कूल,<br>नवापुरा, मालेगाव, जिल्हा नाशिक | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सेक्रेटरी, अंजुम मोईनुत - तुलबा,<br>१६८ / १, रौनकाबाद, मालेगाव, जिल्हा नाशिक | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री सलमाना अश्वतार जिया हम, अपिलार्थी श्री. अतिक अहमद कमाल अहमद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. अन्सारी मोहंमद अमीन मोहंमद मुस्तफा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मालेगाव गर्ल्स हायस्कूल, नवापुरा, मालेगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. सिराज अहमद मोहंमद मुस्तफा, जन अपिलीय अधिकारी तथा सेक्रेटरी, अंजुम मोईनुत - तुलबा, मालेगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-११-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचे म्हटले असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ वर मागणीप्रमाणे कागदपत्रे पुरविली नाहीत अथवा त्याचा काही एक खुलासा केला नाही म्हणजेच त्यांनी अधिनियमातील कलम ७ (२) अन्वये माहिती नाकारली आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊन त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे. याचबरोबर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०९-२००६ रोजी खोटे-नाटे पत्र देऊन अपिलार्थीची दिशाभूल केली असल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास अंतीमत: विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम उत्तर देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने एकूण ६ मुद्दयावर माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त ३ मुद्दयावरच (मुद्दा क्रमांक १, ३ व ६) माहिती देऊन उर्वरित मुद्दा क्रमांक २, ४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसमोर त्यांनी फक्त "--" असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये संबंधित संस्थेच्या सचिवाकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेऊन त्यांनी दिनांक २७-०९-२००६ हा दिनांक असलेले एक पत्र लिहिले असून त्यामध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ हा, त्यांची संस्था "अल्पसंख्यांक" या प्रवर्गात मोडत असल्याने, त्यांना लागू होत नाही असे म्हटले आहे. अपिलार्थीचा अशाच प्रकारचा

एक अर्ज ज्यामध्ये त्यांच्या विचाराधीन मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ या मुद्दयांची तंतोतंत पुनरावृत्ती केली आहे त्यासंबंधीचा निर्णय आयोगाने दिनांक १९-०६-२००८ रोजी दिला असून यामध्ये या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ५ वर देखिल भाष्य केले आहे. आज विचाराधीन असलेल्या अपिलाशी संबंधीत मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ६ व्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३-२००४, २००४-२००५ व २००५-२००६ मध्ये भरती केलेल्या शिक्षकांची नांवे, पत्ते व शैक्षणिक पात्रता याची मागणी केली होती. ही माहिती अपिलार्थीस दिनांक १०-०८-२००६ रोजी पुरविल्याचे जन माहिती अधिका-याचे म्हणणे आहे परंतू ही यादी अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस ही माहिती त्यांनी आता दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड पोस्टाव्दारे पुरविली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते, संबंधित शिक्षकांची नांवे, पत्ते व शैक्षणिक दर्जा दर्शविलेली यादी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. सदर माहितीची झेरॉक्स प्रत साक्षांकीत करुन त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीस दिली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस संपूर्ण माहिती आज अखेरीस विनामूल्य प्राप्त झालेली आहे. आजच्या सुनावणीत अपिलार्थीने या मुद्दयावर भर दिला की, संबंधित जन माहिती अधिकारी हे नेहमीच अर्धवट व उशिराने माहिती देत असतात व या प्रकरणी तसे ते सिध्दही झालेले आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरल्याने, त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस अंजुम मोईनुत - तुलबा, १६८ / १, नयापुरा वॉर्ड, मालेगाव, जिल्हा नाशिक संस्थेच्या अध्यक्षांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होण्यासाठी परत आयोगास विनंती केली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन अपिलीय अधिकारी

यांच्याविरुध्द कारवाई करण्याची कोणतीही तरतूद नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेल्या दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या निर्णयावर यापूर्वीच्या अपिलार्थीच्या अपील क्रमांक ११७६/०७ वरील दिनांक १९-०६-२००८ रोजीच्या निर्णयामध्ये भाष्य केले आहे, हे भाष्य याही प्रकरणी तंतोतंत लागू होते.

आता अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस अध्यक्ष अंजुम मोईनुत - तुलबा, यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अतिक अहमद कमाल अहमद, ७५३, नवापुरा, गली नं. ११, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मालेगाव गर्ल्स हायस्कूल, नवापुरा,

मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सेक्रेटरी, अंजुम मोईनुत - तुलबा, १६८ / १, रौनकाबाद, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, अंजुम मोईनुत - तुलबा, १६८ / १, नयापुरा वॉर्ड, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२०, १७२१, १७२२, १७२३ व १७२४

निर्णय दिनांक २२-१०-२००८

१ श्री. मोहमंद मुस्तफा पीर मोहमंद, : अपिलार्थी
७९७ / ५५, रविवार वार्ड, मालेगाव,
जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत व अतिक्रमण विभाग,
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका,
मालेगाव, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २२-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. एकबाल अहमद मो. नजीर, अपिलार्थी श्री. मोहमंद मुस्तफा पीर मोहमंद यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. रामदास जिभाऊ देवरे, कनिष्ठ लिपीक, जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत व अतिक्रमण विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. बावीस्कर राजेंद्र काशीनाथ, जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका, मालेगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने एकाच विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या कालावधीशी संबंधीत ५ अर्जांव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१. सिटी सर्व्हे नं. ७९७/५५ प्लाट नं. २ वरील रविवारवार्ड, मालेगांव जि. नासिक येथील अतिक्रमण मालेगाव महानगर पालीका कडून सन दि. १/१/२००६ ते ३१/१२/२००६ हया कालावधी मध्ये कोणत्या दिवशी कोणत्या तारखेस अतिक्रमण काढण्यात आले किंवा कसे ? दिनांक व दिवससह माहिती मिळावी.

२. सिटी सर्व्हे नं. ७९७/५५ प्लाट नं. २ वरील रविवारवार्ड, मालेगाव जि. नासिक येथील अतिक्रमण मालेगांव महानगर पालीका कडून सन दि. १/१/२००६ ते ३१/१२/२००६ हया कालावधी मध्ये अतिक्रमण काढले त्यामध्ये सिटी सर्व्हे नं. ७९७/५५ प्लाट नं. २ वरील अतिक्रमण काढण्यामध्ये महानगर पालीकास एकूण किती रुपये खर्च झाला. पेट्रोल, डिझेल, कर्मचारी अधिकारी वर्गाचा खर्च तसेच पोलिस बंदोबस्ताचा खर्च व इतर खर्च रुपये झालेला आहे. त्याची लेखी माहिती मिळावी.

३. सिटी सर्व्हे नं. ७९७/५५ प्लाट नं. २ वरील रविवारवार्ड, मालेगाव जि. नासिक येथील अतिक्रमण मालेगाव महानगर पालीका कडून सन दि. १/१/२००६ ते ३१/१२/२००६ हया कालावधी मध्ये अतिक्रमण काढण्यापुर्वी देण्यात आलेले नोटीस व पत्राची खरी नक्कल मिळावी. "

या ५ अर्जापैकी ४ अर्ज दिनांक ३०-०६-२००७ रोजी केले असून एक अर्ज दिनांक ०३-०७-२००७ रोजी केलेला आहे. या वेगवेगळ्या अर्जांतील माहितीचा कालावधी अपील क्रमांकानुसार अनुक्रमे ०१-०१-२००६ ते ३१-१२-२००६, ०१-०१-२००५ ते ३१-१२-२००५, ०१-०१-२००४ ते ३१-१२-२००४, ०१-०१-२००३ ते ३१-१२-२००३, ०१-०१-२००१ ते ३१-१२-२००१ असा आहे.

अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कर्मचारी / शिपायाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या पाचही अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०८-२००७ रोजी या पाचही प्रकरणी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १०-०९-२००७ रोजी पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत मुद्देसूद माहिती देण्याचे सूचित केले.

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित मुदतीत माहिती दिली नाही त्यामुळे सदर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारले असे गृहीत धरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर व सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना आयोगाकडील सुनावणीच्या २ दिवसापूर्वी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून सदर माहितीवर त्यांचे समाधान झाले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आयोगाकडील सुनावणीच्या २ दिवस अगोदर विनामूल्य पुरविण्यात आली असून ती अपिलार्थीस प्राप्त झाली असून ते समाधानी आहेत. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे

विहित केलेल्या मुदतीत माहिती न पुरविण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी पावसाळयाचा मोसम होता व याच कालावधीत त्यांना जिल्हाधिकारी यांच्या हुकूमावरुन वेगवेगळी अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली होती. नियमीत कामे व अतिक्रमण काढण्याची अतिरिक्त जबाबदारी या कामाच्या व्यापामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही असे त्यांनी आपल्या कृतीचे समर्थन केले. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी त्यांच्याकडे कामाची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यावेळी वेळ मिळाला नाही असे जरी गृहीत धरले तरी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांना ८ दिवसाच्या आत माहिती देण्यासाठी कळवूनही अपिलार्थीस त्यांनी ऑक्टोबर २००८ मध्ये आयोगाच्या सुनावणीपूर्वी २ दिवस अगोदर ही माहिती दिली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या मनामध्ये माहिती अधिकार अधिनियमाविषयी यःकिंचितही आदर नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या माहितीसंदर्भात काहीही न कळवून अपिलार्थीस त्यांनी एक प्रकारे माहिती देण्याचे नाकारले आहे व ही माहिती न देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादात स्पष्ट केली आहेत जी आयोगास काय परंतु कोणाही जनसामान्यास मान्य होणारी नाहीत. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमान्वये त्यांनी विचारलेली माहिती अधिनियमातील विहित मुदतीमध्ये न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांच्याकडे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता वरील संदर्भिय पाच वेगवेगळया अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य मिळाली असल्याने व त्यावर त्यांचे समाधान झाले असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची पाच व्दितीय अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १७२०/०७, १७२१/०७, १७२२/०७, १७२३/०७ व १७२४/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक २२-१०-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमंद मुस्तफा पीर मोहमंद सिरान, ७९७ / ५५, रविवार वार्ड, मालेगाव, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा इमारत पर्यवेक्षक, इमारत व अतिक्रमण विभाग, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१०

निर्णय दिनांक २३-१०-२००८

१ श्री. योगेश अरविंद झांबरे, : अपिलार्थी
राजयोग, शामा कॉम्प्लेक्ससमोर,
गणपतीनगर, जळगाव-४२५ ००२.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
मुलजी जेठा महाविद्यालय,
जळगाव.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी,
जळगाव

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. योगेश अरविंद झांबरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. जयंत देविदास चौधरी, प्राध्यापक, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, मुलजी जेठा महाविद्यालय, जळगाव व जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्यांचे वकील श्री. एस.बी.अग्रवाल हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपिलामध्ये अपिलार्थी यांनी दि. १०.४.२००६ रोजी प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे - त्यांच्या संस्थेस संबंधित सन १९८८ ते दि. १०.४.२००६ पर्यंतच्या कालावधीसाठी प्राप्त झालेले अनुदान, त्यातून संस्थेने केलेला खर्च व दि. २०.०६.१९९० रोजी झालेल्या कार्यकारीणीच्या अजेंडयाची व ठरावाची सुस्पष्ट, साक्षांकित, सर्व सदस्यांच्या सहया असलेल्या प्रतीची - मागणी केली होती. सदर माहिती अपिलार्थीने अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली होती. तथापि सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न दिल्यामुळे त्यांनी हे अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे. या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या दि. १०.४.२००६ रोजीच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद विहित मुदतीत दिला नाही. त्यामुळे त्यांनी दि. २२.६.२००६ रोजी (प्राप्त दि. २७.६.२००६) जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केला असता त्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीने दि. २६.७.२००६ रोजी अपिलार्थीस एक पत्र पाठवून त्यांना असे कळविण्यात आले की, " माहितीचा अधिकार अधिनियमान्वये रेकॉर्डच्या प्रति आवश्यक ती फी घेऊन मागणीकारास पुरवावयाच्या आहेत. आपण तशी मागणी केलेली नसल्यामुळे ती विचारात घेता येत नाही." जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांचे प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली गेली नाही अथवा या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार झाला नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे ॲड. एस.बी.अग्रवाल यांनी संस्थेची बाजू मांडली. त्यांनी आयोगासमोर लेखी युक्तीवाद सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांना त्यांच्या संस्थेमध्ये किमान कौशल्य विभागात एक वर्ष इतक्या कालावधीसाठी इन्स्ट्रक्टर म्हणून तात्पूरत्या स्वरुपात नेमणूक दिली होती. एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात आल्या. त्यामुळे त्यांनी या प्रकरणी कामगार न्यायालयात दाद मागितली असता, त्या प्रकरणात त्यांच्याविरुध्द निकाल लागला. या निकालाच्या विरुध्द अपिलार्थीने मा. मुंबई उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली. या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने अपिलार्थीस पिठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण,नाशिक यांच्यासमोर अपील दाखल करण्याची मुभा देण्यात आली व त्याप्रमाणे त्यांनी ते अपील दाखल केले, हे अपील देखील दि. १३.८.२००८ रोजी शाळा न्यायाधिकरणाकडून फेटाळले गेले. त्यामुळे अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे वेळोवेळी माहिती मागत असून त्यांनी केलेले सदर अपील हे त्यांच्या सेवा संस्थेने संपुष्टात आणल्याचा राग मनात धरुन केलेले आहे. त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी दि. १०.४.२००६ रोजी मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांचे दि. २७.४.२००६ च्या त्यांच्या पत्राने अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती पुरवूनही अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना त्रासात व खर्चात टाकले असल्याने त्यांचे अपील फेटाळण्यात यावे व त्याची नुकसानभरपाई म्हणून

अपिलार्थीकडून रु. १०,०००/- त्यांना मिळावेत. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी केलेले सर्व आरोप अमान्य केले.

आयोगासमोर सादर केलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये दि. २७.४.२००६ रोजी आवश्यक ती माहिती अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचे दिसून येते.आज रोजी संस्थेच्या आवक-जावक नोंदवहीची पाहणी करता, त्यामध्ये देखील अपिलार्थीस दि. २७.४.२००६ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पत्र पाठविल्याचे दिसून येते, तथापि आज रोजी सदर रजिस्टरची पाहणी केली असता, त्यामध्ये काही ओळी रिकाम्या ठेवल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित रजिस्टरच्या वैधतेबाबत आयोगाचे मनात संदेह निर्माण होत आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, संस्थेने पाठविलेले कथित दि. २७.४.२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न देता संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जे प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेलेले नाहीत, त्यांच्याकडून दि. २६.७.२००६ रोजी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविता येत नाही, अशा अर्थाचे पत्र दिले गेले होते. संस्थेच्या जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कृतीतील विसंगती अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाचे निदर्शनास आणून दिली आहे, अपिलार्थीचा सदर आक्षेप आयोग मान्य करीत असून संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यांना सूचना देण्यात येत आहे की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) नुसार त्यांच्याकडे दाखल झालेल्या अपिलावर त्यांनी स्वतः अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोन्ही बाजूस, त्यांचे म्हणणे पूर्णपणे मांडण्याची संधी देऊन, त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपला निर्णय द्यावा.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगाने सूचित केल्यानुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यात आली. याप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती खोटी आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या विधानापृष्ठयर्थ कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांना जर ही माहिती खोटी वाटत असेल तर त्यांनी योग्य त्या पुराव्यासह माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीस अनुसरून परत आयोगाकडे अर्ज करावा, असे त्यांना सूचविण्यात आले.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगास सादर केला आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस मिळाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. उपलब्ध पुराव्यावरुन जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी निःसंशयपणे दोषी ठरवता येणार नाही. मात्र उपरोक्त परिच्छेदामध्ये वर्णन केलेली विसंगती संबंधित संस्थेच्या अध्यक्षांचे निदर्शनास आणून देण्यात येत असून, इतःपर त्यांनी अशाप्रकारचा विसंगतीपूर्ण पत्रव्यवहार करु नये, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः २३.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. योगेश अरविंद झांबरे, राजयोग, शामा कॉम्प्लेक्ससमोर, गणपतीनगर,जळगाव ४२५ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, मुलजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७११

निर्णय दिनांक २३-१०-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शांताराम शिवराम पाटील,<br>कुणाल कुंज, भारत गॅस हौसिंगजवळ,<br>एम.जे.कॉलेजच्या मागे, जळगाव-४२५००१ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपकुलसचिव (प्रशासन),<br>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कुलसचिव,<br>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. शांताराम शिवराम पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. यादव देवराव वाघमारे, जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. मुकूंद वसंतराव बरीदे, जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.९.२००६ रोजी केलेले द्वितीय अपील आज आयोगाचे विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १६.८.२००६ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असून त्यामध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १० ची माहिती व त्यांनी विशेष रजा योजनेअंतर्गत घेतलेल्या रजा मंजूर करताना, रद्द करताना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशासन विभागाने वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेसाठी ज्या कार्यालयीन टिपण्या (Office Notes) सादर केल्या असतील, अशा सर्व टिपण्यांच्या (Office Notes) सत्यप्रतींची मागणी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १९.०५.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १०.८.२००४ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत या कालावधीतील विशेष रजा योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या त्यांच्या रजेसंदर्भात एकूण दहा मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ९ व १० च्या संदर्भात त्यांनी वेगवेगळया कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. या अर्जामध्ये त्यांनी "आवश्यक असलेल्या दस्तऐवजांचे वर्गीकरण "अशा शीर्षाच्या मुद्यामध्ये त्यांनी द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेल्या कार्यालयीन टिपण्यांच्या सत्यप्रतींची (Office Notes) मागणी केली होती. सदर माहिती त्यांनी व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.६.२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या अर्जासंदर्भात काही माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दि. १७.०७.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, जन

अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे सदर अपील त्यांचे दि. १६.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये फेटाळून लावले, त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वर म्हटल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जात म्हटल्याप्रमाणे त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टपणे मिळाली नाही. त्यांच्या रजेच्या संदर्भात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रशासन विभागाने ज्या कार्यालयीन टिपण्या तयार केल्या त्यांच्या सत्यप्रती देखील मिळाल्या नसल्याचे, आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, मुद्दा क्र. १० च्या संदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध माहिती त्यांनी दिली असून, अपिलार्थीने या मुद्यामध्ये संदर्भित केलेल्या रजेबाबत त्यांना दि. १७.७.२००६ रोजी कळविण्यात आले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जाच्या संदर्भातील विविध कार्यालयीन टिपण्याच्या प्रती, त्या गोपनीय स्वरुपाच्या असल्यामुळे, अपिलार्थीस, पुरविल्या नसल्याचे त्यांनी आयोगासमोर आज कबूल केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० मध्ये अपिलार्थीने लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली यांच्याकडे फेलोशिपसाठी केलेला अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला आहे किंवा कसे याची विचारणा केली होती. अपिलार्थीच्या या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. १७.७.२००६ रोजी, त्यांचा मूळ अर्ज विद्यापीठामध्ये प्राप्त झाला नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थीकडे, त्यांनी सदर अर्ज विद्यापीठाकडे अथवा सक्षम प्राधिकरणाकडे सादर केल्याचा कोणताही पुरावा आज उपलब्ध नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.७.२००६ रोजी अपिलार्थीस दिलेले उत्तर ग्राहय मानण्यात येत असून त्यांनी या मुद्यावर अपिलार्थीस

माहिती दिल्याचे सिध्द होत आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या टिपण्यांबाबत जन माहिती अधिकारी यांनी या टिपण्या (Office Notes) गोपनीय असल्याची भूमिका घेतली आहे, ती आयोगास मान्य नाही. कोणत्याही कर्मचाऱ्याची रजा मंजूर करताना अथवा ती रद्द करताना तयार केलेल्या कार्यालयीन टिपणीच्या प्रती अपिलार्थीस देताना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ वा ९ मधील तरतुदीचा कोणत्याही प्रकारे भंग होत नाही. रजा रद्द करताना, सदर रजा मंजूर किंवा रद्द करण्याची कारणे, आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय त्यामध्ये नमूद करणे हे पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या टिपण्यांच्या प्रतीसंदर्भातील माहिती ही अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. माहिती देण्याचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७(६) मधील तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम माहितीच्या अर्जामध्ये मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अपिलार्थीस दिलेले उत्तर संयुक्तिक असल्याचे आयोगास आढळून आले नाही. यासंदर्भातील माहितीमध्ये अपिलार्थीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला आरोग्य विद्यापीठाने त्यांचे पेन्शन व रजा रोखीकरणाबाबत मिळालेल्या रकमेचा उल्लेख केला आहे. सदर रक्कम प्राप्त होऊनही आजपावेतो उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने अपिलार्थीस दिली नसल्याचे अपिलार्थीने आयोगास सुनावणीमध्ये सांगितले. त्यांना देय असलेली रक्कम उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास जर आरोग्य विद्यापीठाने पाठविली असेल तर या रकमेचा विनियोग उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने कसा केला, हे विचारण्याचा अपिलार्थी यांचा हक्क आहे, सबब आरोग्य विद्यापीठाकडून अपिलार्थीस पेन्शन व रजा रोखीकरण (Pension & Leave Salary Contribution) च्या रकमेचे सन १९९९ ते २००४ या पाच वर्षांच्या कालावधीत जे धनादेश प्राप्त झाले, त्या रकमेचा भरणा उत्तर महाराष्ट्र

विद्यापीठाने कोठे केला याची माहिती उत्तर महाराष्ट्र विद्यापीठामधील संबंधित कॅशबुकच्या प्रतींसह व बँकेत भरणा केला असल्यास बँकेच्या संबंधित स्लीपस्च्या प्रती त्यांनी हे आदेश निर्गमित होताच अपिलार्थीस सात दिवसांच्या आत पुरवाव्यात. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास हेतुपूर्वक टाळल्याचे निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

उपरोक्त माहिती अपिलार्थीस सात दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे विद्यापीठाच्या उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आता मान्य केले आहे, हे पाहता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या त्यांच्या रजेच्या प्रकरणी दिलेल्या आदेशाशी संबंधित सर्व कार्यालयीन टिपण्यांच्या प्रती व त्यांच्या सेवानिवृत्ती व रजा वेतनाची माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक: २३.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शांताराम शिवराम पाटील, कुणाल कुंज, भारत गॅस हौसिंगजवळ, एम.जे. कॉलेजच्या मागे, जळगाव-४२५ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (प्रशासन), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१६८३

निर्णय दिनांक   २३-१०-२००८

१ श्री. सुभाष रतनसिंग महेर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक शिक्षण उपसंचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. सुभाष रतनसिंग महेर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे वकील श्री.एस.बी.गस्तगार यांच्यासह ,श्री. एम. ए. खलिक, जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्रीमती सुमन देशमाने, जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. ०९.०१.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जून २००० ते डिसेंबर २००५ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " १) शासनाने विभागातील व औरंगाबाद जिल्हयातील काही संस्थांना वरिल कालावधीत माध्यमिक शाळांना, प्राथ.शाळांना मान्यता दिल्या असतांना, अशा शाळा इतर दुसऱ्या संस्थेस हस्तांतरित करण्यात आल्या अशा हस्तांतरित शाळा कोणत्या ? त्यांची तपशीलवार सविस्तर माहिती (अशा शाळा कोणत्या संस्थेतून, कोणास व कुठे हस्तांतरित करण्यात आल्या. २) शासनाकडून वरिल कालावधीत उर्दू माध्यमांच्या मान्यता मिळालेल्या शाळा किती ? अशा शाळांना मराठी माध्यम करुन मान्यता बदलून दिल्या आहे काय ? याची तपशीलवार संस्था/शाळानिहाय माहिती. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अर्जदाराच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३८०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर दि. २०.३.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकूण १९० पृष्ठांची माहिती पुरविली. सदर माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.०४.२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ८.५.२००६ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. या

निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.०७.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आयोगास या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्ष बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून, सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे गरजेचे वाटते. सबब या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय घ्यावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. सदर अपिलावरील नियोजित सुनावणीबाबत अपिलार्थीस किमान दहा दिवस अगोदर कळवावे. जर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही, तर अपिलार्थी राज्य माहिती आयोगाकडे विहित मुदतीत द्वितीय अपील करु शकतात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत सुनावणी घेऊन आपला निर्णय घ्यावा

**औरंगाबाद**
**दिनांकः २३.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुभाष रतनसिंग महेर, द्वारा श्री. पी.एम.राजपूत, एन-७, सी-१-३७, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उपसंचालक,विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१३

निर्णय दिनांक २३-१०-२००८

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, : अपिलार्थी
सिडको, नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक
जिल्हाधिकारी, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक
उपनियंत्रक,नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दि. २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. माणिक महादेव साळवी, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. चंद्रकला प्रमोद पुट्टा सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.९.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज

आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून उशीरा माहिती प्राप्त झाली, प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. ३०.३.२००७ रोजी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९० ते दि. ३०.३.२००७ या १७ वर्षाच्या कालावधीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये सन १९९० पासून ते दि. ३०.३.२००७ पर्यंत नाशिक जिल्हयात कार्यरत असलेल्या सर्व दुय्यम निबंधकांची नावे व त्यांचा कालावधी आणि त्यांचे बदली आदेशाच्या प्रतींची मागणी केली होती. ही माहिती अपिलार्थीने पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.४.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती दिली. उर्वरित माहिती संदर्भात अपिलार्थीस त्यांनी या पत्राद्वारे सदर माहिती तयार झाल्यानंतर पाठविण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांनी, मुदतबाहय असल्याने त्यांच्याकडील दि. ३०.७.२००७ रोजीच्या आदेशान्वये फेटाळून लावले. सदर अपील फेटाळताना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, त्यांना दि. १६.५.२००७ रोजी त्यांनी पत्र प्राप्त झाल्यानंतर प्रथम अपील दि. १६.६.२००७ पर्यंत न करता, दि. २५.७.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात दाखल केले असल्याने त्यांचे अपील फेटाळण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले असून या अपिलामध्ये आपली मूळ माहितीची मागणी कायम

ठेवली आहे. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना उशीरा माहिती प्राप्त झली व जी माहिती प्राप्त झाली ती अर्धवट आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपील चालविले नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई होण्याची अपेक्षा आयोगासमोर व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली काही माहिती दि. ३०.०४.२००७ रोजी पुरविली असून दि. २७.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे उर्वरित माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस अद्यापही त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या बदली आदेशाच्या प्रती पुरविल्या नसल्याचे त्यांनी सुनावणीमध्ये कबूल केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या उपरोक्त कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली कथित माहिती अर्धवट स्वरुपात एकूण दोन वेळा म्हणजेच अनुक्रमे दि.३०.४.२००७ व २७.८.२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती पाठविल्यापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांना पूर्वसूचना देऊनही त्यांनी जावक नोंदवहीची प्रत अथवा जावक नोंदवही आयोगासमोर सादर केलेली नाही. अपिलार्थीने त्यांना ही माहिती दि. १६.५.२००७ रोजी मिळाल्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी प्रथमतः दि.३०.४.२००७ व त्यानंतर दि.२७.८.२००७ रोजी, या दोन दिवशी पाठवूनही अपिलार्थीस अंतीमतः अर्धवट माहिती दिल्याचे या प्रकरणी सप्रमाण सिध्द होत आहे. अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरवून त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन आपल्या या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एक दिवस इतक्या विलंबाने दिली, या बद्दल त्यांना रु.२५०/- इतकी शास्ती

का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही, असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, ती अधिनियमातील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने त्यांना अधिनियमातील विहित मुदतीमध्ये प्राप्त होणे कलम ७ च्या तरतुदीनुसार अनिवार्य आहे, सबब दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एक दिवस इतक्या विलंबाने दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना रु.२५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः २३.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे.जे. १/२६/५,महात्मा फुले नगर,पवननगर,सिडको, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक,वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१४

निर्णय दिनांक २३-१०-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र काळू नानकर,<br>सिडको, नाशिक | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक<br>जिल्हाधिकारी, नाशिक.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक<br>उपनियंत्रक,नाशिक विभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. माणिक महादेव साळवी, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. चंद्रकला प्रमोद पुट्टा,स सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग नाशिक यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.९.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज

आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्रथम अपिलाचा निर्णय मिळाला नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः दि. ७.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार "तत्कालीन मुद्रांक जिल्हाधिकारी श्री. मानमोठेसाहेब यांचे कार्यकाळात किती मुद्रांक विक्रेत्यांना परवाने दिले त्यांचे अर्जासह तह.सर्कल यांचेसह कार्यालयीन टिपनिसह सर्व कागदपत्रांची साक्षांकित माहिती " अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यांचे कार्यालयीन कामकाजाच्या अतिव्यापामुळे माहिती संकलीत करण्याचे काम अद्याप चालू असून माहिती पूर्ण संकलीत होताच शासकीय चलनाने किती शुल्क भरावयाचे, याबाबत कळविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविण्यात आले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १२.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २५.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.७.२००७ रोजीच्या आदेशान्वये, सदर अपील मुदतबाहय झाल्याने फेटाळून लावले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी वरील परिच्छेदामध्ये वर्णिल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी संगनमत

करुन त्यांना माहिती दिली नाही, जी माहिती दिली ती उशिरा दिली व जन अपिलीय अधिकारी यांनी अपील चालविले नाही, असे नमूद करुन जितके दिवस त्यांना उशिरा माहिती दिली, तितक्या दिवसांसाठी जन माहिती अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे. तसेच आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थी यांना दि. १२.६.२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली. असून अपिलार्थीने मागणी केलेली माहितीची व्याप्ती मोठया स्वरुपात असल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करण्यासाठी त्यांना वेळ लागणार होता व तसे त्यांनी त्यांच्याकडील दि. ५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले होते. अपिलार्थीस माहिती पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांनी रजिस्टर्ड पोस्टाची दि. १२.६.२००७ रोजीची पावती दाखविली, यावर ही माहिती अपिलार्थीस दि. १२.६.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याचे सिध्द होत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने देखील अर्धवट माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये ज्या व्यक्तिंना मुद्रांक विक्री परवाना दिला होता, त्या व्यक्तींचे अर्ज, त्यावरील तहसीलदार यांचे अभिप्राय व कार्यालयीन टिपणीच्या प्रती ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे योग्य त्या मार्गाने मागणी करुनही अद्यापपावेतो पुरविलेली नाही. उर्वरित माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर कबूल केले आहे. एवढे जरी झाले तरी या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ६.५.२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे आवश्यक होते. तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी ३६ दिवस इतक्या विलंबाने दिली आहे व जी माहिती दिली ती देखील अर्धवट

स्वरुपात दिलेली आहे, त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत, तथापि ज्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यकाळात हे प्रकरण घडले, ते जन माहिती अधिकारी आज या पदावर कार्यरत नाहीत, सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी सदर माहिती अपिलार्थीस ३६ दिवस इतक्या प्रदीर्घ विलंबाने दिली असल्याने त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/-याप्रमाणे ३६ दिवसांसाठी रु. ९०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा, विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही, असे समजून हेच आदेश कायम करण्यात येतील. जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केल्याप्रमाणे अपिलार्थीस उर्वरित माहिती तीस दिवसांचे आत पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

४) अपील मान्य करण्यात येत आहे.

५) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरीत माहिती  हे आदेश निर्गमित हाताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

६) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ३६ दिवस इतक्या विलंबाने दिल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे रु.९०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा त्यांनी हे

आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः २३.१०.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे.जे. १/२६/५,महात्मा फुले नगर,पवननगर,सिडको, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१५

निर्णय दिनांक २३-१०-२००८

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, : अपिलार्थी
सिडको, नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक
जिल्हाधिकारी, नाशिक.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक
उपनियंत्रक,नाशिक विभाग, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. माणिक महादेव साळवी, सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व सौ. चंद्रकला प्रमोद पुट्टा,स् सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग,नाशिक यांच्या प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१२.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील आज

आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी त्यांचे दि. १.१०.२००७ रोजीच्या अपील अर्जावर दि. ३१.१०.२००७ रोजी सुनावणी घेतली, तथापि त्यांना या अपिलावरील निर्णय मिळाला नसल्याचे अथवा या संदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने दि. ६.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) सन २००५ ते २००७ या दरम्यान मुद्रांक जिल्हाधिकारी प्रज्ञा बढे मिसाळ यांचे कार्यकाळात लोकआयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयाकडून आपल्या कार्यालयाच्या तक्रारी कर्मचारी व अधिकारी यांचेविरुध्दच्या तक्रारी मा.लोकाआयुक्त यांचेकडून आलेला पत्रव्यवहार त्यांच्या झेराक्सप्रती. लवकर दोनदिवसात मिळाव्यात.

१) दुय्यम निबंधक कार्यालयात कामकाजाची वेळ १० ते ६ असतांना जादावेळ काम दस्तनोंदणीचे काम करण्याची परवाणी (IGR) नोंदणी महानिरीक्षक यांची परवानगी असल्याची प्रत झेराक्स मिळावी.

२) नासीक जिल्हयात मुद्रांक जिल्हाधिकारी उपनिबंधक - कार्यालयात किती शासकीय कर्मचारी आहेत. कधिपासुन कार्यरत आहेत. त्यांची नावे (पद) ऑफीसनिहाय (प्रमाणे)"

सदर माहिती अपिलार्थीने पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १६.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस एकूण सात पृष्ठांची माहिती देण्यासाठी रु. १४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती पोस्टाने हवी असल्यास रु.२५/- अधिक शुल्क भरणा करण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थी

आज सुनावणीमध्ये कबूल करीत आहेत. तथापि सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही, मात्र दि. १८.८.२००७ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती विनामूल्य पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी दि. ३१.१०.२००७ रोजी होऊन या संदर्भातील आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पारित केले आहेत. तसेच या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले आहे. सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य अथवा सशुल्क द्यावी, याबाबत कोणताही उल्लेख त्यांनी आपल्या आदेशामध्ये केल्याचे आढळून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये त्यांनी, त्यांना अपूर्ण माहिती देण्यात आली असल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर निर्णय दिला नसल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करण्यास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे पात्र नाहीत,असे अभिप्राय नोंदवून आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १८.८.२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीचे, अपूर्ण माहिती मिळाल्याचे विधान, त्यांना मान्य नाही. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीचा कोठेही उल्लेख नाही, त्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस अपूर्ण वाटते. तथापि अपिलार्थी यांच्याकडून लोकायुक्तांकडील पत्रव्यवहाराचा

संदर्भ त्यांना प्राप्त झाल्यास ते या कागदपत्रांसंदर्भात परत शोध घेऊन अपिलार्थीस माहिती देण्यास तयार आहेत.तसेच केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने अपिलार्थी माहितीची मागणी करीत आहेत, असेही त्यांनी पुढे आयोगास अवगत करुन दिले.

वरील घटनाक्रमावरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कळवूनही, त्यांच्या कार्यालयात भरले नाही, त्यामुळे अपिलार्थीस आता उर्वरित माहिती विनामूल्य देय होऊ शकत नाही.

वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध संचिकांचा शोध घेऊन अपिलार्थीस जी माहिती अपूर्ण वाटते, त्या माहितीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस सशुल्क पुरवाव्यात, असे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे. जर अपिलार्थी यांनी मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाली असतील तर त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यावर आवश्यक ती कारवाई करावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

७) अपील निकाली काढण्यात येत आहे.

८) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक: २३.१०.२००८**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे.जे. १/२६/५,महात्मा फुले नगर,पवननगर,सिडको, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले**

**(अपील क्र.१७१६/०७,१७१७/०७,१७१८/०७ व १७१९/०७)**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सीआर/१७१६,१७१७,१७१८ व १७१९

निर्णय दिनांक २३-१०-२००८

१ श्री. राजेंद्र काळू नानकर, : अपिलार्थी
सिडको, नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी

| | |
|---|---|
| १. सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -१ | (अपील क्र.१७१६/२००७) |
| २. सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२ | (अपील क्र.१७१७/२००७) |
| ३. सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-४ | (अपील क्र.१७१८/२००७) |
| ४. सह दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-३ | (अपील क्र.१७१९/२००७) |

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक.

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज २३.१०.२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. भिमराव नामदेव धिवरे, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,वर्ग-२, नाशिक-१ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक-१ असे संबोधण्यात येईल), श्री. मनोज प्रभाकर बावीकर, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,वर्ग-२,

नाशिक-२ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक-२ असे संबोधण्यात येईल), श्री. दिलीप सुकलाल चौधरी, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,वर्ग-२, नाशिक-४ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक-३ असे संबोधण्यात येईल), श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील, जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,वर्ग-२, नाशिक-३ (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी क्रमांक-४ असे संबोधण्यात येईल) व श्री. माणिक महादेव साळवी,सह जिल्हा निबंधक वर्ग-२, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. युवराज दगडू डामसे यांच्यासह हजर आहेत.

उपरोक्त चार प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. २०.०४.२००७ रोजीच्या चार स्वतंत्र अर्जान्वये जन माहिती अधिकारी क्र.१ ते ४ यांच्याकडे माहिती मागितली होती. यापैकी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -१ (अपील क्र १७१६/२००७) यांच्याकडे खालीलप्रमाणे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण ९ मुद्यांवर तर उर्वरित तीन प्रकरणांमधील जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालील अनुक्रमांक १ ते ८ मुद्यांप्रमाणे माहिती मागितली होती.

"सह दुय्यम निबंधक नासीक १ या कार्यालयात शासकीय कर्मचारी किती आहेत, त्यांची नावे (पद) त्यांना पगार कोण देतो ते कोणाच्या आदेशाने काम करतात त्यांना मानधनावर नेमणेबाबत (IGR) नोंदणी महानिरीक्षकाची आदेशाची प्रत सुरवातीपासुन आजपावेतो सह दुय्यम निबंधक १ यांचा कार्यकाळ त्यांची नावे.

१) आपल्या कार्यालयात शासकीय कर्मचारी त्यांची नावे (पद)

२) अनधिकृत कर्मचारी किती आहेत (खाजगी) कर्मचाऱ्यांची नावे.

३) त्यांना वेतन पगार कोण देतो.

४) खाजगी कर्मचारी कोणाच्या आदेशाने काम करतात

५) मानधनावर नेमणे बाबत (IGR) यांचे आदेशाची प्रत

६) आपले कार्यालयामध्ये सहदुय्यम निबंधक १ सुरवातीपासुन आजपावेतो त्यांचा कार्यकाल त्यांची नावे

७) आपल्या कार्यालयात दस्तनोंदणीचे काम शासकीय वेळेनुसार चालते का ? होते का?

८) शासकीय कामकाजाची वेळ कितीपासुन कितीपर्यंत आहे.

९) २००५ पासून आजपावेतो प्रत्येक महिन्यांची दस्तऐवजाची संख्या जमा स्टॅम डिवटी पावती फी."

सदर माहिती अपिलार्थी यांनी पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी क्रमांक-१ यांनी त्यांच्याकडील दि. १५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये तर उर्वरित जन माहिती अधिकारी क्रमांक २,३ व ४ यांनी अपिलार्थीच्या अर्जास त्यांच्याकडील अनुक्रमे दि. १७.५.२००७ , १५.५.२००७ व १६.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी क्रमांक-१ यांनी मुद्दा क्र. ९ च्या माहितीकरिता अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रु.६/- भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात सदर शुल्काचा भरणा केला नाही. जन माहिती अधिकारी क्र. १ ते ४ यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.७.२००७ रोजी चार स्वतंत्र प्रथम अपीले दाखल केली. या सर्व अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३० व ३१.७.२००७ रोजी सुनावणी घेऊन

या संदर्भातील आपले आदेश दि. ३१.१२.२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याने अपिलार्थीची ही अपील निकाली काढल्याचे म्हटले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दि. १८.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील चार द्वितीय अपीले दाखल केली आहेत. या अपील अर्जामध्ये त्यांनी माहिती उशिरा मिळाली, प्रथम अपील लावले नाही व अपिलाचा निकाल आजपर्यंत मिळाला नाही, ही द्वितीय अपील दाखल करण्याची कारणे नमूद केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी प्रथमतः अपील क्र. १७१६ क्रमांकाच्या अपील अर्जासंदर्भात असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून जानेवारी, २००५ पासूनची माहिती अपेक्षिली होती. परंतु त्यांनी एप्रिल २००५ पासून पुढील कालावधीच्या माहिती दिलेली आहे. त्यांना जानेवारी, २००५ ते मार्च २००५ या कालवधीची माहितीची आजही आवश्यकता आहे. अपील क्र. १७१७/२००७, १७१८/२००७ व १७१९/२००७ मधील मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे, तथापि चारही प्रथम अपिलांवरील निर्णयाच्या प्रती त्यांना प्राप्त झाल्या नाहीत, त्या त्यांना मिळाव्यात, अशीही विनंती त्यांनी आयोगास केली.

जन माहिती अधिकारी क्रमांक-१ यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दि. १५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असून, या पत्राद्वारे अपिलार्थीस मुद्दा क्र. ९ च्या संदर्भात रु. ६/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले होते, तथापि या शुल्काचा भरणा त्यांनी

अद्यापपावेतो केला नाही, तसेच त्यांनी मूळ अर्जात मागितलेल्या माहितीमध्ये केवळ '२००५ साल' एवढाच उल्लेख केला असून त्यांनी यासंबंधीची माहिती देताना २००५ आर्थिक वर्ष गृहीत धरुन एप्रिल, २००५ पासून पुढील माहिती दिलेली आहे. आता जाने.२००५ ते मार्च,२००५ पर्यंतची उर्वरित माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास ते तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थी यांच्या चारही अपील अर्जांवर दिलेल्या निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस पाठविल्या आहेत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर निर्णयाच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या चारही प्रथम अपील निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात व त्याची पोचपावती अभिलेख्यात ठेवावी.

वरील घटनाक्रम, उपलब्ध कागदपत्र व दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता, जन माहिती अधिकारी क्र.१ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस जानेवारी, २००५ ते मार्च, २००५ या कालावधीतील मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती सशुल्क पुरवावी. उर्वरित तीनही प्रकरणांमध्ये (अपील क्र. १७१७/२००७, १७१८/२००७ व १७१९/२००७) अपिलार्थीने माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केल्याने या प्रकरणांमध्ये माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची चारही अपीले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील क्र. १७१६/२००७, १७१७/२००७, १७१८/२००७ व १७१९/२००७ निकाली काढण्यात येत आहे.

१०) जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक,वर्ग-२, नाशिक-१ यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना तीस दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

११)जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या चारही प्रथम अपील निर्णयाच्या प्रती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

**औरंगाबाद** **(वि.बा.बोरगे)**
**दिनांकः २३.१०.२००८** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र काळू नानकर, एन-५३, अे.जे. १/२६/५,महात्मा फुले नगर,पवननगर,सिडको, नाशिक

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -४ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक -३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२८

निर्णय दिनांक २४-१०-२००८

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, अपिलार्थी
रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,
धुळे जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक वन संरक्षक, उत्तर धुळे वन विभाग,
शहादा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, उत्तर धुळे वन विभाग, शहादा,
जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार

जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश रेता मोरे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व श्री. नागेनाहळ्ळी रुद्रेगैडा प्रवीण, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४-१०-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने दिनांक २९-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे केले असून, या कार्यालयात या अपिलाची नोंदणी दिनांक ०४-१०-२००६ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. या व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, अधिनियमातील तरतुदीनुसार एका महिन्यात माहिती दिली नाही व मुदत संपल्यावर मागील तारीख टाकून त्यांना माहितीसाठी आवश्यक ते शुल्क भरण्याची सूचना केली, तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयावर आपले अभिप्राय दिले आहेत, यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करावे याचा उल्लेख केला नाही, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले नाही असे नमूद करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याशी वेळोवेळी केलेल्या पत्रांचा संदर्भ या अपिलामध्ये दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्याविरुध्द योग्य ती दंडनीय कारवाई करण्याची व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द उचित कारवाई करण्यासाठी शासनास सूचित करावे अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. आज रोजी झालेल्या युक्तिवादच्या वेळी त्यांनी आपल्या याच मागणीचा पुनरुच्चार आयोगासमोर केला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत मे २००१ या महिन्याच्या त्यांच्या कार्यालयातील निमगव्हाण क. नं. १५४ सी. सी. टी. स्कीम क्षेत्र ५० हेक्टर या स्कीमच्या खोदकाम खर्चाच्या कामाच्या मस्टर्स / प्रमाणकांच्या

झेरॉक्स प्रती, मंजुरीचे आदेश, सुधारीत अंदाजपत्रक ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६१६ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणारी संभाव्य माहिती किती पृष्ठांची आहे व ही माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर काय आहे याचा कोठेही उल्लेख नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजी प्रथम अपील करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने केलेले अपील फेटाळले. सदर अपील फेटाळतांना त्यांनी अपिलार्थीने वेळोवेळी घेतलेल्या विसंगत भूमिकामुळे अपील फेटाळले असे म्हटले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची विनामूल्य मागणी व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाईच्या मागणीसंदर्भात परत प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे ३० दिवसाच्या आत त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद दिला. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जरी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००६ च्या पत्राव्दारे त्यांना माहिती देण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क भरण्याचे कळविले तरी सदर पत्र त्यांना दिनांक २२-०३-२००६ रोजी प्राप्त झाले त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे कधी माहिती पाठविली याचा पुरावा, जन माहिती अधिकारी यांना आयोगाने त्यांच्या नोटीशीमधील परिच्छेद ४ मध्ये सूचित करुनही, त्यांनी आयोगासमोर आज कोणताही पुरावा सादर

केलेला नाही, तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा पूर्ण हिशोब दिला पाहिजे याचा अर्थ, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क कळवितांना अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या पृष्ठांची संभावित संख्या व त्याचा प्रतिपृष्ठ दर जन माहिती अधिकारी यांनी कळविणे अभिप्रेत होते, तथापि उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या संभाव्य पृष्ठांची संख्या व माहिती पुरविण्यासाठीचा दर कळविला नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांनी आपल्या या कृतीव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीचे पालन केलेले नाही. यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी पाठविलेले दिनांक १०-०३-२००६ चे पत्र अवैध ठरते. सबब अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना, आता विहित कालावधी व्यपगत झाल्याने विनामूल्य देय ठरते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याच्या मुद्दयावर आपल्या युक्तिवादात भर दिला आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपूरस्सर टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत, मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आता हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७२९

निर्णय दिनांक २४-१०-२००८

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, अपिलार्थी
रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,
धुळे जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक वन संरक्षक, उत्तर धुळे वन विभाग,
शहादा, जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, उत्तर धुळे वन विभाग, शहादा,
जिल्हा नंदुरबार

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार
जन अपिलीय अधिकारी : उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश रेता मोरे, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल) व श्री. नागेनाहळळी रुद्रेगैडा प्रवीण, जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक ०४-१०-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने दिनांक २९-०९-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयाकडे केले असून, त्या कार्यालयात या अपिलाची नोंदणी दिनांक ०४-१०-२००६ रोजी झाल्याचे दिसून येत आहे. या व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरविली नसल्याने आता त्यांना ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोफत उपलब्ध करुन द्यावी, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे माहिती देण्यासाठीची मुदत संपल्यानंतर मागील तारीख टाकून त्यांना माहितीसाठी आवश्यक ते शुल्क भरण्याची सूचना केली, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले, यासंदर्भात त्यांच्याशी बराच पत्रव्यवहार केला, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळले, सदर अपील फेटाळतांना त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करावे याचे मार्गदर्शन केले नाही त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती दंडनीय कारवाई करावी व जन अपिलीय प्राधिकरणाविरुध्द उचित कारवाई करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनास सूचित करावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १५-०२-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे (जो जन माहिती अधिकारी यांना दिनांक १७-०२-२००६ रोजी प्राप्त झाला) जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९७ ते २००२ या कालावधीत अस्तित्वात असलेली १० वे वर्षीय ते प्रथम वर्षीय, नॉर्मल रोहयो, जरोयो, आरोयो,

आर. व्ही. पी. सी. सी. टी. रोपवने, नालाबांध स्कीम त्यावरील खर्च, लागवड रोपे, मरअळी रोपे इत्यादीच्या नोंदीच्या विभागीय  रोपवनांच्या नोंदवहींच्या झेरॉक्स प्रती यांची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १८,२०० /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  या पत्रामध्ये अपिलार्थीस पुरविण्यात येणारी संभाव्य माहिती किती पृष्ठांची आहे व ही माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर काय आहे हे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून पाठविलेले दिनांक १०-०३-२००६ रोजीचे पत्र अपिलार्थीस दिनांक २२-०३-२००६ रोजी प्राप्त झाले, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे.  त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी आयोगासमोर पोस्टाचा २२-०३-२००६ या तारखेचा शिक्का असलेली प्रत आयोगास सादर केली.  यावरुन अपिलार्थीस ही माहिती दिनांक २२-०३-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांनी व्दितीय अपील अर्जात म्हटल्याप्रमाणे आपले म्हणणे मांडले.  जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद दिला आहे, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होऊ शकली नाही, अपिलार्थीस हे पत्र प्राप्त होण्यासही लागलेला विलंब कदाचित पोष्टामुळे लागण्याची शक्यता असल्याचे त्यांना वाटते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग करणारा आहे, कारण या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या व माहितीसाठीचा प्रतिपृष्ठ दर कळविला नाही, तसेच त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०३-२००६ रोजी पत्र पाठविले यापृष्ठ्यर्थ आयोगाने त्यांना सूचित करुनही, आयोगाने त्यांच्या नोटीशीमध्ये परिच्छेद ४ मध्ये सूचित केल्याप्रमाणे आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला

नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीने शुल्क भरले नसल्याने त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही हा युक्तिवाद मान्य करता येणार नाही. त्यामुळे आता त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य देणे भाग आहे. अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करावी अशी आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळले असल्याचे अथवा माहिती दडवून ठेवल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द शासनाकडे कारवाई करण्यासाठी शिफारस करण्याची तरतूद अधिनियमामध्ये नसल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, नंदुरबार वनविभाग, शहादा, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७३०

निर्णय दिनांक २४-१०-२००८

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, अपिलार्थी
रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर,
धुळे जिल्हा धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक वनसंरक्षक, (जंकास) पश्चिम धुळे
वन विभाग, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे वन विभाग,
धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-१०-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व श्री. विलास गंगाधर कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), पश्चिम धुळे वन विभाग, धुळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे वन विभाग, धुळे हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १७-०८-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व अर्धवट असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयाबरोबर त्यांना उर्वरित माहिती पुरविली यावरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मूलतः अर्धवट माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. तसेच त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी परिच्छेद क्रमांक ५.२ व ५.३ अन्वये त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये, त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे व किती दिवसात अपील करावे याचे मार्गदर्शन न करुन माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केल्याचे त्यांनी या अपील अर्जामध्ये अखेरीस म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत एकूण ७ मुद्दयांवर १९८९ ते १९९४ या कालावधीतील वन मजुरांच्या प्रश्नासंबधी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २४-०२-२००६ रोजी प्राप्त झाला व या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क रुपये ४५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क रुपये ४५ भरल्याचे चलन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १२-०४-२००६ रोजी भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिनांक १९-०४-२००६ रोजी पुरविली, तथापि या माहितीने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक १७-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आपला निर्णय कळविला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना अपिलार्थीने त्यांच्याकडे प्रथम अपील करतांना उपस्थित केलेल्या मुद्यांवर योग्य ते भाष्य करुन अपिलार्थीचे अपील अंतीमतः निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे, तथापि त्यांचा वादाचा मुद्दा त्यांच्या प्रथम अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ५.१, ५.२ व ५.३ संबंधी आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपस्थित केलेल्या मुद्दा क्रमांक ५.१ चे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी १४५ वन मजुरांचे नियुक्तीचे आदेश अस्तित्वात असतांना फक्त १३७ वन मजुरांचे नियुक्ती आदेश दिले असल्याचे म्हटले आहे. उर्वरित ८ मजुरांचे नियुक्तीचे आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-०७-२००६ रोजी पुरविल्याचे दिसून येते, त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा माहिती प्राप्त होण्याच्या हद्दीपुरता निकाली निघतो. या मुद्दयावर अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांना ज्याअर्थी काही माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयासोबत पुरविली आहे त्याअर्थी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अर्धवट माहिती दिली आहे. अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग मान्य करत आहे. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ५.२ व्दारे उपस्थित केलेले मुद्दे हे त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्यतिरिक्त असून अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केली होती ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२००६ रोजी पुरविल्याचे दिसून येते. या माहितीबद्दल अपिलार्थीस जर काही शंका असेल तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत अभिलेख पाहणी करणे अनुज्ञेय आहे,

त्यामुळे त्यांनी या माहितीच्या सखोल चौकशी करिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत अभिलेख्यांची पाहणी करणे उचित ठरेल असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मुद्दयावर अनेक प्रश्न व शंका उपस्थित करुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रश्नांना जन अपिलीय अधिकारी यांनी योग्य ती उत्तरे दिली आहेत. अपिलार्थीच्या अपील अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीपेक्षा जास्त माहितीची आवश्यकता असल्याचे दिसून येते. सदर जास्तीची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत कागदपत्रांची तपासणी करुन प्राप्त करुन घेता येईल. अपिलार्थीने अशा प्रकारच्या तपासणीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी सर्व कागदपत्रे त्यांच्या तपासणीसाठी ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावीत असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती दिल्यामुळे त्यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुरुवातीला १४५ पैकी १३७ वन मजुरांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती दिल्या आहेत तर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०१-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये उर्वरित ८ वन मजुरांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कालावधीशी संबंधीत आहे तो पाहता जन माहिती अधिकारी यांना सदर माहिती शोधण्यासाठी काही अतिरिक्त वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, याचा अर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केली असे म्हणता येणार नाही, त्यामुळे त्यांच्यावर कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई करण्याचे आदेश नाहीत, तथापि येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर त्यांनी विहित मुदतीत व सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्याचे अथवा त्यांच्याविरुध्द

कारवाईची शासनास शिफारस करण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्यामुळे अपिलार्थीची ही विनंती फेटाळून लावण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने उपरोक्त प्रकरणी अशा प्रकारच्या कागदपत्रांच्या तपासणीची मागणी केल्यास अपिलार्थीस त्यांनी अशी सर्व कागदपत्रे त्यांच्या तपासणीसाठी ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २४-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, रा. ८, फॉरेस्ट कॉलनी, नगावबारी जवळ, देवपूर, धुळे जिल्हा धुळे.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, (जंकास) पश्चिम धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, पश्चिम धुळे वन विभाग, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६६

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ सौ. सुमन अशोक भुसारी, अपिलार्थी
मु. पो. सोनई, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१,
अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : दुय्यक निबंधक, वर्ग-१, दुय्यम निबंधक कार्यालय, नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. अशोक श्रीहरी भुसारी, अपिलार्थी सौ. सुमन अशोक भुसारी यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), सौ. लतीका मधुकर गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा दुय्यक निबंधक, वर्ग-१, नेवासा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. शिवाजी लक्ष्मण तांबे, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, अहमदनगर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-०६-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी तथा दुय्यक निबंधक, नेवासा यांच्याकडे दस्त नंबर ३६७७/९८ च्या संदर्भात काही माहिती मागविली असता, त्यांनी अपिलार्थीस अचूक माहिती न देता मोघम दिशाभूल करणारी माहिती दिली असे त्यांना वाटल्यावरुन, त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले तथापि, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी न घेता व अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर असूनही व अधिकारपत्र दाखल करुनही त्यांचे अपील जाणूनबुजून निकाली काढले व सुनावणी घेतली नाही, असे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००७ रोजी सन १९९८ या कालावधीशी संबंधीत दस्त नंबर ३६७७/९८ च्या संबंधाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली, तथापि त्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थी यांचे आज असे म्हणणे आहे की, या अपिलाची दिनांक १६-०४-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती व त्या दिवशी ते हजर होते, तथापि उपस्थित असूनही त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी न देता त्यांचे अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये प्रथम अपिलाच्या सुनावणीवर आपला भर दिला आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर आयोगास अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची पुन्हा सुनावणी होणे व अपिलार्थीस त्यांची बाजू पूर्णतः मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी (त्यातील संभाव्य विलंब क्षमापित करुन) हे आदेश निर्गमीत झाल्यावर ३० दिवसाच्या आत घेऊन आपला निर्णय अपिलार्थीस तात्काळ कळवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची, ३० दिवसाच्या आत संभाव्य विलंब क्षमापित करुन सुनावणी घ्यावी व तदनतर ७ दिवसाच्या कालावधीमध्ये आपला यासंदर्भातील आदेश पारित करावा.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुमन अशोक भुसारी, मु. पो. सोनई, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यक निबंधक, वर्ग-१, दुय्यम निबंधक कार्यालय, नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६७

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. संजय बाळासाहेब मोरे, अपिलार्थी
व्दारा - श्री. सद्‌गुरु चैतन्य प्रेस,
चितळी रोड, राहाता, तालुका राहाता,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कोपरगाव,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक जिल्हा भूमी अभिलेख,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संजय बाळासाहेब मोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. शंकर रामजी किरवे, जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कोपरगाव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. दादा सोनू तळपे, जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक जिल्हा भूमी अभिलेख, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १८-०१-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी मौजे मोरवाडी, तालुका राहाता येथील गट नंबर १२६ ते १३७ चा मूळ नकाशा, दिनांक ०२-१२-२००५ रोजीचा मंडळ अधिकारी यांचा अहवाल व इतर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १२-१०-२००६ रोजीचा अर्ज अधीक्षक भूमी अभिलेख, अहमदनगर यांच्याकडे केला होता, तथापि या प्रकरणी ते स्वतः जन माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे माहितीसाठी संपर्क साधावा. तदनंतर अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १८१ इतके तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयात भरुन दिनांक २९-०८-२००७ रोजी त्यांना आवश्यक ती माहिती हस्तगत करुन घेतली, तथापि त्या माहितीमध्ये मंडळ अधिकारी यांच्या दिनांक ०२-१२-२००५ रोजीच्या अहवालाचा समावेश नव्हता. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मंडळ अधिकारी, राहाता यांनी उपरोक्त प्रकरणी कोणताही अहवाल त्यांच्या कार्यालयास सादर केलेला नाही. मंडळ अधिकारी, राहाता यांनी तयार केलेला अहवाल त्यांच्या कार्यालयातून अपिलार्थीस मिळू शकेल, त्यांच्याकडे अपिलार्थीने संदर्भित केलेला अहवाल उपलब्ध नाही त्यामुळे तो त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येत नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करत आहे, तथापि या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जरी प्रथमतः चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज केला होता तरी हा अर्ज संबंधीत प्राधिकरणाने त्यांच्या स्तरावर अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्यांच्याकडे

पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा भंग केलेला आहे. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील अर्ज हाताळतांना, अर्जावर कारवाई करतांना त्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांना आवश्यक असलेल्या मंडळ अधिका-याच्या अहवालासंदर्भात त्यांनी मंडळ अधिकारी, राहाता यांच्याशी संपर्क साधून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन करुन सदर अहवाल संबंधितांकडून परस्पर हस्तगत करुन घ्यावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय बाळासाहेब मोरे, व्दारा - श्री. सद्‌गुरु चैतन्य प्रेस, चितळी रोड, राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कोपरगाव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक जिल्हा भूमी अभिलेख, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मंडळ अधिकारी (महसूल), राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मंडळ अधिकारी (महसूल), राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत : तहसीलदार, तहसील कार्यालय, राहाता, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर).

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७२

निर्णय दिनांक  ३१-१०-२००८

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, अपिलार्थी
मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ अधिकारी, भाग येवला, तालुका येवला,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, येवला,
जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. एस. डी. पवार, जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, भाग येवला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उदय रा. किसवे, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, येवला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. काळे विठ्ठल एकनाथराव हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०२-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील दिनांक १९-१२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार येवला यांनी दिलेल्या प्रथम अपिलाच्या निर्णयाविरुध्द केले आहे. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे कागदपत्रे सादर करतांना या अपील निर्णयाची प्रत सोबत जोडलेली नाही, तसेच उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक १९-१२-२००८ रोजी सदर अपिलार्थीच्या कोणत्याही अपिलावर निर्णय झालेला नाही. तथापि सदर तारीख अद्याप यावयाची असल्याने अपिलार्थीने हा दिनांक चुकीने टाकला आहे असे सिध्द होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम दिनांक १९-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे निमगाव मठ शिवारातील गट क्रमांक ५२३ वरील नोंद क्रमांक १६७३ (क्षेत्र ०.०२ आर) कायद्याच्या कोणत्या कलमान्वये मंजूर केली त्या कलमाची नक्कल व नोंद मंजूर केल्याची तक्रार अर्जदारास लेखी माहिती का दिली नाही यासंदर्भात माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास या प्रकरणातील जन माहिती अधिका-याकडील तलाठी निमगाव यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली असून या कथित माहितीमध्ये गट नोंदणीशी संबंधीत कायद्याच्या नकला जोडलेल्या नाहीत, यावरुन ही माहिती त्यांनी अपिलार्थीस अर्धवट पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक १८-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांचा सदर अपीलवरील निर्णय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये नाही.

अर्जदाराने उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन मुद्दयावर माहिती मागितली होती, तथापि त्यापैकी पहिल्या मुद्दयाव्दारे त्यांनी जमिनीच्या नोंदीसंदर्भात प्रचलीत असलेल्या कायद्याच्या कलमाची नक्कल व दुस-या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना लेखी माहिती का पुरविली नाही, याबाबत खुलासा विचारल्याचे दिसून येते. या दोन मुद्यापैकी मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. यामध्ये माहिती अधिकार अधिनियमान्वये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिका-यास त्यांच्या निर्णयाविषयी कारणे अथवा खुलासा विचारणे व तो जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांना देय ठरु शकत नाही, मात्र या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती जी "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार देय ठरते. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ नुसार प्रश्नाधीन जमिनीची नोंद केल्याचे कळविले होते. मात्र याबरोबर या कलमांचा तपशील, कलमाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती (अधिनियमाची प्रत, कलम १४९ ची सत्य झेरॉक्स प्रत) हे आदेश निर्गमीत होताच अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. त्यांनी अपिलार्थीपासून हेतूपुरस्सर कोणतीही माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्याविरुध्द कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात

येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, भाग येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६८

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. अर्जून नारायण गालपेल्ली, अपिलार्थी
वाघमळा, करंदीकर हॉस्पिटल जवळ, सिध्दार्थनगर,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन
अधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त, महानगरपालिका,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. जी. एस. झिने, वरिष्ठ लिपीक, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. अर्जून नारायण गालपेल्ली, जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर व त्रयस्थ पक्ष श्री. भुमय्या गौरी, धर्मय्या सब्बन, श्रीमती नागुबाई यन्नम व श्री. पेंटय्या नागुल हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १८-०६-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर यांनी माहिती देण्याचे नाकारले, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने श्री. भुमय्या गौरी, धर्मय्या सब्बन, श्रीमती नागुबाई यन्नम व श्री. पेंटय्या नागुल या ४ व्यक्तींनी १९९५ ते २००५ अखेर वर्षनिहाय भरलेल्या घरपट्टयांच्या साक्षांकीत प्रतींची मागणी त्यांच्या दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने या माहितीच्या सत्यप्रती त्यांना देता येत नसल्याचे कळविले. यावर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २७-०४-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन वसुली अधीक्षक, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांनी अर्जदाराने अपेक्षिलेले डिमांड रजिष्टर कार्यालयात उपलब्ध असल्यास अर्जदारास शुल्क भरुन उपलब्ध करुन देण्याची सूचना केली होती.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी महानगरपालिकेचे प्रतिनिधी श्री. झिने जी. एस. वरिष्ठ लिपीक तथा सहाय्यक जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कर्मचा-याच्या ताब्यात होती त्या कर्मचा-याकडून संबंधीत अभिलेखे गहाळ झाले असून त्याच्यावर महानगरपालिकेतर्फे फौजदारी

गुन्हा दाखल केला गेला आहे व सध्या त्याची चौकशी चालू आहे. आज रोजी त्यांच्याकडे डिमांड रजिष्टर गहाळ झाले असल्याने अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, आयोगासमोर त्यांनी असमर्थता व्यक्त केली.

उपरोक्त परिस्थितीत या घटकेस अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे शक्य होणार नाही हे सिध्द होत आहे. मात्र सदरअभिलेखे उपलब्ध झाल्याबरोबर लागलीच ३० दिवसाच्या आत त्यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आयुक्त महानगरपालिका, अहमदनगर यांना सूचना देण्यात येते की, राज्य माहिती आयोगाकडे सुनावणीसाठी त्यांना कनिष्ठ दर्ज्याच्या कर्मचा-यांना आयोगासमोर सुनावणीसाठी न पाठविता प्रत्यक्ष जे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांनाच शक्यतो आयोगासमोर सुनावणीसाठी पाठवावे. याबाबत आयोगाकडील सुनावणीस अनुपस्थितीसाठी त्यांनी आायोगाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता भासत नाही. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अर्जून नारायण गालपेल्ली, वाघमळा, करंदीकर हॉस्पिटल जवळ, सिध्दार्थनगर, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७६९

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. नारायण तुलसीभाई परमार, अपिलार्थी
मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, बुरुडगांव रोड,
आनंद हॉस्पिटलजवळ, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी,
बुरुडगांव रोड, आनंद हॉस्पिटलजवळ, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण तुलसीभाई परमार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. मनोज पोपटलाल मुथा, जन माहिती अधिकारी तथा सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. प्रशांत शामराव सोनवणे, जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ०९-०७-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या दिनांक ०१-०६-२००७ च्या आदेशाचे उल्लंघन झाल्याने केलेले आहे. संबंधीत प्रकरण सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधीत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये संस्थेच्या अध्यक्षाकडे मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगरच्या दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या सोसायटी संचालक मंडळाच्या सभेमधील विषय व ठराव क्रमांक ५-५ शी संबंधीत कागदपत्रांच्या सत्यप्रतींची व्यक्तिशः मागणी केली होती. तथापि अपिलार्थीस संबंधीत अध्यक्षांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी उप निबंधक सहकारी संस्था तालुका अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. या अपिलाची सुनावणी होऊन तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या दिनांक ०१-०३-२००७ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील मंजूर करुन सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी संबंधीत गृहनिर्माण संस्थेच्या सचिवांनी आयोगास असे अवगत केले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी त्यांच्या संस्थेस लागू होत नसल्याचे वाटल्यावरुन त्यांनी आजतागायत कोणत्याही जन माहिती अथवा जन अपिलीय अधिका-याची नियुक्ती केलेली नाही. अशा परिस्थितीत मूळात कोणतेही जन माहिती अधिकारी नेमले गेले नसल्याने अपिलार्थीस माहिती मिळू शकली नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५

हा सहकारी गृहनिर्माण संस्थेस लागू होतो किंवा नाही, आजमितीस लागू होतो किंवा नाही नाही याबाबत अनेक मतप्रवाह आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याशी संबधीत असल्याचे दिसून येत असल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्यास सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांना कोणतीही अडचण येऊ नये असे दिसून येते. सबब सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या प्रकारच्या प्रकरणामध्ये तालुका उपनिबंधक यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडून नियुक्ती केली नसली तरीही त्यांनी या अपिलावर निर्णय दिलेला आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची योग्य प्रकारे अमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र सहकार कायदा १९६० मधील तरतुदी विचारात घेऊन मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदनगर यांना त्यांच्या सोसायटीकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी नेमण्याचे आदेश द्यावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर
दिनांक ३१-१०-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण तुलसीभाई परमार, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, बुरुडगांव रोड, आनंद हॉस्पिटलजवळ, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, मोहन को-ऑप. हौसिंग सोसायटी, बुरुडगांव रोड, आनंद हॉस्पिटलजवळ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७०

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे,<br>रा. मिरजगांव, तालुका कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत अंतर्गत मंडळ<br>कृषि अधिकारी, मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा<br>अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत,<br>जिल्हा अहमदनगर | प्रतिवादी |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बाबुशा पंढरीनाथ नेटके, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भाऊसाहेब सावळेराम ब-हाटे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २२-११-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलावर एकतर्फी निर्णय दिल्याने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ३० दिवसामध्ये माहिती प्राप्त न झाल्याने केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मिरजगाव मंडळांतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत काही माहिती मागितली होती. यामध्ये ग्रामबिजोत्पादन अंतर्गत बियाणे व औषध वाटप व अनुदान लाभार्थीची यादी, पीक प्रात्यक्षिक गट नंबर व शेतक-याचे नांव, अतिवृष्टी अंतर्गत वाटप अनुदान लाभार्थ्याचे नांव व यादी, कंटूर बंडींग मस्टर झेरॉक्स व संमतीपत्रक व शेतीशाळा अंतर्गत कृषि विज्ञान मंडळ काढण्यात आलेल्या बिलांचे झेरॉक्स प्रती इत्यादी माहितीचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८६८८ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणा-या संभाव्य माहितीची पृष्ठ संख्या ४३४४ अशी दाखविली आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले असून हे पत्र अपिलार्थीस दिनांक २७-१०-२००७ रोजी प्राप्त झाल्याची रजिस्टर्ड पत्राची पोच प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-१२-२००७ रोजी निर्णय देऊन

अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे या आदेशाव्दारे नाकारले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी प्रतिसाद दिल्याचे आयोगास सांगितले व अपिलार्थीस संभाव्य माहितीच्या पृष्ठयर्थ येणारे आवश्यक ते शुल्क दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये भरण्याचे कळविल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस सदर पत्र प्राप्त झाल्याची पोच पावतीही आयोगास दाखविली. यावरुन असे सिध्द होते की, अपिलार्थीस आवश्यक माहितीपोटी पुरावाव्या लागणा-या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे. सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता अपिलार्थीने कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे करणे पसंत केले. जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी आवश्यक त्या रकमेचे चलन तयार करुन ठेवले होते, परंतु सदर चलनावर सही करण्यासाठी अपिलार्थी उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी हे त्यांच्याकडे व्यक्तिशः माहिती मागवूनही कधीही हजर झाले नाहीत असा पुढे खुलासा केला.

जन माहिती अधिकारी हे आज देखिल अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी सदर रक्कम त्यांच्या कार्यालयास भरल्यास त्वरीत ४ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत, जन माहिती अधिकारी माहिती देण्यासाठी पूर्णतः तयार आहेत, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सकारात्मक कार्यवाही केली आहे, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोठल्याही टप्प्यावर नाकारले नाही, मात्र अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी विहित मुदतीत कल्पना देऊनही भरले नाही ही बाब सिध्द होत आहे, हे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग

आला आहे. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असेल तर त्यांनी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरुन हस्तगत करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे, रा. मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७१

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे, अपिलार्थी
रा. मिरजगांव, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत अंतर्गत मंडळ
कृषि अधिकारी, मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत,
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बाबुशा पंढरीनाथ नेटके, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भाऊसाहेब सावळेराम ब-हाटे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक ११-०२-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून, उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली नाही तर जन माहिती अधिकारी यांनी माहिती लपवून ठेवली व दिशाभूल केली असल्याचे म्हटले आहे. याच अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील कंट्रोल बंडींगच्या कामाचे मिरजगांव हद्दीतील कामाशी संबंधीत माहिती मागितली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील कंट्रोल बंडींग कामाची काही मुद्दयावर माहिती मागितली होती. या माहितीमध्ये सदर कामाचे अंदाजपत्रक, संबंधीत शेतक-यांचे संमतीपत्र, मजुरांच्या सह्या व अंगठे असलेले पगारपत्रक, हजेरीपट व त्यासंबंधीत सर्व कागदपत्रे मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये कंट्रोल बंडींगचे काम झाले नाही हे म्हणणे चुकीचे असून ही कामे झालेली आहेत. उपरोक्त कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २६-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, त्यांनी कंट्रोल बंडींगची माहिती मागितली असून अशा प्रकारचे कोणतेही कंट्रोल बंडींगचे काम मिरजगांव हद्दीत झालेले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दिनांक १३-१२-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिनांक १०-०१-२००८ रोजी पारित केला. या

निर्णयान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीचे अपील निकाली काढतांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे कंट्रोल बंडींगचे काम झाले नसल्याचा निष्कर्ष काढून हा निर्णय दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती चुकीची असून त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कंट्रोल बंडींगची कामे झाली आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रामध्ये मिरजगांव मंडळामध्ये कंट्रोल बंडींगची कामे झाल्याची माहिती त्यांच्याकडे आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी मंडळ कृषि अधिकारी मिरजगांव यांनी श्री. मच्छिंद्र अमृता फरतडे यांना दिनांक १८-०१-२००६ रोजी दिलेली माहिती दाखविली, ही माहिती श्री. फरतडे यांना ज्या अर्जासंदर्भात दिली गेली त्या अर्जाचे अवलोकन करता सदर अर्ज श्री. मच्छिंद्र अमृता फरतडे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-११-२००५ रोजी केला होता. या अर्जामध्ये श्री. मच्छिंद्र अमृता फरतडे यांनी नाला बंडींग व कंट्रोल बंडींगची माहिती मागितली होती असे दिसून येते. याबाबत नाला बंडींगच्या कामाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०१-२००६ रोजी दिल्याचे दिसून येते. माहितीच्या या पत्रामध्ये कंट्रोल बंडींग अशा प्रकारच्या कामाचा कोठेही उल्लेख केल्याचे आढळून येत नाही. केवळ श्री. फरतडे यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये कंट्रोल बंडींग या शब्दाचा उल्लेख केल्यामुळे अपिलार्थीची अशी धारणा झाली आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कंट्रोल बंडींगची कामे झाली आहेत, तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्टीकरण दिले की, अशा प्रकारची कोणतीही कामे त्यांच्या खात्याअंतर्गत केली जात नाहीत.

वरील विवेचनावरुन अपिलार्थीचा युक्तिवाद सिध्द होत नाही, असे दिसून येते, तथापि त्यांना श्री. फरतडे यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये ज्या अभिलेख्याच्या आधारे माहिती दिली आहे ते सर्व अभिलेखे अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी हे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत, जेणेकरुन अपिलार्थीचे समाधान होऊ शकेल.

या प्रकरणी मूलतः अपिलार्थीने चुकीच्या विषयावर माहिती मागितली असल्याने व अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी प्रतिसाद दिला असल्यामुळे व जन माहिती अधिका-याकडून त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कंट्रोल बंडींगची कामे मूळात अस्तित्वात नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत झाले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोरखनाथ धोंडिराम वतारे, रा. मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७३

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. काळे विठ्ठल एकनाथराव,<br>मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव,<br>जिल्हा अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा दुय्यम निबंधक, श्रेणी - १, येवला,<br>तालुका येवला, जिल्हा नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१<br>नाशिक | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काळे विठ्ठल एकनाथराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. दिलीप लक्ष्मणराव देशपांडे, जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी - १, येवला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. बी. जी. मनगटे, जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ नाशिक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०२-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून योग्य त्या नकला न मिळाल्याने केल्याचे म्हटले आहे. याच अर्जामध्ये त्यांनी तालुका येवला येथील मौजे निमगांव मठ शिवारातील बागायत शेतजमीन गट नंबर ५२३ मधील ०.०२ आर क्षेत्राचे खरेदीखत कोणत्या कलमान्वये केले त्या कलमांच्या नकला मागितल्या आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर नमूद केल्याप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये शुल्क भरुन उपलब्ध करुन घेण्यात यावी असे सुचविले. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०५-११-२००७ रोजी जाऊन रुपये ८ इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले व त्यांना दिनांक ०५-११-२००७ रोजी आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये दिनांक ०६-११-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १०-०२-२००८ रोजी पारित केले व अपिलार्थीचे अपील फेटाळले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे वरील व्दितीय अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये केली ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे दिनांक ०५-११-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क आकारुन दिली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती त्यांच्या मागणीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी नोंदणी अधिनियम १९०८ च्या पाने ४ च्या छायांकीत प्रती पाठविल्या आहेत व त्याचप्रमाणे शासनाच्या जानेवारी २००३ च्या परिपत्रकाच्या याच विषयाची प्रत पाठविल्याचे दिसून येते. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील सर्व उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येते.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, कोणत्याही बागायत क्षेत्रातील २० गुंठ्यापेक्षा जास्त क्षेत्र असल्यासच फक्त खरेदी-विक्रीचा व्यवहार होऊ शकतो व यापेक्षा कमी क्षेत्राचा व्यवहार नोंदविला जात नाही तर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे म्हटले की, इलेक्ट्रीक मोटार, रस्ता किंवा विहिर इत्यादी सार्वजनिक प्रयोजनार्थ आवश्यक असलेल्या जमिनीच्या व्यवहाराची २० गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्र असले तरीही नोंदणी होऊ शकते व तसे स्पष्टीकरण शासनाने ०६ जानेवारी, २००३ च्या परिपत्रकामध्ये दिले असून या परिपत्रकाची प्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली आहे, मात्र या परिपत्रकातील स्पष्टीकरणाविषयी अपिलार्थीचे काही आक्षेप आहेत. त्यांना या संदर्भात शासनाकडे अथवा योग्य त्या प्राधिकरणाकडे आवश्यक तो अर्ज किंवा अपील करावे लागेल. या विशिष्ट मुद्दयावर स्पष्टीकरण देणे अथवा आपले अभिप्राय देणे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेत येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी महसूल व वन विभागाच्या ०६ जानेवारी, २००३ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ३ (क) (ब) चा संदर्भ दिला आहे. शासनाच्या या

निर्णयातील विसंगतीबाबत अपिलार्थी यांचे काही म्हणणे असल्यास त्यांनी त्याचा खुलासा शासनाकडे मागणे उचित राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, श्रेणी - १, येवला, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ एन. डी. अे. टॉवर, संभाजी चौक, उंटवाडी रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेलेअपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७४

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, अपिलार्थी
मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, येवला, जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड,
जिल्हा नाशिक

त्रयस्थ पक्ष श्री. एकनाथ तुकाराम काळे
श्रीमती लिलाबाई विष्णू काळे
श्री. विष्णू तुकाराम काळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काळे विठ्ठल एकनाथराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. उदय रामहरी किसवे, जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, येवला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एन. व्ही. धावटे, शिरस्तेदार, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचे प्रतिनिधी (यापुढे

त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९९५ सालाशी संबंधीत कायदेशीर जमीन वाटपाबाबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या व नोंद क्रमांक १११५ च्या मंजूरीसंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १. कायदेशिर जमिन वाटपाची नोंद होण्यासाठी आवश्यक कागद पत्रांची माहिती व त्यांची नावे.

२. निमगांव मठ शिवारातील वाटपाची नोंद नं. १११५ कायद्याच्या कोणत्या कलमान्वये मान्य (मंजुर) करण्यात आली त्या कलमाच्या नक्कला.

३. नोंदीतील १) एकनाथ तुकाराम काळे २) लिलाबाई विष्णु काळे ३) विष्णु तुकाराम काळे यांच्या जबाबाच्या नक्कला.

४. वाटपाचा दस्ताऐवज.

५. ले का. तलाटी यांनी अर्जाप्रमाणे नावे रेकॉर्डला दाखल केले तसेच अर्ज दप्तरी फैल केला परंतु रुजू केलेल्या नोटीसा दप्तरी फैल का केल्या नाहित यांची कायदेशिर लेखी माहिती.

६. अर्ज व नोटिस यांच्या नक्कला.

७. नोंद मंजुर करणारे सर्कल ऑफिसर व तलाटि यांची पुर्ण नांवे व सध्याचा पुर्ण पत्ता.

८. नोंद नं. १११४ व नोंद नं. १११६ मधील बजावलेल्या नोटिसांच्या नक्कला. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रां-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २०-११-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या उर्वरित नकला देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस अपेक्षित माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०२-२००८ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ८ शी संबंधीत माहिती दिनांक ०४-०९-२००७ व २१-०९-२००७ रोजी प्राप्त झाली व उर्वरित माहिती त्यांना अद्याप जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित ६ मुद्दयावरील माहिती ते अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. तसेच अपिलार्थीस हीच माहिती त्यांनी फेरफार नोंद क्रमांक १६७३ च्या संदर्भात अपिलार्थीने मागितलेल्या वेगळ्या माहिती अर्जासंदर्भात पूर्वीच दिली असल्याने या अर्जासंदर्भात त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दुस-या संदर्भान्वये या अर्जातील काही माहिती दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः या मुद्दयावर माहिती दिली नाही ही त्यांची कृती सर्वथा चुकीची आहे. अपिलार्थीने विचाराधीन

अपील प्रकरणी केलेल्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सदर माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने द्यावी लागेल. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ८ मुद्दयांवर माहिती मागविली आहे. यापैकी मुद्दा क्रमांक ६ व ८ ची माहिती त्यांनी वर कबूल केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०४-०९-२००७ व २१-०९-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या याच अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "नोटीसा दप्तरी फैल का केल्या नाहित" अशा प्रकारची माहिती मागितली आहे. या मुद्याचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या निर्णयाबाबत खुलासा देणे अपेक्षित नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही, मात्र उर्वरित सर्व मुद्दयांशी संबंधीत माहिती (मुद्दा क्रमांक ६ व ८ वगळता) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना भाग आहे. ही माहिती त्यांनी अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ०२-१०-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे अपेक्षित असतांना आयोगाची व्दितीय सुनावणी होईपर्यंत अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही ही बाब दुर्दैवाची आहे असे आयोगाचे मत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन खात्री झाली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर अशा प्रकाराची पुनरावृत्ती होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक ५, ६ व ८ वगळता) हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )
दिनांक ३१-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७५

निर्णय दिनांक  ३१-१०-२००८

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, अपिलार्थी
मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, येवला,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, येवला, जिल्हा नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : तलाठी, निमगांव मठ, तालुका येवला, जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. काळे विठ्ठल एकनाथराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. ए. जे. बावस्कर, जन माहिती अधिकारी तथा तलाठी, निमगाव मठ, तालुका येवला (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. उदय रामहरी किसवे, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, येवला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक २१-०२-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्यामुळे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००७ शी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निमगांव मठ शिवारातील गट नंबर ५२३ वरील ०.०२ आर क्षेत्राच्या नोंदीबाबत होती. सदर नोंद कामगार तलाठी श्री. ए. जे. बावस्कर यांनी कायद्याच्या कोणत्या कलमान्वये केली याची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी होती. अपिलार्थीने सदर अर्ज तहसीलदार येवला यांना उद्देशून केला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तलाठी निमगांव यांच्याशी संबंधीत असून अपिलार्थीस तलाठी निमगांव यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत तलाठी निमगांव यांना दिली. या पत्राच्या अनुषंगाने तलाठी निमगांव जे या प्रकरणी प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी आहेत त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविली आहे. यामध्ये त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ नुसार नोंद क्रमांक १६७३ दाखल केल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि या कलमाच्या नकला त्यांनी अपिलार्थीच्या या पत्राबरोबर पुरविल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज त्यांनी तहसीलदार येवला यांना उद्देशून केला आहे. या अपील अर्जावर संबंधीत अपिलीय अधिका-याने कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

तलाठी व तहसीलदार यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मौजे निमगांव मठ शिवारील बागायत गट नंबर ५२३ मधील ०.०२ आर क्षेत्राची नोंद संबंधीत तलाठ्याने कायद्याच्या कोणत्या कलमान्वये केली त्या कलमाची प्रत अपेक्षिली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त संबंधीत कलमाचा क्रमांक कळविला आहे. आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सदरील कलमाच्या प्रती अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद जरी अपुरा असला तरी त्यांनी अपिलार्थीस माहिती हेतुपुरःस्सर नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार कोणत्याही कारवाईचे आदेश नाहीत, मात्र त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर अधिक सतर्कतेने कारवाई करावी अशी सूचना त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच त्यांना ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. काळे विठ्ठल एकनाथराव, मु. पो. खंदे, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, निमगाव मठ, तालुका येवला, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, येवला, जिल्हा नाशिक यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७६

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. नवनाथ विठ्ठल साळूंके, अपिलार्थी
बहिरोबावाडी, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कामगार तलाठी, आळसुंदे, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, कर्जत,
जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नवनाथ विठ्ठल साळूंके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. गोविंद नामदेव कदम, जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. पोपट मल्हारी कोथिंबीरे, जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त तहसीलदार,

कर्जत, जिल्हा अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १५-०१-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने न्यायालयामार्फत त्यांच्या वडिलोपार्जीत जमिनीचे वाटप करुन घेतले होते त्याची नोंद तहसीलदार यांनी न घेतल्यामुळे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या अर्जान्वये तालुका कर्जत मौजे आळसुंदे येथील गट नंबर ६२३ च्या नोंदीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती मागविली होती. त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "मी दिनांक २४-०८-२००७ रोजी मा. तहसीलदारसाहेब यांच्याकडे माझी वडिलोपार्जीत शेतजमीन मौजे आळसुंदे तालुका कर्जत येथील गट नंबर ६२३ क्षेत्र ४ हेक्टर ५० आर कोर्टामार्फत वाटप होऊन नोंदीसाठी आपणाकडे वरील तारखेला अर्ज दिला होता, अद्यापही नोंद झाली नाही तरी नोंदीला कोणती अडचण आली आहे त्याची माहिती द्यावी. माझ्या आर्जानंतर रेकॉर्डवर किती नोंदी झाल्या, क्रमवारीने नोंदणीच्या छायांकीत प्रती मिळाव्या, फेरफार नोंद करण्यास काय अडचण आली याची माहिती मिळावी." अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन, अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (च) च्या तरतुदीनुसार माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०१-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सदर सुनावणी होऊ शकली नाही. सुनावणी न होण्याची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास सांगू शकले नाहीत. अपिलार्थीस, न्यायालयाने आदेश देऊनही त्यांच्या नावाची नोंद

संबंधीत कागदपत्रावर (७/१२ चा उतारा, ७/१२ व ८ अ) देण्यासाठी उशीर का झाला याची कारणे अपेक्षित आहेत. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जमीन वाटपासंबंधी काही तांत्रिक मुद्दे उपस्थित केले आहेत, या सर्व मुद्दयांची जन अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर अगत्याचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना, अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश तदनंतर ७ दिवसाच्या आत निर्गमीत करावेत, असे आदेशित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्यास ते अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश तदनंतर ७ दिवसाच्या आत निर्गमीत करावेत.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नवनाथ विठ्ठल साळूंके, बहिरोबावाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७७

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ सौ. रंजना पोपट मैड, अपिलार्थी
इंदिरानगर, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, यशवंत विद्यालय, पढेगाव,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. मरभळ एम. के., जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यशवंत विद्यालय, पढेगाव, तालुका श्रीरामपूर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी सौ. रंजना पोपट मैड, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर व त्रयस्थ पक्ष श्री. पोपट दामोधर मैड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४-०१-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या

विचाराधीन आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने सदर अपील अपिलार्थीने केल्याचे या अपील अर्जात नमूद करुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेल्या माहितीची मागणी त्यांनी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे पती श्री. पोपट दामोधर मैड हे यशवंत विद्यालय, पढेगाव, तालुका श्रीरामपूर या ठिकाणी कार्यरत असतांना त्यांना दिनांक ०१-०७-२००१ ते १५-०६-२००७ या कालावधीत दिल्या गेलेल्या मेमोच्या प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ड) (त्र) च्या तरतुदीनुसार नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयावर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस पाठवून दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या पतीला ०१-०७-२००१ ते १५-०६-२००७ या कालावधीत त्यांच्या कामातील हलगर्जीपणाबद्दल किंवा इतर कारणांमुळे दिलेल्या मेमोच्या प्रती मागितल्या होत्या. आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या कालावधीतील माहिती मागितली आहे, त्या कालावधीत श्री. पोपट दामोधर

मैड यांना कोणताही मेमो दिला गेला नव्हता, मात्र दिनांक ०२-०७-२००३ रोजी श्री. पोपट दामोधर मैड यांना त्यांनी काही लेखी सूचना केल्या होत्या, सदर सुचना श्री. मैड यांना व्यक्तिशः लेखी स्वरुपात हस्तांतरीत केल्या होत्या. या व्यतिरिक्त श्री. मैड यांना त्यांनी अर्जातील विचाराधीन कालावधीत कोणत्याही प्रकारचा मेमो दिलेला नव्हता. सदर लेखी सूचनेची प्रत अपिलार्थीस ते विनामूल्य पाठविण्यासाठी तयार आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर आयोगाचे असे मत झाले आहे की, श्री. पोपट दामोधर मैड यांना मुख्याध्यापक, यशवंत विद्यालय, पढेगाव, तालुका श्रीरामपूर यांनी दिलेल्या दिनांक ०२-०७-२००३ च्या पत्राची प्रत अपिलार्थीस दिल्यास अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीचा भंग होणे कोणत्याही परिस्थितीत संभवत नाही. सदर पत्राची प्रत अपिलार्थीस दिल्यास त्यांनी मागितलेली माहिती त्यांना प्राप्त होऊ शकेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस दिनांक ०२-११-२००७ रोजी अगर तत्पूर्वी त्यांच्या मूळ अर्जासंबंधी निर्णय पारित करणे अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक होते, तथापि त्यांनी तशी कृती न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने अध्यक्ष रयत शिक्षण संस्था यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था यांना जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. रंजना पोपट मैड, इंदिरानगर, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यशवंत विद्यालय, पढेगाव, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, रयत शिक्षण संस्थेचे यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (कला), पढेगाव, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, चार भिंती, कर्मवीर समाधी परिसर, सातारा (महाराष्ट्र) - ४१५ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७८

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. कोरडे मधुकर रामभाऊ, अपिलार्थी
मु. पो. मिरजगांव, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत
तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कोरडे मधुकर रामभाऊ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. बाबुशा पंढरीनाथ नेटके, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. भाऊसाहेब सावळेराम ब-हाटे, जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक १४-०१-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९९८ इतके त्यांच्या कार्यालयात भरुन देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नसल्याचे, तसेच त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले असता त्यांनी देखील माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २५-१०-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००३ ते २००५ या कालावधीमध्ये मिरजगांव मंडळ कृषि कार्यालय अंतर्गत घुमरी व नागमठाण येथे झालेल्या कामाची काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये २००३ ते २००५ मध्ये झालेली कामे, नाला बंडींग व कंट्रोल बंडींग या कामावरील मजुरांच्या नावाची साक्षांकीत यादी सही व अंगठ्यासह मिळणे, मजुरांना केलेल्या धान्य वाटपाचा तपशील, त्यांना दिलेला पगार, एकूण धान्य साठा किती आला व किती शिल्लक राहील, शासनाने नाला बंडींग व कंट्रोल बंडींगला किती निधी दिला व खर्च किती झाला, ज्या ठिकाणी ही कामे झाली त्या ठिकाणच्या शेतक-यांच्या संमतीची साक्षांकीत प्रत या मुद्दयांचा समावेश असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९९८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने शासकीय कोषागारात शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-११-२००७ रोजी चलन सादर केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लागलीच माहिती न देता अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लागणा-या जादा रकमेची मागणी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे

दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये केली व त्याची एक प्रत अपिलार्थीस देऊन त्यांच्या वरिष्ठांकडून माहिती देण्यापोटीचे अनुदान उपलब्ध होताच अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून ती त्वरीत घेऊन जाण्याचे अपिलार्थीस सुचविले. तथापि तत्पूर्वीच अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क भरुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१२-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीचे पत्र अपिलार्थीस दिनांक ०५-१२-२००७ रोजी त्यांनी पाठविले होते, तथापि सदर पत्र अपिलार्थीने "स्विकारले नाही" असा शेरा मारुन जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात ते परत प्राप्त झाले व अपिलार्थीस माहितीची गरज नाही असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांनी आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात भरुन व आवश्यक ते चलन जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करुनही त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अनेक वेळा उपस्थित राहिले, तथापि यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला नाही. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ती प्राप्त करुन घेण्यासाठी ते कधीही त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी स्वतःहून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून व्यक्तिशः

घेऊन जाण्यासाठी दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये सूचना दिलेली होती, तरीही आजतागायत अपिलार्थी सदर माहिती घेऊन गेलेले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी ठेवली असता सुनावणीसाठी उपस्थित राहण्याचे पत्र स्विकारण्यास अपिलार्थीने नकार दिला त्यामुळे अपिलार्थीस माहितीची आवश्यकता नसल्याचा निष्कर्ष काढून त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आज रोजी तयार असून केवळ अपिलार्थी हे स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही हजर राहिले नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी त्यांना माहिती पुरवू शकले नाहीत. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारामध्ये भरुन देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जादा अनुदानाची मागणी उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत यांच्याकडे केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांची वरिष्ठांकडे अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जादा अनुदान मागवून घेण्यासाठीची कृती सर्वथा गैर आहे. वास्तविकतः अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम शासकीय कोषागारात भरल्यानंतर त्यांनी अशा त-हेची मागणी वरिष्ठांकडे करणे हे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव असल्याचे स्पष्ट करत आहे असे आयोगाचे मत आहे. अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळून इतःपर त्यांनी आपल्या कार्यशैलीमध्ये सुधारणा घडवून आणावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांच्या मूळ अर्जातील माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कोरडे मधुकर रामभाऊ, मु. पो. मिरजगांव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७७९

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. छानराज उत्तम क्षेत्रे, अपिलार्थी
मु. पो. करंजी, तालुका पाथर्डी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तिसगांव,
तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक वनसंरक्षक,
रोहयो, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. छानराज उत्तम क्षेत्रे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. सुरेश सोपान दौंड, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तिसगांव, तालुका पाथर्डी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. नंदकुमार चंद्रकांत रामदिन, जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, रोहयो, अहमदनगर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २५-०१-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या

विचाराधीन आहे. सदर अपील अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती प्राप्त न झाल्याने आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००६-२००७ या कालावधीशी संबंधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील तिसगाव वन परिक्षेत्र या कार्यालयाकडे सन २००६-२००७ व ऑगस्ट २००७ अखेरपर्यंत केंद्र सरकार, राज्यसरकार व वेगवेगळया संस्था या सर्व माध्यमातून किती निधी उपलब्ध झाला व तो निधी कसा व कोठे खर्च केला व शिल्लक किती राहिला, या सर्व जमाखर्चाची मूळ रेकॉर्डच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २००० इतके त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीच्या संभाव्य पृष्ठांची संख्या व माहिती देण्यासाठीचा प्रतीपृष्ठ दर यांचा उल्लेख केलेला होता. तथापि अपिलार्थीने सदर मागणी केलेल्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००७ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००७ रोजी प्राप्त झाले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-११-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १६-११-२००७ रोजी पारित करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क, रुपये २००० इतके त्यांच्या कार्यालयात भरले. अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सकारात्मक प्रतिसाद विहित कालावधीमध्ये

मिळाला नाही. त्यांना मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून चलन तयार करुन घेण्यासाठी व त्यावर त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार जावे लागले. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांनी देऊ केलेली माहिती स्विकारली नाही. सदर माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या-कडील दिनांक २०-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले असता अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात दिनांक २०-१२-२००७ रोजी उपस्थित राहिले व कार्यालयात मोठमोठ्याने बोलून कर्मचा-यांना अर्वाच्च भाषा वापरली. तदनंतर त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन प्राप्त करुन घेऊन दिनांक ०२-०१-२००८ रोजी माहिती पुरविली, तथापि अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला. अपिलार्थीने "माहिती घेण्यासाठी नकार" दिला असे अभिप्राय संबंधीत पोस्टमनने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या रजिस्टर्ड पार्सलवर दिले आहेत. यावर शासनास एकूण रुपये ५५ इतका भुर्दंड पडला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे सन २००६-२००७ व ऑगस्ट २००७ अखेर त्यांच्या कार्यालयाकडे वेगवेगळ्या माध्यमातून काही निधी जमा झाला व तो कसा व कोठे खर्च केला याची माहिती मागितली होती. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कॅशबुकमध्ये उपलब्ध असणे साहजिकच आहे, त्यामुळे या कालावधीतील संबंधीत पृष्ठांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविल्यास अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकेल. आज रोजी सुनावणीस आलेले जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती बरोबर आणली आहे. या माहितीची एकूण पृष्ठे ५१० इतके होत असून त्याचे शुल्क प्रतीपृष्ठ २ रुपये याप्रमाणे रुपये १०२० होत आहे. सदर माहिती स्विकृत करण्यासाठी अपिलार्थीने आयोगासमोर होकार दर्शविला आहे त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी १००० पृष्ठांचे रुपये २०००

इतके शुल्क आकारले होते. तथापि ही माहिती ५१० पृष्ठांची असल्यामुळे उर्वरित रक्कम रुपये ९८० त्यांना अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच त्वरित परत करावी लागेल. या सर्व घटनाक्रमामध्ये अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने माहिती स्विकारली नाही. यावर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १५० पानांची माहिती देऊ केली असल्याने व ती अपूर्ण असल्याचे वाटल्याने त्यांनी तिचा स्विकार केला नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही मुद्दे प्रत्यक्षतः सिध्द होऊ शकत नसल्यामुळे आयोगाचे त्यावर काही भाष्य नाही, मात्र जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर कारवाई करतांना सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन कारवाई करावी.

अपिलार्थीस आता संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटी घेतलेले रुपये ९८० इतके अतिरिक्त शुल्क हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत अपिलार्थीस परत करावे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. छानराज उत्तम क्षेत्रे, मु. पो. करंजी, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तिसगांव, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, रोहयो, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१७८०

निर्णय दिनांक ३१-१०-२००८

१ श्री. शिंगटे विनोद जालिंदर, अपिलार्थी

रा. नागलवाडी, तालुका कर्जत,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नागलवाडी,

तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत,

जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-१०-२००८ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शिंगटे विनोद जालिंदर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), श्री. पोटे संजय बबन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नागलवाडी, तालुका कर्जत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व श्री. एन. के. फंड, विस्तार अधिकारी, जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत यांचे प्रतिनिधी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दिनांक २३-०१-२००८ रोजी केलेले व्दितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही १० दिवसाच्या आत माहिती न दिल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः दिनांक ०८-०८-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत नागलवाडी, तालुका कर्जत येथील दिनांक २८-०८-२००६ ते ०१-०८-२००७ या कालावधीतील १२ व्या वित्त आयोगाच्या योजनेंतर्गत प्राप्त झालेले अनुदान व झालेल्या खर्चाचा तपशील, कामाचे अंदाजपत्रक व मूल्यांकन व त्यासंबंधी ठरावाच्या नकला, द व सुधार कामाच्या विषयी झालेल्या सर्व ठरावाच्या नकला, झालेल्या खर्चाचे सविस्तर वर्णन, अंदाजपत्रक व मुल्यांकन, ग्रामनिधीवर झालेल्या जमा रकमा दिनांक व पावती क्रमांकासह व झालेला खर्च, व मागासवर्गीय शेष मधून झालेल्या कामाची सविस्तर माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १०-०९-२००७ रोजी प्राप्त झाले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये आपले आदेश पारित करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात वर्णन केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत, मात्र सध्याचे नागलवाडी येथील ग्रामसेवक श्री. संजय बबन पोटे हे उपस्थित

आहेत व अपिलार्थीने मागितलेली माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्या काळात त्यावेळी श्री. डी. बी. अजबे हे जन माहिती अधिकारी कार्यरत होते, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचा हक्क प्राप्त होऊनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या अकार्यक्षमतेमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती प्राप्त करुन घेण्यास विनाकारण दीर्घ कालावधीसाठी वंचित राहीले व याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डी. बी. अजबे हे जबाबदार असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन नि:संशयपणे सिध्द होत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्याकडे दाखल झालेल्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय न घेऊन अधिनियमातील कलम १९ (६) चा भंग केल्याचे आयोगास आढळून आले आहे. ते केवळ या अधिनियमाचा भंग करुन थांबले नाहीत तर आज देखील त्यांनी सुनावणीस त्यांच्या कनिष्ठ अधिका-यास आयोगाच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास सूचित केले. त्यांच्या अशा प्रकारच्या बेफिकीर वर्तनाची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सध्याचे जन माहिती अधिकारी श्री. संजय बबन पोटे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी आता व्यपगत झाला असल्याने त्यांना विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३१-१०-२००८ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शिंगटे विनोद जालिंदर, रा. नागलवाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नागलवाडी, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.